
# महाभारत

मराठी अनुवाद

श्री. अशोक कोठारे

## खंड ४३

## शांतीपर्व



# महाभारत

## महाभारत खंड त्रेचाळीसावा

## शांती पर्व भाग आठवा

## मोक्ष धर्म पर्व

अशोक कोठारे

**ई साहित्य प्रतिष्ठान**

विशेष सुचना - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.

http://www.esahity.com/23092343238123512366234023812350.html

# महाभारत

मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे
ashokkothare@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

**ई साहित्य प्रतिष्ठान**
G1102, Eternity, Eleventh floor
Eastern Express Highway. Thane, 400604
**www.esahity.com**
**esahity@gmail.com**
©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचना व्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रकाशन** : **१० ऑगस्ट २०२१**

# अनुवादकाचे दोन शब्द –

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळ्या परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बर्याच वेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, एक शैक्षणिक माध्यम म्हणून वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना तो गद्यात केला आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये. त्या शिवाय, सामान्य वाचकांना कथाभाग अधिक चांगल्या प्रकारे समजावा म्हणून कांहीं टीपा दिल्या आहेत.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना प्राचीनतेचा अनुभव यावा म्हणून मुद्दाम प्राचीन (Archaic) शब्दप्रयोग वापरतात परंतु, माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मुळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत चाळीसांपेक्षां

जास्त खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे जाईल अशी अपेक्षा आहे. त्यातील हा त्रेचाळीसावा खंड, शांती पर्व भाग आठवा, मोक्ष धर्म पर्व, आपण आता वाचणार अहात. ह्या खंडामध्ये शुद्ध अध्यात्म विद्या सांगितली आहे. ह्या आधीच्या शांती पर्वांतील खंडांतून नितीशास्त्र समजावून सांगितले आहे. हिंदू धर्माचे हे दोन भाग आहेत. त्यानंतर कर्मकांड येते परंतु, त्यावर महाभारतात विशेष चर्चा केलेली नाही. कर्मकांड आगम शास्त्रातून तयार झाली आहेत.
शांती पर्वात हिंदू धर्माचे मूलभूत ज्ञान सांगितले आहे. त्यात नितीशास्त्र, अध्यात्म विद्या आणि कर्मकांड अशा तीन विभागात ते दिलेले आहे. युधिष्ठीर व भिष्म ह्यांच्या संवादाच्या रुपात ते दिलेले आहे. नितीशास्त्रात माणसांने इतर लोकांशी, प्राण्यांशी व वस्तुमात्रांशी कसे व्यवहार करावेत त्याचे विवरण आहे. अध्यात्मविद्येत माणसांने त्याच्यामध्ये असलेल्या आत्म्याला कसे समजून घ्यावयाचे त्याची चर्चा केलेली आहे. कर्मकांड माणसाला त्याचे भाग्य बदलण्याची इच्छा असते त्यासाठी विविध देवतांना कसे खूष करावयाचे त्यासाठी काय करावे त्याची माहिती आहे. कर्मकांड हा एकाप्रकारे भ्रष्टाचाराचा भाग आहे. देवतांना वशिले लावून आपले भाग्य सुधारता येते अशा संकल्पनेतून हा भाग विकसित झाला आहे. कर्मकांड कितपत माणसाचे दैव सुधारू शकते हा विवाद्य विषय आहे. मनुष्य आशावादी असतो व म्हणून तो कृत युगापासून त्या वशिलेबाजीत रमलेला आहे. कृतयुगात प्रामुख्याने यज्ञ त्यासाठी सांगितले आहेत. परंतु, कलीयुगात त्याचे स्वरुप बदलून सामान्य पुजा विधीमध्ये ते रुपांतरीत झालेले आपण पहातो. उपास तापास, व्रतवैकल्ये, शाकाहार करणे अशी आणखीन कांहीं रुप कर्मकांडात आपण पहातो. शुद्ध हिंदू धर्मात कर्मकांडाला महत्व नसते. त्यात पहिले दोन म्हणजे नितीशास्त्र आणि अध्यात्मविद्या ह्यांच्यावर भर असतो. कर्मकांडाचे महत्व पुरोहित वर्गांने त्यांच्या स्वार्थासाठी अवास्तव प्रमाणात वाढवले आहे आणि कर्मकांडातील विधी करणे म्हणजेच हिंदू धर्म असा एक गैरसमज पसरवण्यात ते यशस्वी झालेले आहेत हे आपल्याला दिसते. त्यासाठी अनेक संघटना पुरोहीत वर्गाने यशस्वीपणे कार्यरत केल्या आहेत. समर्थ रामदासांनी तीनशे वर्षापूर्वीच त्यांच्या दासबोधात ते सगळे दिले आहे परंतु, त्याकडे हिंदू

समाजाचे त्याच्या अशिक्षित रहाण्याच्या प्रवृत्तीमुळे दुर्लक्ष झालेले आहे. प्रत्येक हिंदूंने त्याला त्याचा धर्म समजून घ्यावयाचा असेल तर शांतीपर्व चांगले लक्ष देऊन वाचावे.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणार्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्या आधीची असती तर त्याचा उल्लेख त्या काळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्या नंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, सम्राट अशोकाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत

त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे. कदाचित असें म्हणता येईल कीं, महाभारत हा एक दंतकथांचा संग्रह आहे व त्याद्वारा नैतिकमुल्ये शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राजांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. कर्मकांडासाठी आगम शास्त्रांचा अभ्यास करावा लागतो ते महाभारतात नाही. अध्यात्मविद्येत माणसाने स्वतामधील परमेश्वर कसा पहावा, कसा त्याच्याशी संपर्क करावा त्याचे शिक्षण असते तो विषय शांतीपर्वात विशेषकरून सविस्तरपणे पाहिलेला आहे. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी डोळ्यासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ असला तरी भक्तीमार्गी निश्चितच नाही, तो ज्ञानमार्गी आहे. असे माझे मत आहे. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता, व्याध गीता वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई–साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहेत म्हणून त्यांना शतशः धन्यवाद.

अशोक कोठारे



माझा ई-मेल –
ashokkothare@gmail.com

ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई–पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई–साहित्य करणार आहेत परंतु, हे ई–पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

विशेष सुचना - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.

http://www.esahity.com/2309234323812351236623402381235 0.html

# – शांती पर्व भाग आठवा –

## मोक्ष धर्म पर्व

## भाग एकशे चौदावा

युधिष्ठीर विचारतो, सगळे सजीव नेहमी सुख आणि दुःखाच्या भोवर्यात अडकलेले दिसतात. ते काय केले तर टाळता येईल ते मला सांगा.

भिष्म सांगतात, "ह्यासाठी मी तुला नारद आणि समंगाचे संभाषण काय झाले ते सांगतो".

नारद त्याला बोलतात, "इतर लोक त्यांच्या वरिष्ठाना लवून नमस्कार करतात, तू मात्र त्याच्या पाया पडतोस असा कीं, तुझी छाती मातीला लागते. अशारितीने तू तुझे जीवन जगत असतोस, त्यात तुला परमानंद होत असतो. तू निश्चिंतपणे रहात आहेस. एकाद्या बालकासारखा तू मजेत रहात आहेस".

ते ऐकल्यावर समंग त्यांना बोलतो, "मी सगळे भूत, वर्तमान आणि भविष्य जाणत आहे. त्याकारणाने मला कसलीच चिंता नसते. मी जाणतो कीं, जे कर्म केले जाते त्याची त्याप्रमाणे फळं मिळणारच. त्याकरता मी त्यांची चिंता करत नसतो. ते पहा, अपंग, अशिक्षित तसेंच समृद्ध कसे जगत आहेत. ते त्यांच्या कर्मफलां बद्दल सदैव चिंतेत असतात. अहो नारदा, ह्या जगात सगळे जगतात, जसें, वेडे, आंधळे, मूर्ख आणि आपण सुद्धा जगत आहोत, ते सगळे त्यांच्या गत कर्माच्या गुणांबरहुकूम जगत असतात. हा नियम देवतांना सुद्धा लागू आहे. म्हणून आपण ते स्वीकारले पाहिजे विनातक्रार. अगदी शंभरांचा अथवा हजारांचा मालक सुद्धा त्याला अपवाद नसतो. दुःखी जगत आहेत, सुखी जगत आहेत, आपण सुद्धा त्यात येतो. जेव्हां आपण आपल्याला येणार्या सुख दुःखाच्या अनुभवाने विचलित होत नाही तेव्हां आपल्याला कोणता नियम लागू होतो ते सांगा. ते आपल्याला विचलित करू शकत नाहीत कारण आपण जाणतो कीं, ते अनुभव आपल्या कल्पनांचा खेळ आहे. वस्तुतः तसे कांहींही झालेले नसते. सुख आणि दुःख दोन प्रकारची आहेत. एक आहे शरीराचे

व दुसरे आहे मनाचे. मनाची सुख व दुःख नेहमीच काल्पनिक असतात. शरीराच्या दुःखात (वेदनांत) खरेपणा असतो. ते दुःख निश्चितच वास्तविक असते. ते शरीराचे दुःख उपचाराने कमी करता येणारे असते. मी येथे त्या दुखाबद्दल बोलत नाही. आपल्या चुकीच्या कामाबद्दल अभिमान बाळगणारे त्या भ्रमात असतात. त्यांना ह्या आणि नंतरच्या जगात गति नसते. ज्या जीवनात सुख आणि दुःख सारखे येत असते तसे जीवन मी जगू इच्छित नाही. माझ्या सारखा सुखासाठी धडपडत नसतो त्यामुळे त्याला दुःख सुद्धा झेलावे लागत नाही. ज्याला चिरंतन समाधान प्राप्त झाले आहे त्याला कसल्याही गोष्टींची आवश्यकता नसते. अशा माणसाला कितीही संपत्तीचा लोभ होत नाही. त्याला त्यात रस नसतो. ती मिळत नाही म्हणून त्यास क्लेषसुद्धा होत नसतो. ज्याला लोभ झाला आहे त्यास ते मिळाल्याशिवाय शांती नसते. ज्याला योग शास्त्र समजत नाही त्याला मोक्षाची अपेक्षासुद्धा नसते. ज्याला कांहींच नको असते त्याला कांहीं मिळाले नाही म्हणून फरक पडत नाही. असा मनुष्य नित्य समाधानाच्या अवस्थेत असतो. सुखाच्या इच्छेतून दुःख (किंवा क्रोध) उत्पन्न होत असते. असा मी सगळ्या सुख दुखापासून मुक्त जगभर फिरत असतो. जणूकाय मी अमृत प्यालो आहे अशी माझी अवस्था असते. मला कांहीं नको म्हणून मला कसलीही भितीसुद्धा वाटत नाही आणि मी क्रोधमुक्त सुद्धा असतो. मला मृत्यूचे सुद्धा भय राहीलेले नाही. माझ्या तपस्येने हे मी समजलो आहे. म्हणून मला जरी शारिरीक दुःख अनुभवास आले तरी त्यांने मी हैराण होत नाही. ते दुःख यथावकाश माझे शरीर संपवत असते हे मी जाणतो. मी कोणाला तरी शारिरीक दुःख दिले होते माझ्या गत जन्मात ते आता मला भोगावे लागत आहे हे मी जाणून असतो. अहो नारदा, त्या कारणाने कसलेही दुःख मला विचलित करू शकत नाही.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे चौदावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग एकशे पंधरावा

युधिष्ठीर विचारतो, "मला सांगा पितामहा, ज्याला धर्मशास्त्र माहीत नाही अशांने कसे जगावे कारण त्याला नेहमी योग्य अयोग्यचे बद्दल साशंकता असते. त्याला आत्म्याचे ज्ञान कसे होऊ शकेल"?

भिष्म सांगतात, "अशांने त्याच्या घरातील वडीलधार्यांना विचारावे, तसेंच ब्राह्मणाला किंवा शिक्षकाला विचारावे. त्यामुळे त्याला चांगले मार्गदर्शन होण्याची शक्यता असते. ह्याबाबत मी गवाल आणि नारद ऋषी ह्यांच्यामधील संवाद काय झाला तो सांगतो. एकदा कधी एक गवाल (गुराखी) त्याच्यासाठी काय योग्य ते समजून घेण्यासाठी नारदाला भेटतो. विचारतो, "अहो मुनी, मला सांगा, असें काय आहे जे असल्यास त्या माणसाला समाजात मान मरातब मिळतो? मी पहातो कीं, आपल्याला सगळे फार मान मरातब देत असतात. म्हणून मी तुम्हाला ते विचारत आहे. ते समजले तर कोणी बिनचूकपणे ते साध्य करू शकेल. आम्हाला शास्त्र वाचता येत नाही. म्हणून आपण मला सांगा. ज्ञान आणि कर्म हे दोनही कसे सांभाळावयाचे? मला समजावून सांगा जर मी ते समजण्याच्या योग्यतेचा आहे असें तुम्हाला वाटत असेल तर". "चार आश्रम सांगितले आहेत त्यांचे जीवन प्रकार भिन्न असतात. त्यातील कोणता जास्त चांगला ते कसे ठरते? चार आश्रमाच्या लोकांच्या जीवनाचे निरीक्षण केले तर असे दिसते कीं, त्यातील प्रत्येक त्याचा आश्रम श्रेष्ठ समजत असतो. त्याबद्दल शास्त्र काय निर्णय घेते ते मला सांगा. तुमच्या शास्त्रात जे सांगितले आहे त्यामुळें गोंधळ होतो. सगळे माझ्यासाठी रहस्यमय आहे, म्हणून मला ते सांगा".

नारद सांगू लागतात, "आश्रम चार आहेत. त्या प्रत्येकाचे ठरवून दिलेले कार्य असते. त्या कार्याच्या अनुषंगाने त्यांची कर्तव्ये सुद्धा सांगितली आहेत. ते सूज्ञ लोकांनी ठरवलेले आहे, समजले कां गवाला. आता मी तुला सांगतो त्या प्रत्येक आश्रमाची कर्तव्ये कोणती त्या प्रमाणे ते काम करत असतात. समाजाच्या जीवनात व्यवस्था रहावी व सगळी कामं सुरळीतपणे व्हावी ह्यासाठी ते आश्रम सांगितले आहेत. त्यांचा उद्देश

अखेरीस समाजातील माणसाला त्याचा मोक्ष साधणे शक्य झाले पाहिजे असाच असतो. कर्तव्य, हित आणि सुख असे तीन उद्देश जगण्याचे सांगितले आहेत हे तू जाणतोस. पाप न करणे, पुण्य वाढवणे त्यासाठी चांगुलपणाची शिकवण समाजातील प्रत्येकाला त्याच्या संस्कारात दिली जाते. ते कार्य ब्रह्मचर्यांश्रमी होत असते. ब्रह्मचर्याश्रमी तो भिक मांगून त्याचे जेवण मिळवतो ते करतांना त्याच्यांत नम्रपणा स्वाभाविकपणे येतो असे मानतात. नम्रपणा हा मोक्षासाठी महत्वाचा एक गुण विशेष आहे. त्याच वेळी तो समाजात कसे वागावयाचे त्याचे शिष्टाचार शिकतो. तो गुरूगृही रहात असल्याने तेथे देवता, पितर, अतिथी, नोकर, आश्रित अशा सगळ्यांना कसे सन्मानपूर्वक सांभाळावयाचे ते शिकत असतो जे शिक्षण त्याला त्याच्या पुढच्या आश्रमात म्हणजे गृहस्थाश्रमात उपयोगी येत असते. सत्य ह्या समजण्यास मुष्कील गोष्टी बद्दल तो त्या आश्रमात शिकतो. पुढे जीवनाच्या प्रत्यक्ष अनुभवात त्याची सत्याबद्दलची जाण वाढत असते. ते योग्य प्रकारे झाल्यास त्याच्यात निगर्वीपणा येतो. गर्वामुळे निर्माण होणारे दोष जसे बेपर्वाई, उद्धटपणा, हलगर्जीपणा त्याच्यात उत्पन्न होत नाहीत. तो स्वावलंबी होतो. स्वताच्या दुःखातून तो दुसर्याचे दुःख समजू लागतो. तेथे वेदाचा अभ्यास झाला तर त्याला आणखीन बर्याच गोष्टी समजू लागतात. ज्याला ज्ञान जमवावयाचे आहे तो इंद्रियांचे सुखोपभोग जसे सुगंध, सुमधूर गायन, रुचकर जेवण, नरम मऊ गादी (झोपण्यासाठी) ह्याची अभिलाषा ठेवणार नाही. तो रात्रीबेरात्र भटकणार नाही, दिवसा झोपणार नाही. उद्धटपणा, आळस, इतर सुखोपभोग तो नाकारेल कारण त्यांच्यात गुंतल्याने त्याची अध्यात्मिक प्रगति खुंटते. कांहीं चांगले मिळवण्यासाठी कांहीं चुकीच्या पण आकर्षक गोष्टींचा त्याग करण्यास तो शिकत असतो. स्वार्थ साधण्यासाठी दुसर्यांचे नुकसान केल्याने ते कर्मभोगाच्या नियमानुसार त्याच्याकडे येत असते हे त्याला समजते ते ह्याच आश्रमात. कारण हा आश्रम त्याला शिकवण्यासाठी आहे. आपली उच्चता सिद्ध करण्यासाठी दुसर्याला खच्ची करण्याची आवश्यकता नसते हे तो त्या आश्रमात शिकत असतो. स्वताची हिम्मत कशी वाढवावयाची ते तो तेथे शिकतो. आपल्यापेक्षा कमी हुशार असणार्यांचा अपमान तो करणार नाही. तो त्यांना हसणार नाही. गुणहीन परंतु, गर्वीष्ठ असलेले इतरांना

(गुणवान असले तरी) त्यांच्या सत्तेच्या जोरावर खच्ची करण्याचा मार्ग स्वीकारतात. खरा गुणी इतरांच्या दोषावर टीपणी न करता त्याचे कर्तृत्व सिद्ध करत असतो. सुगंधी फुलं त्यांचा परिमळ सोडत असतात पण त्याचवेळी ते शांतपणे असतात. त्यांच्या सुगंधाचे कौतुक आपसूकपणे होत असते, त्याना त्यासाठी कोणतीही शेखी मिरवावयाची नसते. तसे हे होत असते. हातच्या कंकणाला आरसा लागत नाही ह्या म्हणीप्रमाणे ते होत असते. कोणी कितीही खोटे सांगितले तरी ते स्वीकारले जात नाही. खरे गुण उभारून येतातच. मूर्ख कितीही फुशारकी करत राहीला तरी त्याला कोणी महत्व देत नाहीत. खोटे ते खोटे हे आपसूकपणे सिद्ध होत असते. परंतु, कांहीं काळ त्याची चलती राहू शकते जोवर त्याचा खोटेपणा सिद्ध होत नाही. सगळ्या धनात ज्ञानाचे (माहितीचे) धन सर्वश्रेष्ठ असते. खरे शहाणे त्यांच्या ज्ञानाचा चवाठा मांडत नाहीत. त्यासाठी इतर गुणीजनांच्या समाजात तो रहाणे पसंत करतो कारण तेथे त्याची खरी किंमत ओळखली जात असते. जेव्हां त्याला विचारले जाते तेव्हां तो त्याचे ज्ञान इतरांना दाखवतो, ती खरी पद्धत आहे. गुणीजनांनी गुणीजनातच रहावयाचे असते म्हणजे त्यांच्यावर गुणहीनांचा दबाव येत नाही. त्यांना न्याय मिळतो. माडाच्या झाडाखाली बसून जरी दूध प्याला तरी तो ताडी प्याला असें समजले जाते त्याप्रमाणे गैर वर्तणूक असलेल्यांच्या संगतीत असणार्यावर त्या संगतीचाच आरोप ठेवला जातो.

जेथे सन्मान नाही तेथे गुणीजन जाणार नाहीत. कांहीं जण संपत्ती मिळवण्यासाठी शिकत असतात. त्याच्य कामात पापबुद्धी असू शकते. कारण धन कमावण्यासाठी पाप करावेच लागते असा समज आहे. अशा लोकांपासून मोक्षार्थी दूर पळून जातो. ते करतांना त्याच्या गतकर्माच्या वासना त्याला उत्तेजन देत असतात. त्यालाच उपजत बुद्धी असें म्हणतात. ज्याचे जसे गत कर्म तशी त्याची उपजत बुद्धी असते. जेथे राजा पापबुद्धीचा आहे त्या राज्यात गुणीजनानी राहू नये. जेथे ब्राह्मणांची चलती असते तेथे ब्राह्मणांनी रहावे. ज्या वस्तीत स्वाहा, स्वाधः, विशट असें शब्द ऐकू येतात तेथे ब्राह्मणांनी रहावे. जेथे ब्राह्मणाना दक्षिणा मिळत नाही तेथे ब्राह्मणांनी राहू नये. चांगुलपणाची जेथे कदर होते तेथे सज्जनानी रहावयाचे असते. ज्या राज्याचा राजा चांगुलपणाची कदर करतो त्या राज्यात सदाचारी लोकांनी रहावयाचे असते.

अरे मुला, मी तुला सांगितले चांगल्या लोकांसाठी काय जीवन असावे. कोणते जीवन उत्तम ते त्याच्या त्याच्या प्रवृत्तीवर अवलंबून असते. आत्म्यासाठी काय उत्तम ते तुला समजले तर त्याप्रमाणे तुझे जीवन असले पाहिजे. समाजाने जे त्याला कर्तव्य आखून दिले आहे ते त्यांने केले पाहिजे. त्या समाजात जे सन्मान्य समजले जाते ते करावयाचे असते. जर ते तुला पसंत नसेल तर तुला जे योग्य वाटते ते ज्या समाजात सन्मान्य समजले जाते त्या समाजात तू गेले पाहिजेस. मी सुद्धा तसेंच करत असतो, त्या समाजात मी कधींच जात नाही जेथे मोक्षार्थीना महत्व नसते, जे भोगी आहेत व जे पापाचरणात मग्न आहेत तेथे मी जात नाही. तुला त्या प्रमाणे करावे लागेल. सदैव सदाचारी राहणी ठेव म्हणजे चांगल्या समाजात तुझी किंमत राहील.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे पंधरावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
# भाग एकशे सोळावा

युधिष्ठीर पुढे विचारतात, अहो पितामहा, मला सांगा माझ्या सारख्या राजाने ह्या जगात कसे वागावे जेव्हां मी राज्य वाढवण्याचा प्रयत्न करत असेन. कोणते गुणविशेष त्यांनी वाढवावेत लोभ आणि मोहामध्ये न अडकून घेता, ते सांगा.

भिष्म सांगतात, ते समजण्यासाठी मी तुला ते संभाषण सांगतो जे अरिष्टनेमी आणि सागर राजा मध्ये झाले होते.

सागर विचारतो, "अहो ब्राह्मणा, मला सांग असें काय केले म्हणजे मी सुखी होईन"?

भिष्म सांगतात, तर्क्ष्य वंशाचा अरिष्टनेमी ऋषी ज्याचे वादा तंत्राचे ज्ञान पूर्ण होते, ते ऐकल्यावर सांगतो, मोक्ष साध्य करण्याची प्रेरणा हिंच खरी प्रवृत्ती असते. सामान्य मनुष्य त्याच्या मुला बायकांत रमतो, धन, धान्यात अडकतो, असें समजतो कीं, हेंच जीवन आहे. मोठ्या मोठ्या शहाण्यांना ते समजत नाही. ते म्हणून मोक्षाचा विचार करत नाहीत. त्यांना माहीत नसते कीं, मोक्ष साधना ऐहीक सुखांपेक्षा जास्त हितकारक आहे. मी तुला सांगतो प्रेमाचे बंद कसे माणसाला अडकवून टाकतात ज्यांतून बाहेर येणे सहजा सहजी शक्य नसते. मुलांना जन्माला घालणे व त्यांना पोसून मोठे करणे व त्यानंतर त्यांची लग्न लावणे हेंच जीवन झालेले असते. त्यातच ते सुख शोधत असतात. तशातच त्याची बायको वृद्ध होते. तिच्या पासून झालेल्या मुलांत तो गुंतून जातो असा कीं, त्याला जीवनाचा मुख्य उद्देश मोक्षार्थ आहे ह्याचा विसर पडतो. मोक्षार्थासाठी ऐहिक जीवनात जास्त रमावयाचे नसते हे तो विसरतो. ऐहिक जीवनात रमलेला त्याच्या मृत्यूनंतर आणखीन मोठ्या त्रासात असतो जेव्हां तो पिशाच्च योनीत असतो. तेथे त्याच्या वासना त्याला भंडावून सोडत असतात. मिळालेल्या सुखाचा त्याला त्रास होऊ लागतो. इंद्रियांच्या सुखात रमल्याने त्याला त्याबाहेर येता येत नाही. त्याला त्या सुखाचे व्यसन लागल्यासारखे असते. त्या बंधनांतून कसे निघावयाचे ते मी तुला सांगितले आहे. ते पुन्हा सांगतो. जीवन भराच्या सवयी कशा सोडावयाच्या ते सांगतो. जर तुला मोक्षपदाची इच्छा असेल तर ते उपयोगाचे ठरेल. जर तू ते करू शकलास तर

तू चिरंतन सुखाचा अनुभव घेशिल. सुखाच्या शोधात गुंतलेला ते न मिळवताच संपत असतो. तसे झाले तर त्याचे त्या जगातील (पिशाच्च योनीतील) जीवन हाल अपेष्टांनी भरलेले असते. त्याचे पिशाच्च सतत दुःखमय अवस्थेत असते. ते फारच वाईट असते. मोक्षार्थी त्याच्या भोवतीच्या सगळ्यां गोष्टींकडे त्रयस्थतेच्या दृष्टीने पहात असेल. त्यातून मिळणार्या सुखा बद्दल तो नेहमी साशंक असेल. तशी मनोरचना झाली कीं, ती काल्पनिक सुख धुसर होतात. ह्या जन्मातील जे सुख (दुःख) असतांत ती सगळी आदल्या जन्माच्या कर्मविपाकाचा प्रभाव असतात. ह्या जन्माचे कांहीं नसते. कारण सगळे जन्म एकमेकांना साखळीसारखे बांधलेले असतात. हा नियम सगळ्या जीवांना सारखा लागतो. ह्या जन्माचे सगळे भोग गेल्या जन्माचे कर्मविपाक असतात. ते न मांगता आपसूकपणे येत असतात. आप्त असतात व कालांतराने निघून जातात त्यात खरेतर अडकून घेण्यासारखे कांहींच नसते तरी मनुष्य त्यात गुंतून घेत असतो. त्यामुळें नको त्या विवंचनात तो अडकून जातो. त्यातील फोलपणा त्याला समजला तर तो त्यातून मुक्त होण्यासाठी प्रयत्न करू लागतो. जर आप्त हा एक भ्रम आहे मग आपले कोण आहे? असा प्रश्न पडतो. त्यानंतर त्याच्या लक्षात येते कीं, तो खरेतर एकटाच आहे. हे जेव्हां समजते तेव्हां त्याला मोक्षाची ओढ लागण्याची शक्यता निर्माण होते. कोणी कोणाचे नसते हे आप्तांच्या मृत्यूने समजू लागणे त्यासाठी जरूरीचे असते. जर जीवनातील सगळ्या गोष्टी क्षणभंगूर आहेत हे समजले तर त्याची जीवनातील तात्पुरत्या सुखांबद्दलची ओढसुद्धा कमी होते. शरीर टिकवण्यासाठी तो खाऊ लागतो. त्याला सुखापेक्षा त्याशिवाय रहाणे जास्त श्रेयस्कर वाटू लागते. तो त्या मनस्थितीत सुख व दुःख ह्यांच्या पासून दूर गेलेला असतो. शरीराच्या व मनाच्या सुखांच्या अपेक्षा त्याला दुसरे कांहींतरी जास्त आवश्यक वाटू लागते. सुखा बद्दलच्या त्याच्या कल्पना बदलत असतात. जे एकेकाळी त्याला सुख वाटत होते ते त्याला सुख वाटेनासे होते. मोक्ष प्राप्ती व धन प्राप्ती हे सारखेच समजू नकोस. धनासाठी प्रयत्न करावे लागतात. मोक्ष प्राप्तीसाठी ऐहिक सुखांचा त्याग करावयाचा असतो. मोक्ष त्यागातून प्राप्त होत असतो त्यासाठी कांहीं करावयाचे नसते तर कांहीं न करण्यात मोक्ष असतो. ऐहिक सुखातील निरर्थकता ज्याला समजली तो मोक्षार्थी झाला असें समज. स्वार्थाने धडपडणार्यांचे हाल

तो पहातो तेव्हां त्याला ऐहिक जीवनातील निरर्थकता जाणवू लागते. ते ऐकून सागर मोक्षार्थाचे महत्व समजतो.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे सोळावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे सतरावा

युधिष्ठीर विचारतात, "अहो कुरु वंशाचे पितामहा, मला नेहमी एक कुतूहल वाटते त्याबद्दल आपल्याकडे प्रश्न विचारत आहे, ते असें कीं, ऋषी कवी ज्यांना उशनस म्हणून सुद्धा ओळखले जाते ते दानवांच्या बरोबर असतात व देवांना विरोध करत असतात त्याचे कारण काय? दुसरा प्रश्न मला नेहमी पडतो तो असा कीं, दानव आणि देव ह्यांच्यामध्ये नेहमी वैरभाव कां आहे? ऋषी कवी अमर झाले आहेत त्यांच्या तपस्येमुळें, मग त्यांना शुक्र कां म्हणतात. त्यानी अशी कोणती साधना केली कीं, त्यांना ते उच्चपद मिळाले आहे? एवढे सामर्थ्य असतांना ते नभाच्या मध्यभागी कां नाही जात? अशा माझ्या प्रश्नांची उत्तर आपण देऊन माझ्या माहितीत भर घालावी".

भिष्म त्याला सांगू लागतात, "जे घडले त्याचा वृत्तांत मी तुला सांगतो तो नीटपणे ऐक. जे मला समजले इतरांकडून तेंच तसेच मी तुला सांगणार आहे. उशनास हा भृगूचा वंशज आहे. तो सुरूवातीपासून देवांच्या विरुद्ध वागत असें त्याचे कारण सुद्धा तसेंच होते. राजर्शी कुबेर जो यक्षांचा व राक्षसांचा राजा आहे, तो इंद्राच्या खजिन्याचा मुख्यत्यार आहे. एकदा योगी उशनस कुबेराच्या खजिन्याचे त्याच्या योगिक सामर्थ्याने अपहरण करतो त्यासाठी तो शंकराचे रुप घेतो. कुबेराला समजते कीं, त्याची संपत्ती पळवली गेली आहे, तो फार नाराज होतो. त्याला चिंता होते व तो रागावतो. तो महादेवांकडे तक्रार करण्यासाठी जातो. तो त्याची तक्रार त्या बहुरुपी बहुढंगी देवादि देवांकडे मांडतो. तो उमापतिला सांगतो कीं, उशनासने त्यांचे रुप योगीक सामर्थ्याने घेऊन ते केले आहे. उशनास ते करून त्यानंतर महादेवाचे रुप सोडून गेला आहे. ते समजल्यावर महादेवांला खूप राग येतो. त्यांचे डोळे लाल होतात. ते त्यांची समशेर हातात घेऊन उशनासाचा वध करण्यासाठी सज्ज होतात. ते विचारु लागतात, "कोठे आहे तो"? त्याच वेळी उशनासाला त्याच्या अंतर्ज्ञानी शक्तीने महादेवांचे ते शोधणे समजते. तो गुपचुप रहातो. त्याला कळेनां त्यांने काय करावे. तेथून पळून जावे कां तेथेच रहावे कां आणखीन कांहीं करावे, ते तो ठरवत असतो. शेवटी तो सुक्ष्म रुप

घेऊन महादेवाच्या समशेरीच्या अग्रावर जाऊन बसतो. महादेवांना समजते कीं, उशनास त्याची तपस्या पूर्ण करून तयार झाला आहे व आता तो त्यांच्या समशेरीच्याच अग्रावर बसला आहे. तो समजतो कीं, तो उसनसाला त्या शस्त्राने मारू शकत नाही. महादेव त्या लांबलचक समशेरीला वाकवून त्याचे धनुष्य करतात. त्यानंतर त्याला पिनाक असें नांव पडले. ते केल्याने भार्गव (भृगूच्या वंशजाना भार्गव म्हणतात) त्याच्या हाताच्या पंजात येतो. ते त्याला त्यांच्या तोंडात टाकतात. त्याला गिळून टाकतात. उशनास त्या उदरात भटकत असतो.

युधिष्ठार बोलतात, "अहो पितामहा, तो त्या पोटात कसा फिरू शकतो? तो ब्राह्मण त्याच्या पोटात भिरत असतांना महादेव काय करतात"?

भिष्म सांगतात, त्यानंतर कांहीं काळानी महादेव एका पाण्याने भरलेल्या कुंडात ध्यान करण्यासाठी जातात. त्यांचे ध्यान पूर्ण झाल्यावर ते त्यातून बाहेर येतात. त्यावेळी ब्रह्मदेव त्यांना भेटतात. त्यांच्या तपस्येची चौकशी करतात. ज्याचे चिन्ह वृषभ (नंदी) आहे, बोलतात, "माझे तप चांगले झाले आहे. परंतु, त्यांच्या लक्षात येते कीं, त्यांच्या पोटात असलेला उशनास जास्त शक्तीमान झाला आहे. त्या नव्याने प्राप्त झालेल्या अध्यात्मिक बळाने व कुबेराच्या कडून चोरलेल्या ऐहिक संपत्तीने तो फारच बलवान झाला होता. त्यानंतर महादेव पुन्हा तपस्या करू लागतात. उशनास मात्र आता चिंता करू लागला. त्याला त्या पोटातून बाहेर कसे पडावयाचे ते समजत नव्हते. तो त्या विशाल उदरात भटकत होता. तेथे तो शंकराची स्तुती असलेली कवन गाऊ लागला. तो त्या उदरातून कसे बाहेर पडावयाचे शोधत होता. महादेव मात्र त्याला पोटातच धरून ठेवत होते. उशनास महादेवाकडे दयेची भिक मागत होता. महादेव त्याला सांगतात कीं, तो त्यांच्या गुदद्वारातून बाहेर जाऊ शकतो. कारण त्यांना त्यांच्या देहातील इतर द्वारं बंद केली आहेत. उशनास महादेवाच्या उदरातील अग्नीने भाजला जात होता. त्याला ते सहन होत नव्हते. अखेरीस त्याला गुदद्वार सापडले व त्यातून तो बाहेर येतो. त्यामुळें त्याला शुक्र असें नांव मिळते. त्याच कारणांने त्याला आकाशातील मध्य जागा सापडत नाही. त्याला बाहेर पडलेले पहाताच महादेव त्यांची तलवार घेऊन त्याला शिक्षा करण्यासाठी सज्ज होतात. त्यावेळी माता उमा मध्ये

पडते, महादेवांचा राग कमी करते, ती सांगते कीं, ब्राह्मणाचा वध करणे योग्य नाही. त्यानंतर उसनास तिला त्याची आई समजू लागला. ती देवाला बोलते, "ह्या ब्राह्मणाची हत्त्या करणे तुम्हाला शोभत नाही. कारण तो तुमच्या उदरातून आला आहे. त्याचा वध करणे कोणालाही शक्य नाही. शिवाय आता तो आपला मुलगा झाला आहे. पुत्रवधाचे दुषण नको लावून घेऊया".

भिष्म पुढे सांगतात, त्या तिच्या बोलण्याने शांत झालेले भव त्याला अभय देतात व त्याला जेथे जावयाचे असेल तेथे जाण्याची मुभा देतात. त्या दोघाना लवून प्रणाम करून तो तपस्वी त्याच्यासाठी योग्य अशा ठिकाणी (दानवांचे ठिकाण) निघून जातो. अशी आहे उशनसाची कथा जी मला समजली होती, ती मी तुला सांगितली आहे.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे सतरावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे अठरावा

युधिष्ठीर विचारतात, "आपले बोल मला अमृतासारखे वाटतात. ती कोणती सत्कर्म आहेत जी माणसाला ह्या आणि नंतरच्या जगात उपयोगाची असतात"?

भिष्म सांगतात, त्याकरता मी तुला जनक राजाचे सांगतो. त्यांनी असाच प्रश्न ऋषी पराशराला विचारला होता. पराशर महाज्ञानी होते त्यांना सगळ्या कर्तव्यांची चांगली माहिती होती. त्यानी तेव्हां उत्तर दिले जे एका राजासाठी योग्य होते, ते सांगतो.

पराशर सांगतात, चांगुलपणा सगळ्या लोकांत श्रेयस्कर असतो त्यांने मोक्षसुद्धा साधता येतो. वेदातसुद्धा ते उत्तम कार्य म्हणून सांगितलेले आहे. त्यात चार वर्णाच्या लोकांचे चार प्रकारचे चांगुलपणाचे कर्तव्य सांगितले आहेत. त्यात ब्राह्मणाला दान देणे, राजाला कर भरणे, वैश्याने कृषी करणे, आणि शुद्राने इतरांना मदत करणे असें सांगितले आहेत. त्यांच्या उपजिवीकेसाठी ते पाप अथवा पुण्य मार्गाने कार्य करत असतात. गत जन्मातील कृत्यांनुसार त्यांना काम करण्याची बुद्धी होत असते. बीज असल्याशिवाय रोप उगवत नाही तसेंच आधीचे कर्म (बीज) असल्याशिवाय नवीन कर्म प्रारंभ होत नाही हा सृष्टीचा नियम आहे. अंदाज करून ते समजण्यासारखे नसते. गंधर्व, दानव आणि इतर देवता त्यांच्या स्वभावाप्रमाणे वागतात त्यात त्यांच्या गत जन्माच्या कर्माचा कांहीं संबंध नसतो. गेल्या जन्मात काय कर्म केले ते ह्या जन्मात कोणालाही आठवत नाही. आपल्या ह्या जन्मात काय भोगावे लागते त्याचा संबंध जरी गतकर्माशी असला तरी ते सिद्ध करता येत नाही. त्यासाठी वेदात जसे सांगितले आहे तसे आपण कामं करावयाची असतात. अपयशाने खचलेल्या माणसाला त्याच्या सत्कृत्याची कल्पना येत नाही परंतु, जसे तो त्यातून मुक्त होतो त्याला त्याची फळं मिळू लागतात. चांगल्या कामाची फळं संपल्यानंतर पापाची फळं त्याला भोगावी लागतात. जे भोगावे लागते ते आपल्याच कर्माचे असते. ज्या वर्णाचा असेल त्या वर्णाचे गुण त्याच्यात असले पाहिजेत. जर नसतील तर त्याचे हसं होते. म्हणजे ब्राह्मण विद्वान असला पाहिजे, क्षत्रिय हिम्मतवान

असला पाहिजे,  वैश्य शेतीत आणि व्यापारात हुशार असला पाहिजे आणि शुद्र आळशी नसावा.  बायकांच्या बाबत जी उच्च दर्जाच्या वर्तणूकीची आहे ती प्रमाण समजली जाते. ती तिच्या गृहकृत्यात हुशार असली पाहिजे.  योगी निरिच्छ असला पाहिजे,  राजा नसलेले राज्य,  प्रजेबद्दल प्रेम नसलेला राजा असें असेल तर ते निराशजनक असते.
मोक्ष धर्म पर्व भाग एकशे अठरावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग एकशे एकोणीसावा

पराशर सांगतात, ज्याच्या रथाचे घोडे (रथ म्हणजे शरीर आणि घोडे म्हणजे इंद्रियं) त्याच्या नियंत्रणात असतात तो बुद्धिमान समजला जातो. अशा माणसाने ब्रह्माला दिलेले ध्यान स्तुत्य असते. तो त्याचे आयुष्य भोगांत रमण्यात व्यर्थ घालवत नाही. असा मनुष्य त्याच्या सत्कृत्यानी त्याची प्रगति करत असतो. त्याच्या प्रभावळीचा रंग चांगला होतो. असा त्या सगळ्या गोष्टी करण्याचे थांबवतो ज्यामुळें तो रजस अथवा तमस प्रभावळीचा होईल. त्याच्या सदाचाराने तो शुभ्र रंगाची प्रभावळ प्राप्त करत असतो. पापकृत्य करणारे स्वताचाच वध करत असतात परंतु, ते त्यांना समजत नाही. तपस्या करून तो जे पुण्य मिळवतो त्याने त्याची पाप धुतली जातात असे कांहीं ऋषी सांगतात. जाणून बुजून पाप कृत्य केल्यास त्याचे प्रायश्चित्त त्याला करावे लागते. अज्ञानाने झालेल्या कृत्याची त्याला सजा होत नाही. ऐहिक फायद्यासाठी सुद्धा पापं करू नयेत. केलेल्या पाप कृत्याचे फळं त्याला ह्या नाहीतर नंतरच्या जन्मात भोगावी लागतात. त्या पापाच्या निवारण्यासाठी जर तो कांहीं पुण्य कर्म करतो तर त्याला त्या पापाचे फळ आणि त्या प्रमाणे पुण्याचे फळ असें दोनही भोगण्यास मिळत असतात. परतु, वेद सांगतात, अज्ञानाने झालेल्या अपकृत्याचे निवारणे चांगल्या कृत्याने शक्य असते. परंतु, मुद्दाम ठरवून जे पाप केले त्याचे निवारणे शक्य नसते. त्याची वाईट फळं त्याला भोगावीच लागतात. गतपापकर्माचे त्रासदायक भोग त्याला भोगावेच लागतात जरी तो तपश्चर्या करत असेल. ते भोग झाल्यावर तो तपश्चर्येची फळं भोगू शकतो. म्हणजे पापाचे धुतले जाणे हे शक्य नसते. जर कोणी सांगतात कीं, पापाचे धुतले जाणे तीर्थयात्रेने होते तर तो खोटे बोलत असतो. कदाचित तो त्याबद्दल अज्ञानी असतो. जे पापाचे तेंच पुण्याचे असते. मोठ्या पापाचे मोठे फळं आणि सुक्ष्म पापाचे सुक्ष्म फळ असते. ते प्रमाणबद्ध असतात. ना कमी ना जास्त असें ते असतात. चांगले काम करण्याने आधीच्या पुण्यसंचात वाढ होत असते. तसेंच पापाचेसुद्धा असते. त्या सगळ्यांनी अध्यात्मिक उर्जा दोलायमान होत असते. राजाने त्याची अध्यात्मिक उर्जा वाढवण्याचा प्रयत्न केला

पाहिजे. त्याचे कर्तव्य संपल्यावर तो त्याच्या पवित्र अग्नीसह वनात जाईल आणि पुढची तपस्या करत असेल. वयाच्या कोणत्या काळात ते करावयाचे त्याला कांहीं नियम नाही. आत्मसंयमाने तो त्याच्या आत्म्याचे शुद्धीकरण करत असेल. चांगुलपणातील भूतदया जास्त महत्वाची असते जेव्हां तो इतर प्राण्यांशी वागत असतो. असे केले तर तो सदैव आनंदी असेल.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे एकोणीसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग एकशे विसावा

पराशर पुढे बोलतात, "ह्या जगात कोणी कोणाचे भले करण्याचा प्रयत्न करत नसते. कोणी कोणाला दान सहजासहजी करत नसते. प्रत्येक जण स्वताच्या भल्यासाठी सगळे करत असतात. प्रसंगी माणसे स्वताच्या जवळच्या आप्तांनासुद्धा विसरलेली आपण पहातो. प्रतिष्ठीत माणसाला भेट देणे अथवा त्याकडून भेट घेणे मोठ्या मानाचे समजले जाते. तरी त्यात भेट देणे घेण्यापेक्षा जास्त मोठे समजले जाते. योग्य मार्गाने संपत्ती मिळवणे आणि वाढवणे आणि ती सांभाळणे पुण्य कमावण्यासाठी हे चांगले समजले जाते. चांगल्या मार्गाने धन कमावणारा ते करत असतांना कोणाला दुःख देणार नाही. त्यात प्रत्येकाचे स्वताचे गुण असतील. अगदी पाणी देतांना मग ते थंड किंवा कोमट असले तरी ते अतिथीला देण्याचे श्रेय त्याला मिळत असते. ते "देण्याचे", श्रेय त्याला मिळत असते. देण्याची "इच्छा", महत्वाची असते काय दिले ते महत्वाचे नसते. भुकेलेल्याला खाणे देणे हे पुण्यकर्म आहे. त्याच्या बदल्यात कांहीं अपेक्षा नसेल तर ते आणखीन मोठे पुण्य कर्म ठरते. रंतिदेवाने ऋषींना कंदमुळं, फळं देऊन पुण्य कमावले होते. सिविचा मुलगा सुर्याला तसेंच दान करून श्रेय मिळवतो. जन्म घेणारे सगळे देवांचे, पितरांचे आणि स्वताच्या नोकरांचे, अतिथींचे आणि स्वताच्या देहाचे ऋणी झालेले असतात. ती ऋण फेडण्यासाठी त्याला वेदाचा अभ्यास करावा लागतो, नाहीतर यज्ञ करतो, श्राद्ध करतो, दानं करतो, आणि स्वताच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी चांगुलपणा आचरणात ठेवतो. कर्तृत्व गाजवून तो स्वताच्या देहाचे ऋण फेडत असतो. अशारितीने तो सगळी ऋण फेडतो तेव्हांच त्याचा मोक्ष मार्ग सुकर होतो. उशनास पार्वतीची स्तुती करून आकाशात एका ग्रहाची जागा कायम मिळवतो. अनेक ऋषी जसे असित, देवल, नारद, पर्वत, कर्कशिव, जमदाग्नीचा राम, तंड्य, वसिष्ठ, जमदाग्नी स्वतः, विश्वामित्र, अत्री, भारद्वाज, हरीष्मश्रृ, कुंद्धर, श्रृतश्रवस, विष्णूची पुजा करून त्यांच्या उच्च स्थानी गेले. कित्येक नालायक केवळ विष्णूची पुजा करून उच्चपदाला गेले आहेत. सदाचाराने जे कमावले ती खरी कमाई

असते.  व्यभिचाराने कमावलेले पापाचे धनी होतात.  वेदाचा अभ्यास करणारे तीन अग्री सांभाळतात,  दक्षिणा अग्री,  ग्राहपत्य अग्री आणि अहवन्य अग्री.  जर ते सांभाळता येत नसतील तर त्यांचा त्वरित त्याग करावा,  विझवून अथवा कोण्या योग्य ब्राह्मणास देऊन. जो चांगुलपणाने त्याचे जीवन जगतो तो पुज्य असतो.  मग तो देव मानत नसला तरी हरकत नाही.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे विसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे एकविसावा

पराशर बोलतो. शुद्र इतर वर्णाच्या लोकांची प्रेमळपणे सेवा करून चांगुलपणाचे श्रेय मिळवत असतो. शुद्र चांगल्या लोकांत राहिल. त्याप्रमाणे उद्योग करण्यात शहाणपणा समजेल. त्यामुळें त्याचे कल्याण होईल. जास्त धन मिळते म्हणून तो वाईट लोकांत व वाईट कामात जाणार नाही. असे केले तर त्याचा मोक्षमार्ग सुकर होत असतो. कारण पाप मार्गाने मिळालेले धन अखेरीस त्याचा अध्यात्मिक र्हास करत असते. तुमचा वर्ण कोणताही असो, अध्यात्मिक उन्नती हांच जीवनाचा अंतिम उद्देश मानणे सूज्ञतेचे लक्षण असते. अध्यात्मिक दृष्ट्या सावध असलेला शुद्र अध्यात्मिक दृष्ट्या बेसावध असलेल्या ब्राह्मणापेक्षा श्रेष्ठ असतो. केवळ बुद्धी कमी असल्याने तो शुद्र ठरत असतो तरी तो इतरांकडून शहाणपण घेऊन त्या बुद्धीची कमतरता भरून काढू शकतो. म्हणून वृद्ध अनुभवी शुद्र ब्राह्मणाच्या, क्षत्रियाच्या किंवा वैष्याच्या योग्यतेचा समजला जातो. असा अनुभवी शुद्र राजाला सल्ला देऊ शकतो. कशाही परिस्थितीत जो चांगुलपणाचा त्याग करत नाही तो वेदाचे पालन करत आहे असे समजावे. जो राजा चांगल्या लोकांचे पशुधन त्यांच्याकडून काढून चांगुलपणा नसलेल्या लोकांना भेट देतो तो पाप करत असतो. विधात्याने धात्री जन्माला घातली. तिचा मुलगा सगळे उत्तम गुण धारण करून होता. वैश्य तिची पुजा करतात. ज्यामुळें ते पशुधन सांभाळत असतात. क्षत्रिय सगळ्यांचे वाईट लोकांपासून संरक्षण करत असतात. शुद्र त्या कामात त्यांना (वैश्य आणि क्षत्रिय) मत करत असतात. प्रत्येक वर्णाचा त्याचे काम करत असेल तर सगळा समाज आनंदात राहू शकतो. चांगुलपणाचे पालन जर सगळे मनुष्य आचरणात आणतील तर समाज सुखी असेल. तेथे कृतयुग अवतरते मग प्रत्याक्षात कोणतेही युग त्या भागात चालू असेल. जेव्हा तसे होत नाही, वर्णव्यवस्था निकामी होते. राजा जर सत्पात्र दानं, भेटी देत असेल तर समाजात गुणवत्ता सुधारत असते. ज्या भेटी व दानं वशिल्याने दिल्या जातात त्यामुळे समाजात पापाला शिरकाव करण्यास मदत करत असतात. मोक्ष धर्म पर्व भाग एकशे बाविसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे तेविसावा

पराशर बोलतात, ब्राह्मण दानं आणि भेटी घेऊन श्रीमंत होतात. क्षत्रिय युद्ध करून जिंकून संपत्ती मिळवतात, वैश्य त्याचे उद्योग करून धन संचय करतो, शुद्र त्याच्या कष्टाची किंमत म्हणून जे मिळेल त्यात समाधान मानत असतो. ब्राह्मण गरज वाटल्यास क्षत्रियाचे अथवा वैश्याचे काम करू शकतो. त्याप्रमाणे इतर द्विज सुद्धा इतर द्विजांचे कार्य स्वीकारू शकतो, पण शुद्र त्याच्या अल्पबुद्धीमुळे तसे करू शकत नाहीत. तरी तो पशुपालन आणि कृषी करू शकतो. तसेंच इतर कलाकुसरीची कामं करू शकतो ज्यासाठी विष्लेशणात्मक बुद्धी लागत नाही. विष्लेशणात्मक बुद्धी हे द्विजांचे विशेष असते. विष्लेशणात्मक बुद्धीमुळें मनुष्य विवेक करतो व निर्णय घेऊ शकतो. ती क्षमता शुद्रांत नसते. तरी आधी सांगितल्याप्रमाणे वयाने अनुभव आल्यानंतर यथावकाश ती बुद्धी वृद्ध शुद्रात येत असते त्याप्रमाणे त्याला योग्य समाजिक स्थान देण्याची व्यवस्था वेदांनी केली आहे. त्याप्रमाणे नाटक, अभिनय, नकला, विदूषक, कठपुतळी बाहुल्यांचे खेळ, कसरती, जादू, तमाशा व त्यासाठी लागणारे साहित्य ह्यांचे व्यवसाय शुद्र करू शकतो त्या व्यवसायांत द्विजानी जावयाचे नसते. ते शुद्रांसाठी राखीव असतात वेदाच्या आदेशानुसार. थोडक्यात समाजाची करमणूक करण्याचे धंदे तो करू शकतो. त्यात तो धन मिळवू शकतो. ते त्याचे असते. शुद्र दुकानदारी करू शकतो. तो राजासाठी हेरगिरी करू शकतो. त्याशिवाय सगळ्या द्विजांना त्यांचे मदतनीस म्हणून तो काम करू धन मिळवू शकतो. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे जेवढ्या गोष्टी करण्याची मुभा शुद्राला असतात धन मिळवण्यासाठी तेवढ्या द्विजांना नसतात. परंतु, तसा शुद्र अविचारामुळें इतर दोषांत (व्यसनं, छंद, फंद) शेवटी दरिद्री रहातो कमावलेले सगळे घालवून बसतो. ज्या शुद्रामध्ये तसले दोष नसतात तो उच्चपदाला जाऊ शकतो व राजाला प्रिय होतो.

यशामुळें माणसात अहंकार वाढतो. त्यातून वासना, गर्व, क्रोध, लोभ असे पापकारक दोष उत्पन्न होतात. त्यामुळे चांगुलपणा नष्ट होतो. तशा वागण्याला

असुरीसंपदा म्हणतात (भगवत गीतेत पहावे). असे झाले कीं, पापाचरण सुरू होते. त्या परिस्थितीत देव महादेवाला गार्हाण करतात कीं, कांहीं करावे. महादेव ते पापमय लोक संपवण्यासाठी रोग पसरवतो व त्यात दोनही प्रकारचे (चांगले आणि वाईट) मारले जातात. तसे झाले कीं मनुष्य जगात जागृती येते व जर तसे झाले तर परिस्थिती सुधारते. नाहीतर आणखीन नाश होत रहातो. असे सांगतात कीं, प्राचीन काळी असे सतत होत होते त्यावर उपाय म्हणून सप्तर्षींनी वसवाचे (इंद्र) स्थान तयार केले व यथायोग्य देवाची त्या जागी नेमणूक होत गेली. तो इंद्र परिस्थिती नियंत्रित करण्यासाठी विविध उपाय योजना करत असतो. तरी असुरीसंपदा नाहीशी झाली नाही. ती कधी नाहीशी होणारसुद्धा नाही कारण ती माणसाच्या मुलभूत दोषात असते. म्हणून मी सांगतो अरे राजा, तू चांगुलपणावरील लोकांचा विश्वास कायम राहील असे राज्य चालव. अधिकाराचा गैरवापर करू नकोस. त्यासाठी तुझ्या प्रजेवर असें संस्कार करावेत ज्यांमुळें माणसाला सतत आठवण असेल कीं, त्याच्या जीवनाचा उद्देश मोक्ष प्राप्ती आहे. ऐहिक सुखांपासून जे क्षणभंगूर सुख मिळते त्याच्या फोलपणाची त्याला जाणीव होईल असे संस्कार राजा त्याच्या प्रजेच्या मनावर करेल. जो ते करू शकतो तो राजा स्वर्गात जाईल.

तो राजा त्याच्या प्रजेला पटवेल कीं, अपमार्गाने धन आणि सुख मिळवणे अंतिम दुःख देणारे असते. तू तसा राजा हो. अरे राजा एक गोष्ट लक्षात ठेव कीं, पाप आणि पुण्य फक्त माणसाच्या योनीसाठी आहेत. इतर प्राणी पाप आणि पुण्य करत नसतात. म्हणून त्यांचे नियम भिन्न असतात. त्याची जबाबदारी केवळ माणसाची असते. कारण फक्त माणसाच्या योनीतून तो आत्मा मोक्षाचा मार्ग चोखाळत असतो. इतर योनी केवळ भोग योनी असतात.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे बाविसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
# भाग एकशे तेविसावा

पराशर सांगतात, गृहस्थाश्रमाच्या माणसाचे जीवन कसे असावे ते सांगितले आता तुला सांगतो वानप्रस्थाश्रमीचे जीवन कसे असावे. त्यात तपस्या म्हणजे काय ते सांगतो. माझे ऐक, राजस आणि तमस प्रवृत्तीच्या मनोवृत्ती पहाता, त्यांना अनेक प्रकारची आकर्षणं व त्यातून कुतूहलं असतात. गृहस्थात ते जास्त असतात. तो संसाराच्या गरजा प्रमाणे विविध नवीन गरजा वाढवत असतो. वस्तुतः ते योग्य असते कारण गृहस्थाश्रम माणसाच्या शरीराच्या पोषणासाठी असतो. ब्रह्मचर्याश्रम शिक्षणार्थ असतो त्याप्रमाणे त्याचे शिक्षण झाल्यावर तो संसाराची विविध सुख भोगण्यासाठी, जी प्रामुख्याना शरीराशी संबंधित असतात अनुभवण्यासाठी असतो. ती सुख किंवा त्याच्या अनुषंगाने येणारी दुःख पिडा ह्यांचा तो अभ्यास करतो व त्यातील क्षणभंगूरता तो समजत असतो. एकापरीने तेसुद्धा एक शिक्षणच असते. ते न करता, जर तो त्यांत अंधपणे (अभ्यास न करता) गुंतून जाणे श्रेयस्कर समजत असेल तर तो त्यात अडकला असे होते. तसे झाले तर त्याचे पुढील आश्रम व्यर्थ ठरू शकतात. शरीराच्या विविध सुखांत अडकलेला तो समजत नाही कीं, अशा क्षणभंगूर सुखांच्या पेक्षा जास्त नित्य अशी कांहीं सुख सुद्धा आहेत. परंतु, जेव्हां त्याला संसाराची सुख भोगतांना कधी त्यातील दुःखाच्या झळा लागतात. त्याच्या आगीने त्याला त्या सुखांपेक्षा वेगळी सुख असू शकतात अशी शंका येऊ लागते. त्यांच्या शोधात तो जाऊ लागण्यासारखी त्याची मनस्थिती होत असते. म्हणजे ते होण्यासाठी त्याला संसारातील दुःख झेलावे लागणे आवश्यक ठरते. जर समजा त्याला त्याच्या संसारी जीवनांत फक्त सुखं मिळाली तर कदाचित तो त्या इतर सुखांचा विचारसुद्धा करणार नाही. असा गृहस्थ त्या अध्यात्मिक जीवनाबद्दल अनभिज्ञ रहातो. म्हणजे संसारी सुखांच्या बरोबर दुःख झेलावी लागणे आवश्यक असते. अशा दुःखांमुळें तो सगळ्या संसारी जीवनांकडे निरीक्षकाच्या दृष्टीने पाहू लागतो. त्याचप्रमाणे तो इतरांचे जीवनाचे अनुभव सुद्धा पहात असतो. त्यातून त्याचे जीवनाच्या विविध चांगल्या वाईट अनुभवांचे न कळतपणे शिक्षण होत असते.

अशा कांहीं अनुभवांतून त्याला चिरंतन सुखाची इच्छा सुरू होते. शरीराच्या क्षणभंगूर सुखांपेक्षा अध्यात्मिक चिरंतन सुखा कडे तो स्वाभाविकपणे खेचला जात असतो. परंतु, त्यासाठी त्या गृहस्थाला आणि गृहीणीला संसारी जीवनात दुःखांचे अनुभव येणे आवश्यक असते एरवी ते शक्य नसते. जर तसे झाले तर तो वेदाचा अभ्यास करण्यासाठी प्रेरित होतो. अरे राजा, तुला समजले असेल कीं, जीवनातील दुःख किती मोलाचे काम करत असतात. जर दुःख नसती तर कोणी मोक्षाच्या शोधात गेले नसते. एका मागेमाग एक दुःख ज्याला अनुभवावी लागतात तो अधिक त्वेषाने त्याच्या शोधात जात असतो. त्याकरता तो पुन्हा पुन्हा शोध घेत रहातो त्यातून तपस्या करण्याची प्रेरणा त्याला मिळते. अशा अनुभवातून सगळ्या वर्णांचे लोक जात असतात. मनुष्याचे मन विविध काल्पनिक सुखांची स्वप्ने पाहू लागते. कोणी आपल्याला मदत करणार आहे अशी आशा तो बाळगतो. त्यातून त्याला देवाची आठवण येते. तो त्यांच्यावर एकचित्त करतो. त्यालाच तपस्या म्हणतात. एकचित्त करून ध्यान तो आपसूकपणे करू लागतो. प्राचीन काळी ऋषी असेंच तपस्या करू लागले होते हे लक्षात घे, राजा. आदित्य, वसू, रुद्र, अग्नी, अश्विनी, मरुत, विश्वदेव, साध्य, पितर, यक्ष, राक्षस, गंधर्व, सिद्ध असे अनेक श्रेणीचे तपस्वी त्यातून तयार झाले आहेत. संसारी जीवनातसुद्धा यशस्वी होण्यासाठी माणसाला विविध प्रकारच्या तपस्या (एक चित्ताने अथकपणे काम करत रहाणे) कराव्या लागतात. त्यातून त्यांना यश मिळत असते. अपेक्षा पूर्तीतून आनंद आणि सुख मिळतात आणि अपेक्षा भंगातून दुःख आणि प्रसंगी क्रोध मिळतात. अपेक्षाभंग माणसाला विचार करावयाला लावते. त्यातून त्याला मार्ग सापडतात. त्यावर तो प्रयोग करू लागतो. त्यातून त्याला विविध योजना सुचतात. वेदातील ज्ञान अशाच ऋषींनी शोधून काढले आहे. फार प्राचीन काळापासून हे संशोधन चालू आहे, राजा. त्यातून मोक्षाचे मार्ग सांपडले ते मी तुला सांगत आहे. त्यामागे मोठी तपस्या आहे. संसारी इच्छांच्या पूर्ततेसाठी केलेली तपस्या फक्त तात्पुरते फळं देत असते. परंतु, निरीच्छपणे केलेली तपस्या चिरंतन सुख देत असते. परंतु, जो इच्छांच्या पूर्ततेसाठी तपस्या करतो तो पापाचरणात अडकून नरकात जातो. जो संसारी, सुख दुःखाच्या अनुभवाने विचलित न होता त्याचे अध्यात्मिक कर्तव्य (ध्यान

साधना इत्यादि) करत रहातो त्याला चिरंतन मानसिक आनंद मिळत रहातो. त्याच्या प्रभावामुळें तो ती संसारी सुख आणि दुःख विसरून जातो. गृहस्थ त्याची गृहस्थी कर्तव्ये, (दान करणे, अतिथी आदर, सेवकांना सन्मानपूर्वक वागवणे, कुटूंब सांभाळणे इत्यादि) नेमाने करत असेल त्यासाठी तो कमाई करत असेल. ते सगळे त्या आश्रमाच्या कामात येते. निष्पाप बुद्धीने तो ते करत असेल. तो त्याचे दोष समजून ते काढून टाकण्यासाठी प्रयत्न करत असेल. समाजाच्या केंद्रस्थानी हा आश्रम आहे. ब्रह्मदेवाचा आश्रम म्हणून त्याला मानाने सांगितले जाते.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे तेविसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे चोविसावा

जनक बोलतात, "अहो महर्षी, मला सांगा विविध वर्णाच्या लोकांच्या भोवती जी प्रभावळ असते तिचे रंग कसे ठरतात व कसे समजतात ते सांगा". "श्रृती सांगते कीं, जी संतति होते ती त्याची असते. सगळे सुरूवातीला ब्राह्मण होते नंतर त्यांच्यात जसे विविध दोष उत्पन्न होत गेले त्यामुळे त्यांच्या अध्यात्मिक र्हासामुळें इतर कनिष्ठ वर्ण तयार झाले हे मला माहीत आहे. त्याबद्दल मला आणखीन सांगा".

पराशर सांगतात, तू म्हणतोस ते खरे आहे. संतति त्यांचा अंश असतात. तपस्या जशी कमी होत गेली ब्राह्मण वर्ण दुषित झाला. त्यातून कनिष्ठ वर्ण उत्पन्न झाले. त्यांचे निराळे रंग त्यांना मिळाले. जशी अध्यात्मिक अवस्था कमी झाली तशी त्यांच्यातील गुणवत्ता सुद्धा कमी प्रतीची होत गेली. चांगल्या मातीत चांगले बियाणे उत्तम पीक देते व खराब मातीत निकृष्ट बियाणे कमीप्रतीचे पीक देते असे ते होत गेले. असे समजले जाते कीं, जेव्हां ब्रह्माने प्राणी उत्पन्न केले तेव्हां त्यांची उत्पत्ती त्याच्या अंगाच्या निरनिराळ्या भागांतून झाली. तोंडातून ब्राह्मण आले, हातातून क्षत्रिय, मांड्यांतून वैश्य आणि पायातून शुद्र आले. पण ही एक कवी कल्पना आहे. कारण सगळे अवयव सारखेच महत्वाचे असतात. ते दर्शवण्यासाठी कीं, ब्राह्मण उच्च आहे व शुद्र नीच आहे. अशारितीने त्या चार वर्णांची उत्पत्ती झाली. त्याशिवाय वर्ण संकर झाला जो नैसर्गिक पद्धतीने अपेक्षित होता. त्यातून असंख्य मिश्र वर्ण उत्पन्न झाले. त्यांची नांव अशी आहेत, क्षत्रियांपासून अतिरथ, अमवस्थ, उग्र, वैदेही, स्वपक, पुकस, तेनस, निशाद, सुत, मगधी, अयोगी, करण, व्रात्य आणि चांडाळ. त्या मूळ क्षत्रियांच्या बिजातून इतर वर्ण आणि त्यापेक्षा दुसर्या जाती प्रजातींच्या मिश्र संबंधातून त्या निर्माण झाल्या त्यांना वर्ण न समजता जाती समजले जाऊ लागले.

जनक विचारतात, "जर सगळे मुळांत ब्राह्मणांपासून उपजले आहेत मग इतक्या विविध वंशांची कशी व्यवस्था उत्पन्न झाली? त्यांना पुन्हा ब्राह्मण होण्यासाठी तपस्या करावी लागते कां? तपस्या केल्याने कनिष्ठ जातीचा मनुष्य ब्राह्मण होऊ शकतो कां"?

पराशर बोलतात, "तपस्या करून स्वताचे शुद्धीकरण करणारा कितीही कनिष्ठ जातीचा, वर्णाचा असला तरी हरकत नसते कारण मुळात तो ब्राह्मणच असतो. पूर्वीच्या काळा पासून अनेक ऋषी त्यांचे तपस्येने शुद्ध झालेले बीज अनेक कमी जास्त उच्चतेच्या उदरांत सोडत होते, ते त्या शुद्ध बिजापोटी उच्च दर्जाचे सात्त्विक लोक जन्मावेत अशा उद्देशाने होते. माझे आजोबा, वसिष्ठ, ऋष्यशिंग, काश्यप, वेद, तंड्य, कृप, काकशिवत, कामथ, तसेंच यवकृता असें अनेक ऋषी त्या कारणांनी जन्माला घातले गेले होते. अरे राजा, द्रोण, अयू, मातंग, दत्त, द्रुपद, मत्स्य असें आणखीन कांहीं आहेत. अरे विदेहच्या राजा, त्या सगळ्यांनी घोर तपस्या करून त्यांचे ब्राह्मणत्व सिद्ध केले आहे. सुरूवातीला फक्त चार गोत्र (वंश) आहेत. ते आहेत, अंगिरस, काश्यप, वसिष्ठ आणि भृगू. कालांतराने त्यांतून अनेक गोत्र तयार झाली वर्णसंकरामुळे. गोत्रांची नांव त्याच्या मुळपुरूषाचे असते. ते दाखवून माणसे आपल्या उच्चतेची ग्वाही देत असतात. कांहीं शिष्य त्यांच्या गुरूचे नांव वापरून ते त्यांचे गोत्र असे सांगण्याचीसुद्धा प्रथा आहे. म्हणजे काश्यपाचे शिष्य त्यांचे गोत्र काश्यप आहे असें सांगू लागले कारण त्या शिष्यांच्या पूर्वजांत कोणी ऋषी झाला नव्हता".

जनक विचारतात, "मला सांगा, त्या चार वर्णाच्या लोकांची कोणती समान कर्तव्ये आहेत. भिक मागणे, शिकवणे आणि शिकणे अशी ब्राह्मणांची कर्तव्ये असतात. समाजातील सदाचारी लोकांना अनाचारी लोकांपासून संरक्षण देणे हे क्षत्रियांचे कर्तव्य असते. समाजाची अर्थव्यवस्था सांभाळणे त्यासाठी उद्योग, कृषी, पशुपालन अशी कामं वैश्यांसाठी दिली आहेत. शेवटी आहेत शुद्र, ते ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य ह्यांना त्यांच्या कामात मदत करण्यासाठी आणि समाजाची करमणूक करण्यासाठी असतात व ते त्यांचे कर्तव्य असते. अशी त्यांची कर्तव्ये असतात. ब्राह्मणाला मदत करणारा शुद्र फक्त ब्राह्मणांनाच मदत करत असतो, तसेंच क्षत्रियांचे शुद्र त्यांचेच असतात व वैश्यांचे त्यांचेच असतात. त्या व्यवस्थेमुळें शुद्र विविध कर्तव्यात तयार होत असतात. प्रसंगी ते त्या उच्च वर्णाची जागा घेत असतात. ही झाली उपजिवीकेच्या संदर्भातील कर्तव्ये.

*इतिहासात अनेक राजवंश आपण पहातो जे मुळचे शुद्र वंशाचे आहेत, त्यांत गुलाम वंश आहेत. दक्षिणेत आज जे अय्यर ब्राह्मण आहेत ते मुळचे शुद्र आहेत. त्या अय्यरांचा इतिहास असां सांगतात की, साधारण हजार वर्षा पूर्वी दक्षिणेत नायक राजे राज्य करत असतांना तेथील मूळ अय्यर ब्राह्मण त्यांच्या कठोर तपस्येमुळें निर्वंश झाले तेव्हां त्यांच्याकडे सेवा करणारे शुद्र जे त्या सगळ्या कर्मकांडांत निष्णात झाले होते त्यांची नेमणूक नायक राजांनी ब्राह्मण म्हणून केली. त्यानंतर ते सुद्धा स्वताला अय्यर समजू लागले. अय्यर शब्दाचा अर्थ शिवाची पुजा (अयः हर) करणारे, असा आहे.*

मी तुला जे हवे ते सांगितले आहे. ती त्यांची नैतिक दृष्टीने जी विशिष्ट कर्तव्ये होती आता सांगतो त्यांची समान कर्तव्ये कोणती आहेत. इतरांशी वागतांना त्यांचा संबंध असतो. चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदया हे महत्वाची झाली त्याशिवाय पूर्वजांचे श्राद्ध करणे, समाजाच्या शिष्टाचारांचे पालन करणे, अस्तेय. आता सांगतो निजी अध्यात्मिक कर्तव्ये कोणती जी सगळ्या वर्णाच्या लोकांना सारखी लागू असतात. त्यात ब्रह्मचर्य पालन, इंद्रियसंयमन, सत्संग ठेवणे, मनोनिग्रह, आत्मनिरीक्षण करणे, समाजातील इतर लोकांचे जीवन व्याहाळणे व त्यातून योग्य अयोग्य ह्यांचा विचार करणे, वेदाचे वाचन करणे, ध्यान साधना करणे. जर पहिले तीन वर्ण त्यातील कोणी भ्रष्ट झाले (कर्तव्य करण्याचे थांबवले) तर त्याना राजा जाब विचारू शकतो परंतु, शुद्राला कोणी जाब विचारत नाही. त्यांनी त्यांची कर्तव्ये केली तर उत्तम परंतु, जर तो ते करत नसेल तर त्यास दोष लागत नाही. त्याची बुद्धी कमी असल्याने त्याला सगळे माफ असते. परंतु, जर तो कांहीं चांगले करतो तर त्याचे राजा कौतुक करण्यास बांधला आहे. द्विजांपैकी ब्राह्मणांना जास्त कठोर परीक्षेतून जावे लागते व त्याला माफ नसते. अरे विदहच्या राजा, कधी कधी शुद्र त्याच्या कर्तव्यदक्षतेमुळें ब्राह्मणांपेक्षा श्रेष्ठ ठरत असतो.

जनक विचारतो, "माणसाची बदनामी कशामुळे होऊ शकते, त्याच्या वर्णामुळे कां, त्याच्या काम करण्याच्या पद्धतीमुळे ते सांगा"?

पराशर सांगतात, "दोनही कारणाने मनुष्य बदनाम होऊ शकतो. जन्माने बदनाम झालेला त्याचे जीवन शुद्ध ठेवून त्या बदनामीतून मुक्त होऊ शकतो परंतु, जो त्याच्या कुकर्माने बदनाम झाला त्याला कोणी स्वीकारू शकत नाही. म्हणून कर्माने बदनाम होणे जास्त वाईट असते. तसेंच उच्च कुलिनाला त्या योग्यतेचे उच्च दर्जाचे कर्म करावे लागते. त्याच्यावर जास्त मोठी जबाबदारी असते. म्हणून कर्म जास्त महत्वाचे असते. माणसाने त्याचे कर्म चांगले ठेवणे आवश्यक असते".

जनक विचारतो, "अशी कोणती चांगली कृत्ये आहेत ज्यामुळे इतर जीवांना त्रास होत नाही"?

पराशर सांगतात, "ते मी सांगतो ऐक, चांगुलपणा हांच असा मार्ग आहे ज्याने स्वताचे व इतरांचे भले होत असते. त्यात भूतदया श्रेष्ठ समजली जाते. कुमार्गींपासून दूर रहाणे त्यांना मदत न करणे हे आणखीन असें मार्ग आहेत ज्यामुळे कोणाला इजा न करता आपण आपला अध्यात्मिक उद्धार करू शकतो.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे चोविसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे पंचविसावा

पराशर बोलतात, ज्यांना त्यांच्या वरिष्ठांबद्दल आदरभाव नाही अशांना ते वरिष्ठ, मदत करू शकत नाहीत. परंतु, जेथे सन्मानभाव आहे तेथे मदत होऊ शकते. त्यात पिता मातेपेक्षा श्रेष्ठ समजला जातो. तो ब्रह्मदेवा सारखा समजला पाहिजे त्या कुटूंबासाठी. ज्याने त्याची इंद्रिय नियंत्रित केली आहेत ज्ञान मिळवण्यासाठी तो सुद्धा श्रेष्ठ ठरतो. जे राजपुत्र शत्रूच्या शस्त्रांनी मरतात ते देवतांच्या बरोबरीला जातात. परंतु, जर त्याने लढतांना निशस्त्रांवर वार केला असेल, शरण आलेल्याला मारले असेल, न लढणार्यावर हल्ला केला असेल, थकलेल्यावर चालून गेला असेल, पळून जाणार्यावर वार केले असतील, स्त्रियां मुलांवर आबालवृद्धांवर हल्ला केला असेल तर तो स्वर्गात जाणार नाही. क्षत्रिय त्याच्या योग्यतेच्याच योद्ध्याशी लढेल. नाहीतर ते धर्मयुद्ध ठरणार नाही. तशा धर्मयुद्धात मरणे त्याच्यासाठी कौतुकास्पद असेल. जो क्षत्रिय अधर्मयुद्ध करतो व त्यात जिंकतो तो नरकात जातो. ज्याचा मृत्यू येऊन ठेपला आहे त्याला कोणीही वाचवू शकत नाही. तसेंच ज्यांचा मृत्यू आलेला नाही तो कोणाकडूनही मारला जात नाही. स्वताच्या भल्यासाठी इतरांचे नुकसान करणे पाप करण्यासारखे असते. त्यामुळें तो स्वताची अध्यात्मिक हानि तो करत असतो. कारण असे कीं, आपले सगळे कर्म लोकपाल देवता व त्यांचे गण देवता न्याहाळत असतात. ते सगळ्या प्रकारच्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कर्मांचे संशोधन करत असतात व आपली अध्यात्मिक अवस्था ठरवत असतात. आपल्या पाप पुण्याचा लेखाजोखा आपल्याच लिंगदेहात त्या ठेवतात. त्यांच्या तपासातून कोणाचीही सुटका होत नसते. जर मरण असेल तर ते येणारच ते कोणी टाळू शकत नाही. त्यानंतर त्याच्या शरीराचे पंचमहाभूतात विलीन होणे व त्याला कांहीं काळांने दुसरे शरीर मिळणे हे क्रमप्राप्त असते. मधल्या काळात तो आत्मा अदृष्य जगात भटकत असतो. त्याच्यावर रुद्र आणि पिशाच्च नियंत्रण ठेवत असतात. चर जीव अचरांपेक्षा श्रेष्ठ समजले जातात. चरात ज्यांना दोन पाय असतात ते जास्त उच्च समजले जातात. द्विपादांत ब्राह्मण श्रेष्ठ समजले जातात. त्या ब्राह्मणांत

जे बुद्धीमान आहेत ते आणखीन श्रेष्ठ असतात. त्यात जे अध्यात्मविद्या जाणतात ते आणखीन उच्च असतात. त्या सगळ्यांत जे चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदया आचरणात आणतात ते सर्व श्रेष्ठ मानले जातात. जन्म झालेले सगळे मरणारच. त्याला अपवाद नसतो. म्हणून मृत्यूला घाबरणे अथवा त्याचा तिरस्कार करणे अज्ञानीपणाचे लक्षण असते. अध्यात्मिक दर्जा नुसार माणसाला सत्त्व, रजस किंवा तमस असे गुण असतात. उच्च दर्जाच्या अध्यात्मिक दर्जास सत्त्व समजतात त्यापेक्षा कमी असलेल्याना रजस व त्याहीपेक्षा कमी असलेल्यांना तमस असे वर्गिकरण ज्ञानी लोकांनी केलेले आहे. अपघाती मृत्यू अशुभ समजले जातात. जीवनाचा उद्देश न समजलेले त्यांच्या जीवनात पाप करण्यात धन्यता समजतात. त्या पापकर्माची वाईट फळं तो नंतरच्या जीवनात भोगत असतो. अनेक प्रकारच्या त्रासदायक पिडा त्याला भोगाव्या लागतात. जाणूर बुजून पाप करणारे भयंकर यातनामय अशा लोकांत फेकले जातात. जीवनाच्या उद्देशाचे ज्ञान नसणे हा त्याचा मोठा शत्रू असतो. म्हणून ते ज्ञान करून घेणे माणसाला त्याच्या सुखासाठी जरुरीचे असते. वृद्ध, बालकं, अपंग, मूर्ख, निराधार अशांची सेवा केल्याने मोठी मोठी पाप संपतात. म्हणून अशांची नेहमी सेवा कोणतीही त्यांच्याकडून अपेक्षा न ठेवता करणे हांच त्या पापांतून सुटण्याचा मार्ग आहे. असे करणे चांगुलपणाचा भाग आहे. जीवनाचा उद्देश समजण्यासाठी तो वेदांचा अभ्यास करील. ब्रह्मचर्य पालन करील, गृहस्थाश्रमात जाऊन सगळ्या जबाबदार्या पूर्ण करील. त्यानंतर यज्ञ करून देवतांना प्रसन्न करील. ते सगळे करताना आत्मसंशोधन करत असल्यास त्याला जीवनाचा उद्देश समजेल. त्यानंतर तो मोक्षाच्या उद्देशांने पुढील मार्गक्रमण करत असेल. मोक्षाचा ध्यास लावून घेणे म्हणजे शरीराचे सुखोपभोग सोडून देणे असें मात्र समजू नकोस. ते भोग मर्यादेने घेत असतांना मनाला जी शिस्त लागते ती मोक्षाच्या मार्गात मदत करणारी असते. जर ते मर्यादेने घेतले तर ते भोग वाईट नसतात म्हणून मर्यादा तत्त्व महत्वाचे आहे. मनुष्य जन्म असा आहे कीं, त्याला सगळ्या इतर प्राण्यांची काळजी घ्यावयाला पाहिजे. म्हणून भूतदया महत्वाची असते. ते सोडून जर मनुष्य मत्सर, द्वेष, आसुया, तिरस्कार, अशा अहंकाराच्या ह्या दोषांत अडकून राहिला तर बरबाद होत असतो. त्याची अमुल्य वेळ व्यर्थ घालवत असतो. माणसाच्या बरोबर

रहाणारे इतर जीव (पाळीव कुत्र, मांजरं, इत्यादि) त्याचे गत जन्माचे नातेवाईक असतात म्हणूनच ते त्याच्या बरोबर रहात असतात. ते लक्षात घेऊन मनुष्य त्यांच्याशी वागत असेल तर त्यामुळे त्याला पुण्य लाभत असते. जो अशारितीने मुक्या प्राण्यांना आपुलकीने वागवतो त्याचा मोक्ष मार्ग सुकर होत असतो. मुक्या प्राण्यांना प्रेमांने वागवणे म्हणजे आपण त्यांच्यावर मेहरबानी करतो असे तमोगुणी समजतात. तशा विचारांमुळें त्याची अध्यात्मिक हानि होत असते. जे त्यांचा मृत्यू घरात अनुभवतात त्याच्या कलेवराला शास्त्रशुद्ध विधी करून शुद्ध करावयाचे असते त्यानंतर त्याच्या देहाला अग्नीसंस्कार द्यावयाचा असतो. मृतदेहाचा अग्निसंस्कार हासुद्धा एक यज्ञ असतो. त्यात त्याची आहुति दिली जाते. म्हणून अशारितीने अग्निसंस्कार केलेले स्वर्गात जातात. म्हणून सनातन धर्मात मृतांना अग्निसंस्कार करणे अगत्याचे असते. जे युद्धात रणांगणात धारातिर्थी पडतात त्यांचे देह तेथेच ठेवावयाचे असतात. त्यामुळें जर त्यांना गिधाडं खातात तर त्यांना स्वर्गप्राप्ती झाली असे समजतात.

अशी सगळी माहिती पराशरानी जनक राजाला सांगितली होती ती मी तुला सांगितली आहे.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे पंचविसावा संपला.

*पारशी समाजात मृतांना गिधाडांना खाण्यासाठी ठेवण्याची प्रथा ह्यांच समजातून तयार झाली असावी.*

# मोक्ष धर्म पर्व

## भाग एकशे सव्विसावा

भिष्म पुढे बोलतात, "पुन्हा एकदा जनक राजा पराशराला माणसाच्या कर्तव्यांबद्दल विचारतो".

जनक बोलतात, "कशाने चांगले साध्य होते? उत्तम मार्ग कोणता सगळ्या प्राण्यांसाठी"? असें काय आहे जे एकदा मिळवले कीं ते कधीच नष्ट होत नाही? असे कोणते स्थान आहे जेथे गेला कीं परत येत नाही? मला ते सगळे सांगा".

पराशर सांगू लागतात, कोठल्याही ऐहिक सुखाचा मर्यादे बाहेर मोह नसणे उत्तम असते. मोक्षाचे ज्ञान हांच खरा मार्ग आहे. तपस्या कधी व्यर्थ जात नाही. सत्पात्र दान कधीच व्यर्थ जात नाही. पापहीन सुखात रमणे हांच चांगुलपणा असतो. सर्व प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगण्याचे व्रत माणसाला अध्यात्मिक यशाकडे नेते. मोक्षाबद्दल जागृत असलेला ऐहिक सुखात, वैभवात रमणार नाही. ती जागृती नसलेला तशा सुखात सहजपणे अडकत असतो. तशा सुखाच्या मर्यादा समजून तो रहातो जो मोक्षाबद्दल जागृत आहे. पापबुद्धी जागृत माणसाला चिकटत नाही. फळाच्या अपेक्षेने जो पापकृत्य करण्यास तयार असतो तो मोक्षमार्गी जाऊ शकत नाही. असे करणारा त्याची कटूफळं नंतर भोगतो. ज्यांचे मन निष्पाप आहे ते मात्र ब्रह्म समजू शकतो. तसा जर नसेल तर त्याला त्याचे वाईट कर्म खात रहाते. चांगुलपणाच्या मर्यादा पाळून जो त्याचे सुखोपभोग अनुभवत असतो त्याला ते सुखोपभोग त्रास देत नाहीत. अशा सुखोपभोगामुळे त्याची तपस्या करण्याची क्षमता सुधारत असते. मोठ्या सुखासाठी लहान सुख सोडावी लागतात तसे हे असते. ज्याला मोक्षाच्या अंतिम सुखाची गोडी लागली आहे त्याला ऐहिक सुखात रमणे शक्य रहात नाही. चांगुलपणा साठी कोणता मुहूर्त पहावा लागत नाही. तो स्वाभाविकपणे आपल्यात असला पाहिजे. त्याशिवाय जीवनातील निर्णय घेतले गेले तर ते अध्यात्मिक दृष्ट्या हानिकारक ठरतात. ऐहिक सुखात जी क्षणभंगूरता आहे त्याचा अंदाज प्रथम मनाला येतो. पुन्हा पुन्हा तो अनुभव येत गेल्याने त्याबद्दल बुद्धीला खात्री पटते कीं, हे कांहीं खरे नाही. त्या वारंवार येणार्या अनुभवातूनच

माणसात अध्यात्माची गोडी वाढत जाते. त्यातून त्याबद्दल कुतूहल सुरू होते. अशारितीने मोक्षाबद्दल इच्छा वाढत जाते. तरी पुन्हा ऐहिक सुखाची ओढ कमी होत नाही. अशी विचारांची जुगलबंदी बराच काळ होत असते. त्यात आयुष्याचा बराच काळ व्यर्थ जातो. अखेरीस त्या जुगलबंदीत अध्यात्म जास्त शाश्वत आहे ऐहीक सुखांपेक्षा हे त्याला स्पष्टपणे जाणवू लागते. त्यानंतर अरे राजा, मनुष्य संसारातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतो. त्यात जर त्याचा मृत्यू झाला तर तो आत्मा मध्येच अडकल्यासारखा रहातो. असा आत्मा तशा मनस्थितीत असलेल्या लोकांच्या घराण्यात जन्म घेतो. असे न होता जर तो ऐहिक सुखात रमणे जास्त श्रेयस्कर समजू लागला तर त्याला कनिष्ठ योनीत जन्म मिळतो. त्याची अध्यात्मिक प्रगति थांबते. शरीराच्या प्रेमात अडकलेला मोक्षाच्या साधनेत गुंतू शकत नाही. त्याचे त्याच्या शरीरावरील प्रेम त्याला त्या शरीराच्या विविध भोगात पुन्हा पुन्हा अडकवत असते. त्यात जर तो सुख मिळवण्यात यशस्वी झाला तर तो मोक्षापासून दूर होत असतो. त्याला मोक्षाबद्दल आकर्षण रहात नाही. असा योगी समजून असतो कीं, त्याच्या ह्या जीवनातील चांगले वाईट अनुभव त्याच्या गतजन्माच्या कर्माचा परिणाम आहेत. त्याप्रमाणे तो त्यांचा अभ्यास करत असतो. त्याच वेळी ते ह्या जन्मात निर्दोष कृत्य करण्याचे प्रयत्न करत असतो. जेणे कारणे त्याच्या नंतरच्या जन्मात त्याला कोणताही कटू अनुभव भोगावा लागणार नाही. अतिशय सावधपणे तो त्याची कृत्ये आणि विचार योजत असतो. अशा बिनचूक नियोजनामुळें त्याचे ह्या जन्माचे जीवन पूर्णपणे पुण्यवंत रहाते. एका दृष्टीने आपण आपले पुढील जन्माचे जीवन ह्या जन्मात नियोजित करू शकतो. येणार्या प्रत्येक अनुभवाचे नंतरच्या जन्मात येणारे परिणाम तो समजून त्यांचे नियोजन करत असतो. ज्याला ते जमले तो अध्यात्मिक दृष्ट्या सावध झाला असे होते. असा सावध योगी मोक्षमार्गात सहजपणे प्रगति करत असतो.

भिष्म पुढे सांगतात, पराशर अशारितीने जनक राजाला मोक्ष मार्गाची तयारी कशी करावयाची व कोणत्या खबरदार्या योग्याने घ्यावयाच्या ते सांगितले. त्यामुळे जनक राजाचे समाधान झाले.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे सव्विसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे सत्ताविसावा

युधिष्ठीर पुढे विचारतात, "अहो पितामहा, शहाणी माणसें सत्य, संयम, सूज्ञपणा आणि क्षमाशिलता हे गुण चांगले आहेत असे समजतात. आपले त्याबद्दल काय मत आहे ते सांगा".

भिष्म त्याला उत्तर देतात, ह्यासंदर्भात मी तुला एक संवाद झाला होता साध्य आणि हंसाच्या मध्ये, तो सांगतो. एकदा ब्रह्मदेव एका हंसाच्या रुपात साध्याला भेटतात.

साध्य त्याला बोलतो, "अहो देव, आम्ही साध्य वर्गातील देवता आहोत. मला तुमच्या कडून मोक्षाबद्दल समजून घ्यावयाचे आहे. आपण त्याबद्दल सगळे जाणता आहात. अहो पक्षी रुपातील ब्रह्मा मला सांगा, जीवनात कोणता उद्देश अतिउच्च असतो? मला सांगा आपल्याला कशात सुख मिळते? कोणते कर्म अत्युच्च असते? काय केल्याने तो कायमचा मुक्त होतो जन्म मरणाच्या साखळीतून"?

हंस रुपातील ब्रह्मदेव सांगतात, "अरे ज्याने अमृत चाखले आहे, तो त्याच्या प्रभावामुळें तपस्या, इंद्रियसंयमन, मनसंयमन असे स्वाभाविकपणे आचरण्यात आणतो. त्याशिवाय तो सत्यवर्ती होतो. योग्य आणि अयोग्य अशा सगळ्या गोष्टींचे तो नियंत्रण करत असतो. तो कोणाला दुखवत नाही. तो कटू बोलत नाही. तो अयोग्य इसमाकडून वेदाचा अभ्यास करत नाही. कोणाचे मन दुखवले जाणार नाही अशी वाणी त्याची असेल. दुसर्याला खड्ड्यात घालून यशस्वी होणारा मृत्यूनंतर नरकात जातो हे त्याला जाणवू लागते. तलवारीच्या जखमा त्वचेवर असतात परंतु, जिभेने केलेल्या जखमा चित्तात खोल जातात ज्या त्या जखमा करणार्याला नरकात पोहोचवण्यास समर्थ असतात. म्हणून जिभेचा वापर सांभाळून करावयाचा असतो. आपला असंतोष उघड न करता तो वरवर गोड बोलून आपले काम करतो तो शहाणा समजला जातो. अशा वागण्याने शत्रूत्व न होता तो त्याचे काम करत असतो. ज्याला ती वागण्याची कला साध्य झाली तो चांगुलपणा सांभाळत सुद्धा त्याचे मुष्किल काम साध्य करत असतो. रागावणे हे धूर्तपणाचे काम नसते. आपले राग रुसवे मनात ठेवून जो मनाचा शांतपणा

राखून त्याचे काम करतो तो जीवनात यशस्वी होतो. रागावणे नेहमीच उपयोगाचे नसते. क्रोध बर्याच वेळा दुःख उत्पन्न करत असते. त्याशिवाय वैरभावसुद्धा वाढवत असते. जे व्यवहारिक जगात बहुधा नुकसानकारक ठरते. रागावरील संयम ठेवणे जीवनात कामयाब होण्यात मदत करत असते. क्रोध स्वाभाविक असेल तर तो दोष असतो म्हणून व्यवहारिक जगात क्रोध धोरणात्मक असावा. म्हणजे कांहींवेळा रागावल्याचे नाटक करणे हितकारक असते. मनात क्रोध नसला तरी वरवर तो आल्याचे दाखवून परिस्थिती नियंत्रणात ठेवावयाची असते. नको तेथे रागावणे मूर्खपणाचे असते. जेथे किंमत नाही तेथे रागावणे मूर्खपणाचे असते. कोणी अपमान केला तर कोणी केला ते पहावयाचे असते. ज्याच्याकडून विरोध अपेक्षित आहे अशाने अपमान केला तर तो मनावर घ्यावयाचा नसतो. बरेच मतभेद गैरसमजाचे असतात, त्यासाठी तो दूर करण्यावर भर असला पाहिजे. गैरसमज दूर झाला कीं, परिस्थिती हितकारक होत असते. कोणी कान भरणारे असतात त्यांचे ऐकावयाचे नसते. वेदात सत्याचे रहस्य उलगडलेले असते. सत्य संयमाने साध्य होते. म्हणून संयम सगळ्या यशाचे गुपित असते. जो संयमाने त्याची काम करतो तो निश्चितपणे यशस्वी होतो. क्रोध आणि दुःख एकाच नाण्याच्या दोन बाजू असतात. क्रोध काम करत नाही तेव्हां त्यानंतर दुःख प्राप्त होत असते. ज्याने क्रोध जिंकला तो दुःखसुद्धा जिंकत असतो. विरोधकाचा विरोध कां आहे ते समजून त्यानंतर त्यावर प्रतिक्रीया देणे सूज्ञपणाचे असते. जो चिरकर्णी आहे तो योग्य निर्णय घेत असतो. प्रतिक्रीया देण्याची जो घाई करतो तो लघूकर्णी नुकसान पावतो. प्रत्येक वेळी प्रतिक्रीया दिलीच पाहिजे असे नसते कांहीं प्रतिक्रिया राखून ठेवणे सूज्ञपणाचे असते. योग्य वेळी योग्य प्रतिक्रीया देणे सूज्ञपणाचे लक्षण आहे. अशारितीने सांभाळून वागणारा देवांना प्रिय असतो. त्याला देवता मदत करतात. जे संयम दाखवतात व त्यांच्या प्रतिक्रीया संयमाने देतात ते मला आवडतात कारण संयम मोठी गोष्ट असते त्यामुळें चांगुलपणा वाढवण्यात मदत होते. जे निर्णय भावनिक (मनाने घेतलेले) असतात त्यात दोष असतात म्हणून तसे निर्णय न घेण्याचे धोरण जे बाळगतात ते सगळ्यांना आवडतात. निर्णय नेहमी विवेकानेच घेतले पाहिजेत. असा मनुष्य देवांना आवडतो. कारण तो अन्याय करत नाही. त्याच्या अशा न्याय्य वागण्यामुळे तो

सगळ्यांना प्रिय असतो. सगळे त्याच्या मताची अपेक्षा करत असतात. तो काय म्हणतो काय नाही असें सगळे विचारत असतात. तो सगळ्यांचा आधार ठरतो. तो टीका करणार्यावर रागवत नाही. कारण टीका बर्याच वेळा सुधारणा करण्यासाठी मदत करत असते. क्रोधाच्या आवेगाने जे कृत्य केले जाते ते यमाला बोलावणे धाडण्यासारखे असते. क्रोधाने घेतलेले निर्णय भावनिक असतात म्हणून ते निर्णय शास्त्राप्रमाणे नुकसान करणारे असू शकतात. ह्या जगात सत्य म्हणजे ब्रह्म आहे. सगळे त्याच्या भोवती फिरत असते. त्याच्या पेक्षा इतर कांहीं मोक्षाच्या दृष्टीने साध्य नसते. मी, देवता, ऋषी, मुनी अशा ज्ञानी लोकांत फिरत आहे तेव्हा समजते कीं, सत्याला धरून जे राहिले त्यांचे भले झाले आहे. सगळे विचार सत्याला समोर ठेवून करावे म्हणजे त्यांचे कल्याण होईल. ज्याच्या प्रभावाखाली तुम्ही जाता त्यासारखे होता. हा सृष्टीचा नियम आहे. सत्याच्या मागे जाता तर तुमच्यात सत्य अवतरते. सत्य नित्य आहे त्या उलट असत्य (माया) अनित्य आहे. ते ज्यानी समजले तो मोक्षाच्या दिशेने जाऊ शकतो. कारण तो मायेत व तिच्या भुलभुलव्यात (तिच्यातील सुखात) अडकत नाही. जेव्हा माणसाचा आत्मा त्याचे नित्य रुप समजतो तेव्हां देवता त्याला महत्व देऊ लागतात".

ते ब्रह्माचे ऐकल्यावर साध्य देवता बोलते, "ह्या सृष्टीला कशाने व्यापले आहे? लोक मोक्षाच्या करता कां प्रयत्न करत नाहीत"?

हंस ब्रह्म सांगतात, "ह्या सृष्टीला अज्ञानाने ग्रासले आहे. लोक त्या अज्ञानाच्या प्रभावात असतात व त्यामुळें ते मोक्षाचे महत्व समजत नाहीत. अज्ञानातून जो मोह त्याला धरून ठेवतो तोच त्याचा खरा शत्रू असतो पण त्याला ते समजत नाही. तो त्या मोहजालालाच त्याचा सखा समजत असतो. त्यात अडकण्यात धन्यता मानतो. अज्ञानामुळे त्याची दृष्टी बद्ध झालेली असते.

साध्य विचारतो, "ब्राह्मणांत कोण सदैव सुखी असतात? त्यातील कोण कमजोर असूनही ताकदवान वाटतात? त्यातील कोणते ब्राह्मण भांडत नाहीत"?

हंस ब्रह्म सांगतात, "ब्राह्मणातील जे सूज्ञ आहेत ते सदैव सुखी असतात. तेंच शांतपणे रहातात. ते सूज्ञ ब्राह्मण जरी वस्तुतः कमजोर असले तरी शक्तिमान असतात. तसेंच

ते सूज्ञ असल्यामुळे भांडणं करत नाहीत. ब्राह्मणांतील सूज्ञपणा ही त्याची खरी शक्ती असते.

साध्य पुन्हा विचारतात, "ब्राह्मणांची दिव्य शक्ती त्यांच्या कोणत्या गुणात असते? त्यांच्यातील दोष, गुण आणि माणूसकी कशात आहे"?

हंस ब्रह्म सागतात, "वेदाच्या अभ्यासात ते सगळे असते. त्यांच्या अहंकारात दोष असतो, व्रतस्थ जीवनात गुणवत्ता असते आणि त्याच्या मृत्यूमध्ये त्यांच्यातील माणूस असतो".

भिष्म पुढे सांगतात, "मी तुला साध्य आणि हंसब्रह्माची प्रश्नोत्तरी सांगितली. आपला सुक्ष्म आणि स्थुल देह ही वस्तुस्थिती असते परंतु, सत्य असते आत्म्यामध्ये हे लक्षात ठेवून तू तुझे विचार करत जा.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे सत्ताविसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे अठ्ठाविसावा

युधिष्ठीर पुढे विचारतात, "अहो पितामहा, मला पुन्हा एकदा सांगा सांख्य आणि योग ह्या दोन तत्त्व प्रणालीतील साम्य आणि भेद काय आहेत"?

भिष्म सांगू लागतात, "प्रत्येक त्या त्या प्रणालीचे समर्थक त्या त्या प्रणालीचे कौतुक करत असतात. प्रत्येकाला त्यांची प्रणाली श्रेष्ठ वाटत असते. योगाचे समर्थक बोलतात, जे देव मानत नाहीत त्यांना मोक्ष साध्य करणे शक्य नसते. त्या उलट सांख्य सांगतात की, जगाच्या व्यर्थतेची पूर्ण कल्पना ज्यांला झाली तो आपसुकपणे मोक्षाकडे (तथागत) जात असतो, किंबहुना त्याला दुसरा पर्याय नसतो. त्यासाठी देवाची संकल्पना आवश्यक नसते. अशाप्रकारे दोनही बाजू आपले समर्थन करत असतात. सदाचारी लोक दोनही बाजूंना आहेत. तुझ्या सारख्यानी दोनही बाजूंना मान्यता दिली पाहिजे. तरी त्यातील भेदाची कारणं पाहिली तर तुझ्यासाठी योग्य होईल. योगी पुराव्या कडे पाहून त्यांचे निष्कर्ष मांडत असतात. ते शास्त्रविधान विशेष मानत नाहीत. त्याउलट सांख्य शास्त्रविधान जास्त प्रमाण मानतात. माझ्या दृष्टीने दोनही पद्धती योग्य आहेत. किंबहुना त्या पुरक आहेत. सत्य एकच असते व ते त्या दोनही पद्धती स्वीकारत आहेत हे लक्षात घे. त्यापैकी कोठलाही एक मार्ग तू घे तुला मोक्ष पदाकडे जाता येईल. दोनही पद्धती चांगुलपणा हा पुण्याचा मार्ग आहे हे स्वीकारतात. तपस्या, इंद्रियसंयमन, मर्यादा, ब्रह्मचर्य, मनसंयमन, क्षमाशिलता, पावित्र्य, अस्तेय असे व्रताचे नियम दोनांत पाळावे लागतात".

युधिष्ठीर विचारतो, "मला समजत नाही जर सगळे सारखे आहे मग त्यांच्या तत्वज्ञानात फरक असण्याचे कारण काय"?

भिष्म सांगतात, योग आणि सांख्यातील फरक त्यांच्या विचार करण्याच्या पद्धतीत असतो. योगी बुद्धीच्या मदतीने विश्लेषणात्मक पद्धतीने अंदाज घेत मोक्षाचा विचार करत असतात. त्यात ब्रह्माशिवाय इतर देवतासुद्धा आहेत व त्या सृष्टीचे नियंत्रण करत असतात असें मानतात. त्यांच्या दृष्टीने शरीराचा संबंध आत्म्याशी निगडीत असतो व

त्यासाठी शरीर साधना योगात महत्वाची समजली जाते. त्याशिवाय देवतांना प्रसंन्न करणारे कर्मकांड योगी आत्मसात करतात. त्यासाठी असलेले आगम शास्त्र ते आत्मसात करतात. त्यामुळे त्यांचा थेट संपर्क देवतांशी होत असतो. त्या संपर्कामुळे योगी सिद्ध होऊ शकतो कारण सिद्धी देवतांना तो मनतो व त्यांच्यावर ध्यान करत तो प्रथम त्यांना आपलेसे करत असतो, त्यासाठी तो जी शरीराची साधना करतो (विविध योगासनांच्या द्वारा) त्याला मदत करत असते. मुख्य म्हणजे तो त्याचे पांच वायू नियंत्रित करत असतो. त्यामुळे त्याचे शरीर विशुद्ध होते. अशा शरीराने तो त्यानंतर सिद्धी देवतांना आपलेसे करत असतो. शरीराच्या शुद्धीमुळें त्याला अध्यात्मिक उर्जा वाढवणे सोपे होते. त्यांच्या मदतीने तो अनेक विलक्षण किमया करू शकतो. तरी तो मोक्षाप्रत गेलेला नसतो. त्यासाठी तो त्याच्या मनाचे शुद्धीरण व्रतस्थ जीवन अंगिकारून साधत असतो. मनाच्या नियमनामुळें त्याचे शरीरावरील नियमन सुद्धा सहज होते. त्यासाठी तो कोणत्याही मोहात न अडकणे, वासनांबद्दल उदासिनता, एकचित्ताने देवतांवर ध्यान करणे, अक्रोध (रागावणे थांबवणे) ह्यांची सवय करावी लागते कारण ह्या दोषांमुळें त्याची अध्यात्मिक उर्जा तो कमी करत असतो. एकदा ते थांबले कीं, स्वाभाविकपणे त्याच्या आत्म्याची ताकद वाढत जाते व एका विशिष्ट इतकी वाढली कीं, सिद्ध देवतांना तो संपर्क करू शकतो. अनेक योगीक आसनं आणि तपस्या करण्याची सवय त्याला देवतांच्या समीप जाण्यास मदत करतात. त्याची अध्यात्मिक उर्जा वाढत जाते. अरे युधिष्ठीरा, हे साध्य करण्यासाठी त्याला अनेक वर्षाची तपस्या करावी लागते. त्याला शरीराच्या नित्य वासनांचे नियंत्रण करावे लागते. त्यालाच योग साधना असे म्हणतात. तरी जर तो निश्चयाने न डगमगता त्याची योग साधना करत असेल तर तो यथावकाश सिद्धी देवतांपर्यंत पोहोचत असतो. त्याच्या आत्म्याची अध्यात्मिक उर्जा वाढत असल्याने मोक्ष मार्ग सुकर होत असतो. त्याला प्राप्त झालेल्या सिद्धींमुळें तो ऐहिक प्रश्न सहजपणे सोडवत असतो. परंतु, जर तो त्या सिद्धींच्या मोहात अडकला तर त्याची प्रगती खुंटते. जो योगी तसा मोहात अडकत नाही तो मोक्षाच्या दिशेने यशस्वीरित्या जात असतो. मी तुला योग पद्धतीचे चांगले फायदे सांगितले. आता योगीची सुक्ष्म शक्ती काय आहे ते सांगतो. त्यासाठी त्याची धारणा आणि समाधी तुला

समजून घ्यावी लागेल. ज्याला शरीराच्या सुखांबद्दल औदासिन्य पूर्णपणे साध्य झाले आहे असा योगी ध्यान धारणा सहज करू शकतो. मनाची जिद्द त्यासाठी आवश्यक असते. एकाद्या गोष्टीची आवड नसल्याने तिची इच्छा न होणे सहाजिक असते. असा योगी धारणा विनासायास करत असतो. योगीक आसनांच्या सरावामुळें त्याच्या शरीराच्या भौतिक गरजा किमान पातळीला आलेल्या असतात. वासनांचा समुळ नाश झाल्याने त्याचा मोक्ष मार्ग सोपा होतो".

युधिष्ठीर भिष्माला विचारतो, "मला सांगा, योग्याने कोणता आहार करावा जेणे कारणे त्याची योग साधना चांगली होईल.

भिष्म सांगतात, "तो त्याच्या साठी सात्त्विक आहार करेल ज्यात भात, तीळाची भाजी असेल. तो जास्त स्निग्ध पदार्थ खाणार नाही. तो त्याच्या प्रकृतीप्रमाणे किमान आहार ठेवेल. शरीराचे चोचले न पुरवणे हा त्यामागील उद्देश असतो. कोणत्याही गोष्टी बाबत आग्रही रहाणे त्याच्या साधनेला बाधक असते. काय खातो अथवा पितो हे त्याच्या सात्त्विकतेला पोषक आहे कीं नाही त्यावर अवलंबून असते. त्यासाठी सगळ्यांसाठी एकच आहार सांगता येणार नाही. योग्याला ब्रह्मचर्य पाळणे आहारापेक्षा जास्त निकडीचे असते. म्हणजे वासनांच्या आहाराचे नियंत्रण जो योगी यशस्वीरित्या करतो तो मोक्षाकडे निश्चितपणे जात असतो. असे असेल तर तो काय खातो आणि काय पितो हे महत्वाचे रहात नाही. वासनाशून्य अवस्थेत जगणे वाटते तितके सोपे नसते. विशेष करून जर योगी युवक असेल. त्याचे शरीर अनेक मागण्या करत असते त्यांच्याकडे दुर्लक्ष करून साधना त्याला करावी लागते. जर तो गृहस्थ असेल तर त्याच्या पत्नीची साथ त्याला असावी लागते. फार थोडे ब्राह्मण योग मार्गाने यशस्वी होत असतात त्याचे कारण सांगितले. आपल्या शरीराच्या वासना नियंत्रित करणे वाटते तितके सोपे नसते. पण इच्छा असल्यास काय अशक्य असेल"? प्रामाणिकपणे योग साधना करणार्याला सगळ्या ब्रह्मशक्ती जसे विष्णू, भव, धर्म, कार्तिकेय मदत करत असतात, ते त्याला मात्र माहीत नसते. कोणीही योगी अथवा मोक्षसाधक ह्या देवतांच्या नजरेतून सुटत नाही त्यांचे बारीक लक्ष त्याच्यावर असते हे तू लक्षात ठेव. परंतु, साधना ही ज्याची

त्यालाच करावी लागते.  योगी होण्यासाठी तो पूर्ण विचाराने समजून त्याचा साधना करत असला पाहिजे.  त्यात जर त्याला गुरूची साथ असेल तर त्याची साधना सोपी होते.
मोक्ष धर्म पर्व भाग एकशे अठ्ठाविसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग एकशे एकोणतीस

युधिष्ठीर विचारतो, "आपण गुरूने ज्ञान द्यावे अशा उत्कृष्ट पद्धतीने योग शाखेची माहिती सांगितली, ती मला समजली. आता मला तितक्याच सविस्तरपणे सांख्य शाखेची माहिती सांगावी. म्हणजे माझ्या मनात कांहीं शंका उरणार नाही".

भिष्म सांगू लागतात, नीट ऐक सांख्यांच्या प्रणालीत जे सुक्ष्म सूत्र विचारात घेतले जाते ते मी सांगत आहे. प्राचीन काळी महान यति कपिल मुनी होऊन गेले त्यांनी सांख्य प्रणालीची नीव घातली आहे. सनातन धर्म परंपरेत सांख्य आद्य प्रणाली म्हणून मान्यवर आहे. ती कपीलानी सांगितली तशीच आजपर्यंत चालू आहे. त्यात कोणी सुधारणा सांगू शकलेला नाही. कपीलांच्या मते सगळे जग सदोष आहे. म्हणजे प्रत्येक गोष्टीत कांहीं तरी कमी असते. त्यात माणसांबरोबर पिशाच्च, राक्षस, सर्प, गंधर्व आणि पितर जे ह्या सृष्टीत दृष्य आणि अदृष्य जगात भटकत असतात, त्यांच प्रमाणे इतर शक्ती जशा मरुत, राजर्षी, महायोगी, असुर, विश्वदेव, इत्यादी आणि ब्रह्मदेव स्वतः गुंतलेले आहेत, ते कोणीही त्यांच्या अस्तित्वाची मर्यादा समजत नाहीत. म्हणजे ह्या सृष्टीला पूर्णत्वाने ओळखणे शक्य नाही असा सिद्धांत कपीलांनी मांडला. सांख्यांच्या विचार करण्याच्या पद्धतीत जे आपल्या इंद्रीयांना उमगते ते सत्य मानावयाचे त्याशिवाय जे कल्पनेने मान्य केले जाते ते मानावयाचे नाही. योग प्रणालीत कल्पनांना मान्यता आहे म्हणून त्यात देव आणि देवतांचे अस्तित्व ग्राह्य असते. सांख्य वस्तुनिष्ठ असतात व ज्या अर्थी देव, देवता, परमेश्वर, पिशाच्च दिसत नाहीत त्यांचे अस्तित्व ते मान्य करत नाहीत. सांख्यांमध्ये सृष्टीतील प्रत्येक घटकांचे आणखीन वर्गिकरण करण्याची पद्धत आहे. त्या प्रमाणे, सत्त्वाचे दहा गुण आहेत, राजसचे नऊ आणि तमसचे आठ गुण आहेत. बुद्धीचे सात गुण आहेत, मनाचे सहा, आकाशाचे पांच असे ते मानतात. त्या गुणानुसार ते काम करतात व त्याप्रमाणे ही सृष्टी काम करते असें ते मानतात. अशारितीने प्रत्येक घटकांचे असंख्य गुण विचारात घेऊन ते तत्त्वज्ञान विकसित केले गेले म्हणून त्यास सांख्य तत्त्वज्ञान समजले जाऊ लागले. त्याच्या आधी कोणी इतका

खोलात जाऊन आकडेवारीच्या मदतीने सृष्टीच्या व्यवहारांचा खोलवर विचार केला नव्हता. जगात घडणारी हरएक गोष्ट त्या सांखिकीने समजण्याचा तो उद्देश होता कपीलमुनीचा. त्यांचे कारण व परिणाम ह्यांचे विश्लेषण त्याच सांखिकी पद्धतीने केले जाते. विश्वातील सगळ्या गोष्टींचे विवेचन आकडेवारीनेच त्यात केले जाते. चराचराच्या शरीराला विशेष महत्व होते कारण ते दिसतात परंतु, मन आणि बुद्धी जे दिसत नाहीत त्यांचा त्यांना नाईलाजाने योग प्रणालीनुसार विचार करावा लागत होता. प्रत्येक घटक कशातून तरी आला आहे असे ते समजत होते. त्याप्रमाणे वारा आकाशातून आला, बुद्धीभेद तमोगुणातून (अंधार) आला, मोह इंद्रीयांतून आला, अग्नी उदरातून आला, पृथ्वी पाण्यातून आली, आकाश महत मधून आले, ह्या ठिकाणी महत हे विश्वाच्या निर्मितीचे मुख्य कारण असें ते मानतात. महतची उत्पत्ती विचार सागरातून झाली असे ते मानतात. तमस, रजस आणि सत्त्व ह्या महतच्या तीन अवस्था असें ते मानतात. महत म्हणजे आत्मा असे समजावयाचे. त्यामुळें मोक्षाचा विचार पुढे सांख्यानी मान्य केला होता. त्यातून जड आणि चैतन्यमय अशा दोन अवस्था ते मानत होते. शरीराचे सोळा गुण ते सांगतात. त्यांच्या स्पष्टीकरणाने ते शरीराच्या सगळ्या अवस्था समजून घेण्याचा प्रयत्न करत असतं. जीवाचा संबंध पांच प्राणांशी ते जोडतात. त्यात प्राण, अपान, व्यान, समान, उदान असें ते समजले जात होते जे योगशास्त्र सुद्धा मान्य करत होते. त्याशिवाय उर्ध्व श्वास आणि खालचा श्वास असे मिळून सात श्वास ते विचारात घेत होते. सांख्य पाप आणि पुण्य मानत होते. यमाचे राज्य आणि वैतरणा नदी जिच्यात सगळे पापी बुडतात तेसुद्धा ते मानत होते. शुभ आणि अशुभ घटना ते मान्य करत होते. त्या प्रणालीच्या विकासात असंख्य ऋषी आणि मुनींनी कपीलाच्या विचारावर भर घातलेली आहे. माणसाच्या शरीराचा बारकाईने ते विचार करत असतं. त्यातून आयुर्वेद निघाला. शरीराच्या गरजांचा संबंध त्या शरीराच्या विविध अवयवांशी असतो ते सांख्य मान्य करत होते. शरीराचा नाश कसा होतो त्यावर त्यांचे निश्चित असें विचार होते. अशारितीने प्रत्येक गोष्टीचा सुक्ष्मात जाऊन अभ्यास करण्याची परंपरा सांख्यानी आरंभिली त्यातून ज्योतिष, ग्रहगोल, खगोल, भूगोल, आयुर्वेद,

शरीरविज्ञान, रसायन, देवता विज्ञान, मानसशास्त्र, जीवशास्त्र अशी अनेक शास्त्र आणि विद्या त्यांच्या प्रयत्नातून सुरू झाली. हे सांख्य प्रणालीचे महत्व आहे.

माणसाचा उद्धार का व कसा होतो अथवा होत नाही त्याच्या मागे दुःख कसे लागते, सुख आणि दुःख ह्यांचे रसायन काय आहे त्यावर सांख्यंच्या त्यांच्या कल्पना विकसित होत होत्या. पापाचा संबंध दुःखाशी आणि पुण्याचा सुखाशी असतो हा सिद्धांत सांख्यानी मांडला. सद्गुण आणि दुर्गुण ह्यांचा संबंध सत्त्व, रज आणि तमो गुणाशी असतो तेसुद्धा सांख्यांनी प्रथम सांगितले आहे. बरेचसे सांख्य विचार आणि त्याप्रमाणे त्यांचे निष्कर्ष वेदात स्वीकारले गेले आहेत नंतरच्या काळात. सांख्यानी पृथ्वीच्या गोलाचासुद्धा अभ्यास केला होता व त्यावरून भुकंप, धरणीकंप, नद्या सुकणे (सरस्वती नदी सुकत होती त्याकाळात कपील मुनी झाले असावेत), पर्जन्यमान ठरवणे अशी भौगोलिक शास्त्रंसुद्धा सांख्यानी विकसित केली आहेत. आपले शरीर आणि पृथ्वीचे व्यवहार ह्यांचे अन्योन्यसंबंध सांख्य मानत होते. केवळ मोक्षापुरते त्यांचे निरीक्षण नव्हते. ह्या दृष्टीने योगापेक्षा सांख्य जास्त प्रगल्भ विज्ञान ठरले होते.

युधिष्ठीर विचारतात, "सांख्य कोणत्या दोषांबद्दल बोलतात ते सांगा. ज्यांच्यामुळे मनुष्य त्याचा अध्यात्मिक उद्धार करू शकत नाहीत"?

भिष्म सांगतात, कपिलाचे सांख्य अभ्यासक सांगतात कीं, इच्छा, क्रोध, भिती, आळस आणि भूक हे दोष आहेत. ते पुढे सांगतात कीं, इच्छा संयमाने नियंत्रित होतात आणि क्रोध क्षमाशिलतेने. आळस उद्योगांने, भिती धाडसांने जिंकता येते. सांख्यांच्या सगळ्या साधना संयमावर अवलंबून असतात. तपस्या, धारणा, ब्रह्मचर्य अशा वर्तस्थ जीवनाने ते त्याच्या मनाला शिस्त लावत असतं. पापशून्य जीवनाच्या आचरण्याने अध्यात्मिक उद्धार सांख्यांचा झाला त्यानंतर ते नारायणाला त्यांच्या आत्म्यात पहातात. साख्य मोक्ष मानत नाहीत त्या ऐवजी ते निवृत्ती मानतात व त्या अवस्थेला ते "तथागत", असें संबोधन देतात. योगी मोक्षाकडे जातात असे मानले जाते त्याऐवजी सांख्य निवृत्तीकडे जातात हा मोठा फरक त्या दोन प्रणालीमध्ये असतो. मोक्षाची संकल्पना ही केव्हाही जास्त उच्च समजली जाते कारण त्यासाठी लिंगदेह

पूर्णपणे संपावा लागतो. निवृत्ती मध्ये लिंगदेह अंशात्मक उरलेला असतो म्हणून तो कालांतराने जन्म घेत असतो. सांख्य लिंगदेहाला सुक्ष्मशरीर असें समजतात.
युधिष्ठीर विचारतो, "मोक्ष प्राप्त झालेल्याना त्यांचे गत जन्म आठवतात कां? ते मला सांगा कारण माझी उत्कंठी शिगेला पोहोचलेली आहे त्याबद्दल. कांहीं शास्त्र ग्रंथ सांगतात कीं, मोक्षानंतर त्याच्या जाणीवा संपतात. परंतु, सांख्याच्या निवृत्ती संकल्पनेनुसार तो त्याच्या जाणीवा राखून असतो. ह्याबद्दल बराच गोंधळ आहे, त्यावर तुमचे मत काय ते सांगा". मला वाटते कीं सांख्यांचे विचार जास्त पटणारे आहेत. मोक्षपदी गेलेला जर जाणीवा धरून रहात नसेल तर तो एकाद्या निद्रीस्त अवस्थेतील आहे असें समजावे लागेल. किंवा एक प्रकारचा मृत्यू समजावा. त्यापेक्षा सांख्य जे मानतात ते अधिक पटणारे आहे, कारण त्यात निवृत्तीला पोहोचलेला अजून जागृत असतो व त्याच्या सगळ्या जाणीवा शाबूत असतात".
भिष्म सांगतात, तू विचारलेला प्रश्न मोठा अवघड आहे. परंतु, रास्त सुद्धा आहे. अशा प्रश्नाचे उत्तर देण्यात मोठे मोठे ज्ञानी कमी पडतील. तरी जे मला समजते तेवढे सांगतो. कपील आणि त्याचे समर्थक सांगतात कीं, आपल्या जाणीवा ह्या आपल्या कल्पनांचा भाग असतात. निरनिराळ्या लोकांच्या जाणीवा त्यांच्या त्यांच्या कल्पनांचा भाग असतात. त्यात कोणी एक निरपेक्ष अशी जाणीव असत नाही. निवृत्तीला गेलेला त्याच्या त्या संस्कारातून मुक्त नसतो. म्हणजे निवृत्ती नंतरसुद्धा त्याच्या जाणीवा शाबूत असणे स्वाभाविक आहे. त्या जाणीवा सुक्ष्मशरीर (लिंगदेह) सांभाळत असतो. परंतु, मोक्षाच्या संकल्पने प्रमाणे लिंगदेह संपलेला असल्याने त्या पूर्व संस्कारांना धरून ठेवणारे कांहीं नसते म्हणजे जर मोक्ष ही संकल्पना श्रेयस्कर समजले तर मान्य करावे लागेल कीं, त्याच्या जाणीवा त्याच्या लिंगदेहा बरोबर नष्ट झाल्या आहेत. तसे जर मान्य केले तर मोक्ष प्राप्त झालेला आत्मा कोणत्याही त्याच्या गत जन्माच्या जाणीवा धरून ठेवत नसेल. असा आत्मा खर्या अर्थाने मुक्त झाला असें मान्य करावे लागेल. त्याप्रमाणे त्याचे आत्मा म्हणून जे स्वतंत्र अस्तित्व आहे ते सुद्धा संपुष्टात आले असे मान्य करावे लागते. सांख्यांच्या निवृत्ती ह्या संकल्पनेप्रमाणे, आत्मा (पुरूष) महतात एकरुप होत नाही त्याचे सुक्ष्मशरीर त्याच्या बरोबर असते असें मान्य केले तर निवृत्ती

नंतर सुद्धा त्याचे स्वतंत्र अस्तित्व शाबूत असते म्हणजे त्याच्या स्वतंत्र जाणीवा सुद्धा शाबूत असतात हे मान्य करता येते. योग शास्त्राप्रमाणे मोक्ष सिद्ध मायेच्या (सांख्यांच्या भाषेत, प्रकृतीच्या) बंधनात रहात नाही पण सांख्याच्या संकल्पनेप्रमाणे निवृत्ती नंतरसुद्धा तो आत्मा प्रकृतीच्या म्हणजेच मायेच्या बंधनात असतो. असे कांहीं भेद आहेत त्या दोन विचार प्रणालींमध्ये. योग शास्त्राप्रमाणे मुक्तात्मा स्वयंभू प्रमाणे (सांख्यांच्या शब्दात महत प्रमाणे) निर्गुण असतो. परंतु, सांख्य तसे मानत नाहीत. त्यांच्या मते तो त्याचे किमान गुण धारण करूनच असतो. सांख्यांच्या ह्या संकल्पने प्रमाणे ते निवृत्ती प्राप्त झालेले व म्हणून सिद्ध झालेले आत्मे देवांसारखे काम करत असतात. अशारितीने योग आणि सांख्य हे एकापरीने सारख्याच संकल्पना मांडत होते पण त्यांचे युक्तीवाद वेगळे होते. ते त्याची मान्यता देण्यास तयार नव्हते. पुढे सांख्यांनी मान्य केले कीं, निवृत्त आत्मे यथावकाश त्यांचे सगळे भोग जे त्याच्या सुक्ष्मशरीराच्या माध्यमाने धरलेले असतात ते नष्ट होतात. सांख्यांच्या मुलभूत धारणे प्रमाणे गुण महत्वाचे असतात. जर गुणच नाहीसे झाले तर कांहींच उरत नाही. तशा अवस्थेत गेलेल्या आत्म्याला शरीर धारण करता येत नाही. सांख्याच्या तत्त्वज्ञानात सगळ्या मानवी प्रश्नांना उत्तर मिळत होती म्हणून ते तत्त्वज्ञान सर्वमान्य झाले. ती सर्वश्रेष्ठ विचार प्रणाली ठरली. सगळे ऋषी त्याच विचारानुसार त्यांची मतं मांडू लागले. त्यांचे तत्त्वज्ञान नित्य म्हणजे पूर्ण आहे हे सगळ्यांनी मान्य केले. सगळ्या शास्त्रांनी त्याला मान्यता दिली आहे. योगी सुद्धा ते मान्य करू लागले. वस्तुतः त्या दोन विचारांत फारसा फरक राहीला नव्हता. कारण योगी सांगतात कीं, मोक्षाच्या आधी आत्मा निवृत्ती अवस्थेत जात असतो. त्यामुळे योगी अवस्था मोक्षाची निवृत्तीच्या पुढची पायरी आहे असे सांगून दोन विचारातील साम्य दाखवू लागले. फरक एवढा होता कीं, सांख्य सांगतात कीं, निवृत्तीच्या पुढची अशी कोणती पायरीच असूच शकत नाही. अशाप्रकारे त्यांत भेद राहिला होता तो कधीच मिटणारा नाही. मनाची शांतता, अंतर्ज्ञान, तपस्या, सुक्ष्म जाणीवा, सगळ्यांचा विचार सांख्यानी यथायोग्य केला आहे. इतका तपशिलवार अभ्यास वेदांतसुद्धा झालेला नाही. स्वर्ग ही संकल्पना शाख्य मानत नाहीत. त्यांच्या मते जे कांहीं आहे ते सगळे येथेच आहे, म्हणजे स्वर्ग, पाताळ,

नरक असें कांहीं नसते. ते मानतात कीं, येथेच सगळे घडत असते पण त्याच्या गुणांत फरक असतो म्हणून स्वर्ग, नरक, पाताळ अशा संकल्पना मांडल्या जात आहेत एरवी त्यात कांहीं तथ्य नाही. सांख्य पुनर्जन्म मानतात. ते कर्मविपाक आणि शक्तीसातत्य हे दोन वेदांनी दिलेले नियम मान्य करतात. सांख्य ज्याला पुरूष म्हणतात त्याला योगी (वैदिक विचार) ब्रह्म म्हणतात. सांख्य ज्याला प्रकृती म्हणतात त्याला वैदीक माया म्हणतात. वैदीकांप्रमाणे आत्म्याचा प्रवास ब्रह्माकडून ब्रह्माकडे असा असतो पण सांख्य समजतात कीं, आत्म्याची सुरूवात पुरूषात होते व तो निवृत्त अवस्थेत जातो. युगांताच्या कल्पना दोनही मध्ये सारख्याच असतात.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे एकोणतिसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे तिसावा

युधिष्ठीर विचारतो, "मला सांगा अहो पितामहा, ह्या जगात अक्षर काय आहे ज्याच्या साध्यते नंतर त्याला पुनर्जन्म मिळत नाही व क्षर काय आहे ज्याच्यामुळें पुनर्जन्म घ्यावा लागतो ते सांगा. आपण फार थोडे दिवसाचे साथी अहात. त्या आधी ते सगळे मला सांगा. कारण तुमच्यानंतर कोणी त्यावर बोलू शकेल असे वाटत नाही. आपली सांगण्याची पद्धत इतकी चांगली आहे कीं, सतत ऐकावेसे वाटते.

भिष्म सांगतात, ह्यासाठी मी ऋषी वसिष्ठ आणि जनकाच्या वंशातील राजा करल ह्यांच्यात झालेले संभाषण सांगतो. एकदा ऋषी वसिष्ठ करलाच्या घरात त्यांच्या आसनावर बसलेले होते. तेथे राजा करल त्यांना प्रश्न विचारतात जे आपल्याला सुद्धा उपयोगाचे आहेत. वसिष्ठ अध्यात्माचे जाणकार आहेत त्यांचा शब्द प्रमाण असतो अशा विषयांत तेथे ऋषी मैत्रवरुणी सुद्धा बसले होते. दोनही हात जोडून राजा विचारतो, "मला त्या ब्रह्माबद्दल माहिती सांगा जेथे पोहोचलेला पुन्हा जन्म घेत नाही. मला आणखीन समजून घ्यावयाचे आहे ते त्या विध्वंसक अवस्थे बद्दल ज्यामध्ये हे जग जाते युगांताच्या वेळी. असें काय आहे जे विध्वंसक अवस्थेत कधी जात नाही, तेसुद्धा सांगा"?

वसिष्ठ सांगतात, "मी जे सांगतो ते नीटपणे ऐक, हे विश्व कसे नष्ट होईल व त्याच बरोबर सांगतो ते काय आहे जे कधीच नष्ट होत नाही". "देवांच्या कालमापना प्रमाणे बारा हजार वर्षे हा एका युगाचा कालखंड असतो. तशी हजार युग झाली कीं एक कल्प होतो. एवढे झाले कीं, एक ब्रह्माचा दिवस होतो. ब्रह्माची रात्र सुद्धा तेवढीच असते. जेव्हां ब्रह्म नष्ट होते शंभू ज्याला आकार नसतो त्याच्या अणिमा आणि लघिमा, गरीमा इत्यादी सिद्धी जागृत होतात. त्या नव्या विश्वाच्या सुरुवातीचा प्रारंभ करतात. त्या शंभूला ईशान म्हणून बोलतात तो सगळ्या अस्तित्वाचा मूळ आहे. त्याचे हात, पाय, इतर ज्ञानेंद्रिय सगळ्या अवकाशात सर्वत्र पसरलेली असतात. त्याची पहिली निर्मिती असते हिरण्यगर्भ. त्याचा वेदांतात बुद्धी असा उल्लेख होतो. सांख्य सांगतात, त्याची

अनेक नांवं आहेत. तो एक असा आहे जो नित्य अक्षर आहे. ज्याच्यातून सगळी क्षर सृष्टी उत्पन्न झाली. सगळे त्याच्या इच्छेतून आले आहे. त्याच्या इच्छेला प्रकृतीने वस्तुनिष्ठ स्वरुप केले आहे. म्हणून त्याला वेदात स्वयंभू असें म्हणतात. त्याने पहिले जाणीव (जागृती) उत्पन्न केली त्याला प्रजापति म्हणतात. त्याला सूज्ञ लोक ज्ञान म्हणतात. ते हिरण्यगर्भातून आले आहे. त्याच्याच मधून अज्ञान म्हणजे भ्रमसुद्धा उत्पन्न झाले आहेत. त्या भ्राचा प्रभाव सगळे कर्म उत्पन्न करत असते. त्या जाणीवेतून सुक्ष्म सूत्र तयार झाली. एका जाणीवेतून दुसरी त्यातून तिसरी अशाप्रकारे ते वाढत जाते. त्यातून वस्तुमात्र तयार झाले. अशाप्रकारे कितीतरी गोष्टी तयार होत होत हे जग बनले आहे. त्यात अनेक प्राणी तयार झाले त्यांना त्यांच्या जाणीवा तयार झाल्या होत्या. त्यातून अपेक्षा आणि त्यांच्या पूर्तता किंवा अपेक्षाभंग असे सगळे वेगवेगळे अनुभव त्यातून तयार होत होते. प्रत्येक चराचराचे अनुभव वेगळे होते. त्यात सगळे प्राणी, वनस्पति, मनुष्य आणि त्यापेक्षा उच्च श्रेणीचे सगळे येतात. असे जे तयार होत होते ते सगळे नश्वर आहेत. अक्षर ब्रह्मातून (ईशान मधून) ते नश्वर ब्रह्म तयार होते. अक्षरातून नश्वर तयार होत असते त्या प्रकारे ह्या सृष्टीचा कारभार चालत असतो. अव्यक्तातून अक्षर ब्रह्म आणि व्यक्तातून नश्वर अशी व्यवस्था आहे. महत (स्वयंभू) त्याचा कर्ता असतो. त्यातील चैतन्य अक्षर असते ते कधीच नाश अथवा बदलत नाही. जे बदलते ते जड असते. त्यांच्यात बदल चैतन्य करत असते. अशी रचना आहे. बदल करण्यासाठी प्रकृती (माया) माध्यमाच्या रुपाने उपलब्ध असते. त्यातच जन्म व मरण ही बदलाची रुप असतात. पुरूष प्रकृतीच्या भ्रमामध्ये एकदा अडकला कीं, त्याला त्यातून निघण्यासाठी प्रथम निरिच्छता स्वीकारावी लागते. त्यातून त्याच्या मुक्ततेचा योग सुरू होतो. त्याच्या अध्यात्मिक अवस्थेनुसार (सत्त्व, रजस अथवा तमस) ते होत असते. ज्या अवस्थेत असेल त्या प्रमाणे रंग त्याला मिळतो. त्यानंतर त्या आत्म्याच्या सुधारण्याच्या अवस्था प्रमाणे त्याची योग साधना ठरत असते. जे सत्त्वगुणी असतात ते त्यांच्या चांगुलपणामुळें देवतांच्या श्रेणीला जात असतात. अशारितीने पंचवीस अवस्था होतात. त्यांतून जात तो अखेरीस अक्षर अवस्थेला येतो

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे तिसावा संपला.

## मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे एकतिसावा

वसिष्ठ सांगतात, आत्म्याला जो विसरभोळेपणा प्राप्त झालेला असतो त्यामुळे तो ब्रह्म आहे हेंच विसरतो. तो मायेने त्याला दिलेल्या अनेक शरीरांत अनेक जन्म फिरत असतो. त्यात कर्मविपाकाप्रमाणे तो अनेक योनींत जन्म घेत असतो. असें अव्याहतपणे होत असते. कधी देवांच्यामध्ये सुद्धा तो जन्म घेत असतो. मनुष्य योनी पासून देव योनी पर्यंत आत्म्याचा प्रवास होत असतो त्याच्या कर्म विपाकाप्रमाणे. कांहीं त्यांच्या लोभ, मोह, क्रोध अशा दोषामुळें नरकातसुद्धा फेकले जात असतात. त्या कारणानें तो अनेक जन्म तसे नरकात खितपत पडत असतात. तेथे त्यांच्या पापाचा हिशोब पूर्ण झाल्यानंतरच ते वरच्या योनीत जन्म घेत असतात. त्यांचे पाप भोग पूर्ण करण्यासाठी कांहीं मनुष्य जन्मातच अनेक व्याधीने दुःख भोगत असतात. दुसर्यांना दुःख देऊन त्यातून आनंद मिळवणारे अनेक प्रकारे दुसर्याना दिलेले दुःख आता स्वतः भोगत असतात. ते कसे दुःखदायक भोग असतील त्याची कोणी कल्पना करू शकणार नाही. कांहीं बैराग्य सिद्ध करण्यासाठी त्यांच्या शरीराचे हाल करत असतात. त्यांना असें वाटते कीं, त्यामुळे त्यांची अध्यात्मिक क्षमता वाढेल पण तसे होत नाही. कारण शरीराचे हाल केल्याने आत्म्याचा फायदा होण्यासारखे कांहीं नसते. चुकीचे गुरू चुकीचे मार्गदर्शन करत असतात. त्यात अडकलेले असंख्य बैरागी कोणताही अध्यात्मिक फायदा न होता विनाकारण त्यांच्या चांगल्या देहाची विटंबना करत असतात. नको नको ते छळ ते त्यांच्या नाजूक शरीराचे करत असतात. अखेरीस त्यात विफल झालेले ते वैरागी कांहींहीं न मिळता मृत्यू पावतात. त्यातील कांहीं शास्त्रात दिलेली उग्र व्रतं जसे चंद्रयान आणि इतर करत असतात. कांहीं सुंदर अशा वन प्रदेशात मजेत राहून त्यांची साधना करत असतात. कांहीं तीर्थयात्रा करतात. कोणी दाट जंगलात बसून तपस्या केल्याचा आनंद भोगतात. कोणी नदी किनारी शांत वातावरणात ध्यान करत असतात. कोणी त्यांच्या आराध्य देवतेच्या मंदिरात बसून व्रत करतात. असे अनेक प्रकार होत असतात. अनेक यज्ञ करण्यात त्यांचा पैसा आणि समय व्यर्थ घालवत असतात.

त्यांना आशा असते कीं, त्यामुळे त्यांना मोक्ष मिळेल, तसे त्यांना धंदेवाईक पुरोहित सांगून त्यांच्या पापात भर घालत असतात. असे पापी पुरोहित नंतर नरकात खितपत पडतात अशा विविध तर्हा जगात होत असलेल्या आपण पहातो. अशा कृत्यांमुळें त्याची अध्यात्मिक अवस्था सत्त्व पासून तम पर्यंत दोलायमान होत असते. अशा गदारोळात कित्येक धन कमावतात आणि पुण्य गमावतात. परंतु, त्यांना त्याची क्षिती नसते. असे आत्मे अज्ञानातून आणखीन अज्ञानाकडे जात असतात पण त्यांना ते माहीत नसते. असे कित्येक आत्मे त्यांच्या अज्ञानामुळे पुण्य समजून पाप करत असतात. त्यांच्या कट्टू भागात पर्यायाने अडकत असतात. हा खेळ प्रकृती खेळत असते तिला ब्रह्माने (महतने) दिलेल्या प्रेरणेनुसार. तिचे काम असते अशा भरकटलेल्या आत्म्यांना आणखीन भरकटत ठेवण्याचे. प्रकृतीच्या (मायेच्या) मोहजालात अडकलेला आत्मा (पुरूष) सुखाच्या मागे धावत असतो पण त्याऐवजी त्याला दुःख मिळते, त्याचा क्रोध अनावर होतो व तो आणखीन खोल गर्तेत शिरत असतो. मानव जन्म पाप आणि पुण्य कमावण्यासाठी असतो म्हणून तो जन्म विशेष महत्वाचा असतो. ह्या योनीतून तो प्रगति करत देव योनीत जातो. तेथे पुण्यभोग घेतल्यावर तो पुन्हा मनुष्य होतो असे कित्येक जन्म होत असतात त्याची कांही मोजदाद नाही. परंतु, पुण्य केल्यानंतर जर तो त्याबद्दलसुद्धा उदास असेल तर त्याला आणखीन पुण्य करण्यासाठी पुन्हा मनुष्य जन्म मिळत असतो. त्याच्या पुण्याच्या राशी वाढत असतात. असा योगी मोक्षाकडे जात असतो. म्हणजे पुण्य भोग न घेणे हे महत्वाचे असते मोक्षार्थीसाठी. त्या विविध जन्मांचे नियंत्रण प्रकृती करत असते. आपण जे सत्कृत्य (पुण्य) करतो त्याचे फळं नाकारण्यात मोक्षाचा मार्ग तयार होत असतो. जे त्यांच्या सत्कृत्याच्या बदल्यात सुखोपभोगाची अपेक्षा करतात ते तसेंच गटांगळ्या खात रहातात. आत्म्यात जरी कांहीं फरक होत नसला तरी त्याच्या बरोबर असलेला लिंगदेह (सुक्ष्म शरीर) ते फरक त्याच्यात धरून असतो. त्याप्रमाणे ते भोग त्या पुरूषाला (आत्म्याला) भोगावे लागतात. त्याच्या अध्यात्मिक अवस्थेनुसार (सत्त्व, रज, तम) ते होत असते. मृत्यूनंतर तो आत्मा देहहीन अवकाशात भरकटत असतो त्याच्या वासना बाळगत त्यात त्याचे दुःख असते पण त्याला ते समजत नाही. मायेच्या भ्रम किमयेने पछाडलेला

समजतो कीं तो मरतो, वस्तुतः तो कधीच मरत नसतो त्याचा देह मरत असतो. अशा भावनांमुळें तो त्यात आणखीन अडकत असतो. त्यात नसलेल्या गुणांत तो त्याच्या भ्रमामुळे अडकत असतो. तो सत्यापासून दूर जात असतो कारण त्याच्या जाणीवा सुद्धा भ्रष्ट झालेल्या असतात. त्याच्या शरीराचा जीव जे भोगतो ते सगळे भोग तो स्वताचे समजून त्यात गुंतून रहातो. त्याला त्याचे (पुरूष अथवा आत्मा) भोग तो समजून त्यात तो स्वताहून अडकत असतो.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे एकतिसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
# भाग एकशे बत्तिसावे

वसिष्ठ सांगतात, अशारितीन तो आत्मा त्याच्या सारख्या इतर अनेक आत्म्यांसह असंख्य जन्म घेत व मरत अज्ञानात रुतलेला त्याचा ऐहिक जीवनाचा प्रवास करत असतो. त्याचे चैतन्य मिळणार्या प्रत्येक शरीराला व त्याच्या जीवाला चैतन्यमय उर्जा पुरवून संपत असते. त्यामुळें त्याची अध्यात्मिक अवस्था सत्त्व वरून तमाकडे (खालच्या पातळीला) जात असते. जर तो आत्मा त्याच्या मनुष्य जीवनात ध्यान, तपस्या, ब्रह्मचर्य, जप करणे, संयमन, मर्यादा असे अध्यात्म सुधारणारे उपक्रम करत असेल तर तो योग्य अवस्थेत (सात्त्विक) रहातो नाहीतर त्याची खालावलेली अवस्था त्याला जर त्या परिस्थितीत मृत्यू आला तर खालच्या (हीन) योनीत जन्म घ्यावयाला लावते. त्यासाठी अध्यात्मिक उर्जा सतत वृद्धींगत ठेवणे आवश्यक असते. जर तशी ती सतत वृद्धींगत होत असेल तर त्याला आणखीन उच्च दर्जाच्या योनीत जन्म मिळत असतो. त्याचे कारण सृष्टीतील सगळे चराचर त्यांच्या योनीत जन्म घेतात कारण त्यांच्या आत्म्याची अध्यात्मिक अवस्था त्या योग्यतेची असते. अति क्षुद्र योनी पासून उच्च दैविक (देव, दानव, यक्ष इत्यादी) योनी पर्यंत तो कोठेही जन्म घेत असतो. ही प्रकृतीची (मायेची) किमया आहे. आपण कोठल्या योनीत पुढच्या जन्मी जन्म घ्यावा ते ह्या जन्मात किती अध्यात्मिक उर्जा संपन्न केली त्यावर अवलंबून असते. प्रत्येक योनीची निश्चित ठरलेली अध्यात्मिक अवस्था (कमाल व किमान) असते. त्या प्रमाणे माणसाच्या योनीची कमाल व किमान अध्यात्मिक अवस्था ठरलेली आहे. त्या मर्यादेत जर त्याची ती अवस्था असेल तर तो मनुष्य योनीत जन्म घेत असतो. सतत पापाचरणात जीवन व्यतीत करणारे त्यांची अध्यात्मिक योग्यता घालवून बसतात व मृत्यूनंतर त्यांना जो पुढचा जन्म मिळतो तो त्या कमी अवस्थेच्या योनीत असतो. म्हणून अध्यात्म साधना किती महत्वाची असते त्याचे पुन्हा पुन्हा मनुष्य जन्म मिळण्यासाठी ते लक्षात घे. आपली अध्यात्म साधना केवळ मोक्षा साठी असतात असे नाही.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे बत्तिसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
# भाग एकशे तेहतिसावा

जनक विचारतात, "स्त्री आणि पुरूष ह्यांचे निकट संबंध प्रकृती (माया) आणि पुरूष (महत) ह्यांच्या सारखे असतात कां"? असें विचारण्याचे कारण पुरूषाशिवाय स्त्री संतति देऊ शकत नाही आणि स्त्रीशिवाय पुरूष प्रजनन करू शकत नाही. म्हणजे ते दोघे अनिवार्य असतात. जसे सृष्टीच्या व्यवहारात ब्रह्म (महत) आणि माया (प्रकृती) एकत्र असणे अनिवार्य असते. ते समजण्यासाठी महतचे कोणते गुण आणि प्रकृतीचे कोणते गुण ह्यात काम करतात ते सांगा. शरीरातील अस्थी, मज्जा, आणि नसा पुरूषाच्या द्रव्यातून बनतात. त्वचा, मांस, रक्त स्त्रीच्या द्रव्यातून बनतात असे साधारणपणे समजले जाते. जर असे असेल तर असे मिश्र संयुगाचे बनलेले शरीर धारण करणारा आत्मा मोक्षास कसा जाऊ शकतो? आपण आपल्या दिव्य दृष्टीने त्यात काय खरे ते पाहू शकता. तुम्हास असा प्रत्यक्ष पुरावा मिळतो कां, कीं मोक्ष असे कांही असते. सांख्य निवृत्ती मानतात ते शक्य आहे ह्या निरीक्षणाप्रमाणे पण पूर्ण निर्विकल्प असा मोक्ष शक्य असेल असे वाटत नाही. मग योगी काय करत असतात"? जर तो शक्य नसेल तर मोक्षाच्या प्रयत्नात आपला समय व्यर्थ घालवण्यात काय अर्थ आहे. त्याचा अर्थ चांगुलपणा सोडावा असे मला सुचवावयाचे नाही कारण त्यामुळे जी अध्यात्मिक वृद्धी होते ती त्याला उच्च योनीत जन्म देण्यात उपयोगाची असते. फारतर जसे सांख्य सांगतात आपण निवृत्तीचा विचार करावा असे मला सुचवावयाचे आहे.

वसिष्ठ बोलतात, तू जे वेदांबद्दल आणि इतर संहितांबद्दल बोलतोस ते चुकीचे नाही. तू त्या ग्रंथातील शब्दार्थ पहात आहेस, त्यातील गर्भितार्थ लक्षात घे. म्हणजे तुझे गैरसमज दूर होतील. मी तुला आता सांगतो त्यातील गर्भितार्थ काय आहे. त्यासाठी प्रथम आपल्याला मोक्ष म्हणजे काय ते समजून घ्यावे लागेल. ज्यां सूज्ञ लोकांनी सांख्य आणि योग चांगले अभ्यासले आहेत ते काय सांगतात ते पाहू. पहिला लक्षात घे कीं, सांख्य आणि योग एकाच सत्याचा अभ्यास करत असतात. ज्याला ते लक्षात आले तो शहाणा समजावा. त्वचा, मांस, रक्त चरबी, पित्त, मज्जा, नसा आणि कर्म आणि

ज्ञान ज्यांच्याबद्दल तू बोलत आहेस, त्या शरीरातून दुसरे शरीर तयार होत असते. जर ब्रह्म निर्गुणी आहे तर त्याला कोणत्याही कारणानें कोणताही गुण कसा प्राप्त होणार"? जे गुण शरीराचे दिसतात त्याचा आत्म्याशी संबंध नसतो. आत्मा प्रामुख्याने अध्यात्मिक उर्जेचा स्त्रोत असतो. तो एकच गुण त्यास असतो कीं, तो चैतन्यमय आहे. बाकीचे वास्तविक गुण मायेने तिच्या भ्रमसिद्धीने उत्पन्न केलेले असतात. स्त्री पुरूषांचे संबंध पूर्णता वास्तविक स्वरुपाचे असतात. त्यात आत्मे (दोनही) गुंतलेला नसतात जसे त्यांची शरीरं गुंतलेली असतात. शरीराचे गुण त्या आत्म्याला चिकटतात हे जरी खरे असले तरी सत्यात पाहिले तर ते गुण आत्म्याचे नसतात हे लक्षात येईल. अध्यात्म साधनेचा अर्थच असा आहे कीं, आत्मा त्याला मायेच्या विविध गुणांपासून अस्पर्ष ठेवेल. ज्याला ते समजले आणि जमले तो खरा योगी ठरतो. ज्या साधकाला प्रकृतीचे गुण बाजूला ठेवून पुरूषाचे (ब्रह्माचे) संवर्धन करता येते तो खरा योगी असतो. अक्षर आणि क्षर अशा दोन गुणाने ते दाखवले जातात. आत्मा अक्षर आणि ज्यांना विविध रुप रंग आकार येतात ते सगळे क्षर असतात. माया क्षर गोष्टींची निर्मिती करत असते व त्यांनी ती पुरूषाला (आत्म्याला) वेढून ठेवत असते. त्याची अनेक उदाहरणं देता येतील.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे तेहतिसावा संपला.

## मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे चौतिसावा

जनक विचारतात, "आपण सांगता कीं, एकमेव रुप हे अक्षराचे लक्षण असते व वैविध्य हे क्षराचे लक्षण असते. मला त्यातील फरक अजून समजलेला नाही. अज्ञानी समजतात कीं, आत्म्याकडे अनेक सिद्धी असतात. त्यात त्याची वैविध्यता येत नाहीं कां"? "माझ्या गोंधळलेल्या मनाला त्यातील फरक समजला नाही. त्यामुळे मला असे कसे शक्य होते ते समजत नाही. म्हणून मला पुन्हा एकदा ते समजावून द्याल तर बरे होईल. त्यातील एकमेव रुप आणि वैविध्य कसे एकाच वेळी शक्य असते ते सांगा. मी अज्ञानी आहे तरी कृपा करा". त्यात सांख्यांचे विवेचन आणि योगाचे असें दोनही मला समजेल असें सांगा.

वसिष्ठ सांगतात, मी तुला समजेल अशा शब्दात ते सांगतो. प्रथम मी योग पद्धतीचे विवेचन सांगतो. ते नीटपणे ऐक. योग पद्धत समजणारे सांगतात कीं, चिंतन करणे (ब्रह्माचे) हा मार्ग आहे ते समजण्यासाठी. त्यात दोन प्रकारे चिंतन होत असते. एका प्रकारात मनाची एकाग्रता करणे आणि दुसर्या मध्ये प्राणायाम करणे असे असते. शरीराच्या तीन नित्य विधी करतांना सोडून (मुतणे, शौंच करणे, थुकणे) सर्वकाळ तो चिंतन (आराध्य दैवतेचे ध्यान साधना) करत असेल. प्राणायाम तो शास्त्रशुद्ध पद्धतीने करत असेल. ज्याने त्याच्या वासनांवर पूर्ण नियंत्रण मिळवले आहे असा योगी ते साध्य करू शकतो. त्यालाच योग साधना असें म्हणतात. पूर्ण योग अवस्थेत असलेला ध्यानस्थ मनुष्य त्याच्या ज्ञानेंद्रियांनी माहिती जमा करत नसतो, म्हणजे तो ऐकत नसतो, त्याला वास येत नाही, चव समजत नाही, तो कांहीं पहात नाही, त्याला स्पर्श ज्ञान रहात नाही, त्याच्या मनात कोणताही विचार येत नाही, असा तो एकाद्या निर्जीव ओंडक्यासारखा होतो, जर तो ध्यान चिंतन योग्य प्रकारे करत असेल. अशा अवस्थेत असलेला त्याच्या अंतरमनात सुद्धा कांहीं विचार करत नसतो. तो ब्रह्माच्या जवळ जात असतो. अशा अवस्थेत जो योगी सदैव रहात असतो त्याची अध्यात्मिक उर्जा वाढत असते. कारण अशा अवस्थेत त्या आत्म्याचा थेट संपर्क

महतशी (स्वयंभूशी) जोडला गेला असे होते व त्या कडून त्या आत्म्याला अध्यात्मिक उर्जेचा पुरवठा होत रहातो. तशा परिस्थितीत महत योग्याच्या आत्म्याशी थेट संपर्क करत असते आणि विचारसागरातील विचार त्याला मिळत असतात. ज्यामुळें त्याचे ज्ञान वाढत असते. असा योगी त्या सिद्धीमुळे त्याच्या कल्पना विश्वाची सीमा वाढवत असतो व त्या द्वारा तो ज्ञानी होत असतो जर त्याला त्या प्रकारच्या ज्ञानाची अभिलाषा असेल. ते ज्ञान अनुभवसिद्ध प्रकारातील असते. ह्यालाच योग साधना अथवा नुसते योग असें म्हणतात. तो अक्षर ज्ञानाच्या अवस्थेत गेलेला असतो. मी तुला थोडक्यात योग म्हणजे काय ते सांगितले. आता सांख्य ते ज्ञान कसे प्राप्त करतात ते सांगतो. सांख्य सांगतात कीं, आपल्यातील दोष काढून टाकले कीं जे शुद्ध रुप रहाते ते ज्ञानमय असते कारण तोंच त्याचा मुख्य स्वभाव आहे. सांख्य समजतात कीं, महत (विधाता) मुख्य रुप असते व त्यातून प्रकृती तयार होते. त्यातून जागृती उत्पन्न होते. त्यातून अनेक स्थुल आणि सुक्ष्म जाणीवा पुढे येतात. त्यात पांच मुख्य आहेत त्या अशा, आवाज, आकार, स्पर्श, रुची, गंध अशा आठ प्रेरणा असतात प्रकृतीच्या. त्या आठ प्रेरणांच्या सोळा आणखीन प्रेरणा होतात. त्यामध्ये पांच महाभूत असतात, त्याशिवाय मन आणि बुद्धी असते. सांख्यांच्या मते ह्या सोळा मुलभूत प्रेरणा आहेत व त्यांच्यातील दोष काढून टाकले कीं, चित्त शुद्धी होते. त्या शुद्धीसाठी ते सगळे एक एक करून नष्ट करावयाचे असतात. सांख्य समजतात कीं, विश्व जसे एक एक करून विकसित होत गेले जसे कमळाच्या पाकळ्या उमलतात. आणि जेव्हां विश्व नष्ट होते तेव्हां त्यातील सर्वात शेवटी उमटलेले पहिला नष्ट होते अशारितीने उलट्या क्रमाने ते सगळे घटक आणि त्यांच्या प्रेरणा नष्ट होत होत अखेरीस प्रकृती व त्या आधी महत विचारसागरात मिळून जाते. सांख्य समजतात कीं, प्रत्येक वेळी विश्वाचा नाश अशा रितीने होत असतो. त्यांच्या कल्पनेप्रमाणे विश्वाची सुरूवात सुद्धा अशीच गुणांच्या क्रमवार विकासातून होत असते. हा उत्क्रांतीचा विचार सांख्यानी प्रथम मांडला आहे. कांहींहीं एकदम तयार झालेल नाही असें त्यांचे मत आहे. प्रत्येक गुण विकासामागे निश्चित कारणं असली पाहिजेत. अशाप्रकारे विश्वाची उत्पत्ती आणि विनाश होतो असें सांख्य समजतात. जे उरते तो विचारसागर असतो त्याला कोणी स्वयंभू म्हणतात, कोणी महत, कोणी मनस

तर कोणी ब्रह्म. अशी अनेक नांव निरनिराळ्या ऋषींनी दिली आहेत. त्या मधील असंख्य विचारांच्या अभिव्यक्तीतून विश्व आकार घेत असते. असंख्य विचारांतून हे विश्व तयार होत असते. म्हणून सांख्य द्वैत मानतात त्या उलट योग अद्वैत मानतात. योग विचार विचारसागराचे महत्व लक्षात घेत नाहीत. ते समजावून सांगण्यासाठी अनेक ज्ञानी विविध उपमा वापरत असतात. त्यातील एक आहे त्या प्रमाणे प्रकृती शेतासारखी असते असें सांगितले आहे. त्यात ते सांगतात कीं, आत्मा प्रकृतीची शेती करत आहे. वेदांतात त्याला क्षेत्रज्ञ म्हंटलेले आहे. म्हणून सांख्य त्याला पुरूष म्हणतात. त्यांच्या मते क्षेत्रज्ञ आणि क्षेत्र भिन्न असतात. ते एक नसतात. बुद्धी आणि ईश्वर ह्यांच्या पेक्षा पुरूष वेगळा असून त्याच्या वर कोणीही नाही असें ते समजतात. अशी सांख्यांची विचारधारा आहे मी तुला ती सांगितली. ज्यांना हे समजते ते निवृत्ती प्राप्त करू शकतात. त्यासाठी ते त्यांच्या सगळ्या इच्छा त्याग करून तपस्या करत अंतिम सत्याकडे जातात. त्या अक्षर अवस्थेत ते समाधी घेतात. ज्याना त्यातील वैविध्यामुळें ते अनेक आहेत असे वाटते ते अज्ञानात असतात. त्यांना ब्रह्माची एकसुत्री समजली नाही असे समज. ज्यांना ब्रह्माची एकसुत्री समजली ते निर्वाणीला जातात. तेथून त्याना पुन्हा त्यांचे दोष काढण्यासाठी जन्म घ्यावा लागत नाही. त्यांच्यात कोणताही दोष उरलेला नसतो. अशा आत्म्यांना कसलाही मोह उरलेला नसतो.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे चौतिसावा संपला.

## मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे पस्तिसावा

वसिष्ठ पुढे सांगतात, मी आतापर्यंत सांख्य विचार काय आहे ते सांगितले आहे. आता मी तुला विद्या आणि अविद्या ह्यांची माहीती देत आहे. ज्ञानी सांगतात कीं, प्रकृत्ती जिच्यात उत्पत्ती आणि विनाश असें गुण असतात ती अविद्या समजावयाचे. ज्या मध्ये ते गुण (दोष) नाहीत ती विद्या समजावयाची असते. सांख्यांच्या भाषेच पुरूष आणि योगाच्या भाषेत ब्रह्म हे त्या दोषाने ग्रासलेले नसल्याने विद्या समजले जातात आणि माया म्हणजे प्रकृती आविद्या समजली जाते. सांख्यांच्या विष्लेषणा प्रमाणे विद्या म्हणजे काय ते सांगतो. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे आपले ज्ञानेंद्रीय विद्या प्रकारात येतात आणि कर्मेंद्रियं अविद्या प्रकारात येतात. आपल्या सगळ्या जाणीवा विद्या मध्ये येतात. ब्रह्म अथवा महत, पुरूष विद्या आहेत. प्रकृती मधील अव्यक्त विद्या आहे आणि व्यक्त अविद्या आहे. ज्ञान विद्या आहे पण माहिती अविद्या समजली आहे. आता मी सांगतो अक्षर आणि क्षर अस्तित्वांबद्दल. आत्मा आणि प्रकृती ह्याची सापेक्ष अवस्था दोनही प्रकारात येते. ते कसे ते जे मला समजले त्याप्रमाणे सांगतो. त्यांना प्रारंभ आणि अंत नसतो. त्यात जेव्हां ते अव्यक्त असतात ते अक्षर असतात आणि जेव्हां ते व्यक्त (वास्तविक रूप घेतात) असतात ते क्षर ह्या गुणांनी बाधीत होतात. योगी जेव्हां ब्रह्मात विलीन होतो त्याचा आत्मा अक्षर होतो जो तो पर्यंत क्षर गुणानी बाधीत असतो. आत्मा अक्षर झाल्यानंतर उरलेली माया म्हणजे प्रकृती क्षर होते. जसे आत्मा ब्रह्मज्ञानामुळें प्रकृतीच्या बंधनात रहात नाही तसे तो अक्षर समजला जातो परंतु, जोवर तो देहात आहे म्हणजे मायेत गुंतला आहे तो क्षर समजला जातो पण जसे तो देह सोडून देतो (समाधी घेतो) तो अक्षर होतो. आत्मा त्याचे ज्ञान पूर्ण झाल्यावर तरीसुद्धा प्रकृतीशी (मायेशी) संयोगाने कामं करू शकतो तरी त्याचे मायेशी तशा परिस्थितीत नाते परकेपणाचे असते म्हणजे तो समजून असतो कीं. ती त्याच्यापेक्षा भिन्न आहे. तो ज्ञानी आत्मा तशा परिस्थितीत मायेत (प्रकृतीत) गुंतून रहात नाही. आता त्याच्या सुधारलेल्या जाणीवामुळें त्याचे जगाकडे पहाण्याचे दृष्टिकोन बदललेले असतात. मी तुला सांगितले

अक्षर आणि क्षर गुणांची माहिती. आता मला जे माहित आहे ते सांगणार आहे त्या तरल संवेदनाने जाणवणारे ज्ञान जे सहज प्राप्त होत नाही. मी तुला सांख्य आणि योग विचारांप्रमाणे ब्रह्म, माया ह्यांचे संबंध कसे असतात ते सांगतो. दोनही शाखांत थोड्या फार फरकांने तेंच सांगितले आहे तेंच मी तुला सांगणार आहे. सांख्याची सत्य सांगण्याची पद्धत विलक्षण प्रभावी असते. त्यात मोक्षापेक्षा इतर अनेक मुद्दे अभ्यासले जातात. योग शास्त्र ते मान्य करते कारण योग केवळ मोक्षापुरते उपयोगाचे असते. सांख्याची व्याप्ती जास्त असते त्याबद्दल मी आधी सांगितले आहे. सांख्यांचे विशेष असें कीं त्यांच्या मते विश्वाचे सगळे गुण पंचवीस असून परमेश्वर (विधाता) त्या पलिकडील असतो असे ते मानतात. कारण परमेश्वराला गुण नसतात. तो निर्गुणी असतो. हा त्याचा एकमेव गुण म्हणून मानला गेला आहे. योग तितक्या खोलात जात नाहीत. ते सांगतात कीं, ब्रह्माच्या इच्छेने माया उत्पन्न झाली आणि हा पसारा झाला त्यात ब्रह्माचे अंश आत्म्याच्या रुपाने अडकले. ते अद्वैत मानतात. परंतु, विचारसागराचा विचार प्रत्यक्षात करत नाहीत. ज्याचा विचार केल्यामुळे शांख्य द्वैत मानत असतात.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे पस्तिसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे छत्तिसावा

वसिष्ठ पुढे सांगतात, जनका आता मी तुला सांगणार आहे बुद्ध आणि अबुद्ध ह्यांची माहिती. सत्त्व, रज आणि तम ह्या तीन अध्यात्मिक अवस्थांची, ह्यात काम करण्याची पद्धत पहावयाची आहे. मायेच्या भ्रमसिद्धीमुळे ते तीन गुण अनेक रुप घेतात. ब्रह्मांश आत्मा बनून सृष्टीत वावरू लागतो तो त्या भ्रमात ह्या सृष्टीला सत्य समजून त्यात गुंततो. त्यामुळें आत्मा स्वताचे खरे स्थान जे ब्रह्म आहे ते घालवून बसतो. तो त्याच्या विविध अध्यात्मिक अवस्थांप्रमाणे (सत्त्व, रज आणि तम आणि त्यांच्या अनेक उप अवस्था) अनेक योनींतून जन्म घेत असतो. तरी त्याला त्याच्या अव्यक्त स्वरुपाची साधारण कल्पना असते. म्हणून त्याला बुद्धीमान समजतात. तो बुद्ध समजावा. त्या अवस्थेत त्याला माया ओळखत नाही ती त्याला तिचीच एक भाग समजून काम करत असते. त्या मायेच्या परिस्थितीला अज्ञान अवस्था, अबुद्ध, असें समजतात. त्या परिस्थिती ब्रह्म आणि माया वेगळे असल्याचे दृष्य दिसते. ह्याला पूर्ण अज्ञान अवस्था समजली जाते. त्या अवस्थेत द्वैत अनुभवण्यास येते. फक्त खरे ज्ञानी ह्या गोंधळापासून दूर राहू शकतात. बाकी सारे द्वैत मान्य करतात. त्या अज्ञान अवस्थेत आत्मा स्वताला विविध विशेषणात पहात रहातो, कधी ब्राह्मण कधी शुद्र समजतो. स्वताचे खरे अव्यक्त रुप मात्र त्याचा ध्यानात येत नाही. ध्यान साधना, ब्रह्मचर्य, संयमन, मर्यादा आणि इतर योगीक व्रतं तो करतो, तो सुशुप्तीत जातो तसे त्याचा संबंध विचारसागरातील विचारांशी येऊ लागतो व त्यामुळें त्याच्या बुद्धीत सुधारणा होऊ लागते. त्यात तो प्रगति करतो तसें त्याचे अज्ञान कमी होत जाते व त्याला नवीन जाणीवा प्राप्त होतात. मायेचे जड (चैतन्यहीन) रुप तो समजू लागतो. आपण चैतन्यमय (विचार करू शकणारे) आहोत व बाकीचे सगळे ज्यात आपण वावरत आहोत ते जड आहे हे त्याच्या लक्षात येते. त्यात जशी त्याची अध्यात्मिक अवस्था सुधारत जाते व तो पूर्ण सात्त्विक होतो त्याला दिव्य दृष्टी प्राप्त होते. तो क्षर (अनेक गुणांत अडकलेला) अवस्थेतून अक्षर अवस्थेत (गुणहीन) जातो. जरी त्या जाणीवा त्याला प्राप्त झाल्या तरी तो अजून

पूर्णपणे ज्ञानी अवस्थेत (बुद्ध अवस्था) गेलेला नसतो. त्याची अवस्था माहितगाराची असते. आत्मा त्या माहितीचे ज्ञानात रुपांतर करण्यासाठी घोर तप करू लागतो. कारण त्याशिवाय तो त्याच्या कडे असलेल्या माहितीचे ज्ञानात (अनुभवसिद्ध माहिती) रुपांतर करू शकत नाही. त्याच्या तपोश्वरणाने त्यात सुधारणा होत असते. हे सगळे श्रृतीमध्ये जे दिले आहे ते मी तुला सांगितले. वैविध्य आणि एकरुपता त्याला एकाच वेळी लक्षात येऊ लागतात. मायेच्या कारभारात जी अनेक रुप त्याला दिसतात ती एकाच मूळ रुपाची विविध रुप झाली आहेत ह्याची विलक्षण जाणीव त्याला होते व तो अद्वैत हेंच खरे अस्तित्व आहे हे समजू लागतो. उदाहरणार्थ, मासा व तळे दोन वाटतात परंतु, सत्यात ते एकच आहेत अशी जाणीव त्याला होते. मासा आणि तळें एकाच सत्याची दोन भ्रमसिद्ध रुप आहेत हे त्याच्या लक्षात येते. मित्र आणि शत्रू एकच आहेत हेसुद्धा तो समजतो. त्या अवस्थेत त्याचे ह्या सृष्टीचे बाबतीतील समज अद्वैतावर आधारीत असतात. हे ज्ञान झाले कीं त्याला मोक्ष मिळाला असे श्रृती सांगतात. ही जाण ह्याला सांख्य सव्विसावा गुण मानतात. तो अंतिम गुण आहे. सत्य समजण्यासाठी आत्म्याला विचारसागराशी संपर्क होणे अगत्याचे असते ते होण्यासाठी त्याला ध्यान धारणा, सोहम साधना, विपाशना अशा विविध योगांच्या मदतीची गरज असते विचारशून्य अवस्थेत जाण्यासाठी. जोवर मनात सतत विविध विचार विनाकारण येत असतात तोवर ते शक्य होत नाही. विचारशून्य अवस्था प्राप्त करणे व त्यात रहाणे ह्यालाच तपस्या असें समजतात. जो योगी ते सातत्याने करत असतो तोंच त्या जागृत अवस्थेत पोहोचतो. अहो राजा, मी तुला ते सगळे चांगले समजावून सांगितले आहे. जे वेदांत सांगितले आहे. आता मी तुला सांगतो कोणाला ही विलक्षण माहिती सांगावयाची. ही माहिती त्यांना द्यावयाची ज्यांना अशा गोष्टीत स्वारस्य आहे. ज्याला ते समजण्याची कुवत आहे, जो वेद समजू शकतो, जो सदाचारी आहे, जो सात्त्विक आहे, जो श्रद्धावान आहे, जो शांतवृत्तीचा समजूतदार आहे. जो वाद करण्याच्या मनस्थितीत नसतो, जो मूर्ख नाही. ज्यांच्यामध्ये हे गुण नाहीत त्यांना ही माहिती देऊनही उपयोग होणार नसतो. उलट वाद करत बसतात. ज्यानी ही माहिती मनावर

घेतली तो मोक्षप्राप्तीसाठी योग्य होईल. मला खात्री वाटते कीं, तुझ्या सगळ्या शंकाकुशंकांचे निरसन झाले आहे.

भिष्म पुढे बोलतात, "अरे युधिष्ठीरा मी तुला ते ब्रह्मज्ञान सांगितले ज्याच्या आकलनाने तू ब्रह्मात एकरुप होण्यासाठी योग्य होतोस. जे महान ऋषी वसिष्ठ करलाला सांगत होते. ती माहिती साक्षात अनुभवल्यानंतर तो जाणकार पूर्ण ज्ञानी होईल. पहिला ते हिरण्यगर्भाने वसिष्ठांना सांगितले. वसिष्ठानी नारदाला सांगितले, त्यांनी मला सांगितले अशा रितीने ते तुझ्यापर्यंत पोहोचले आहे.

ज्याना क्षर आणि अक्षर कोण ते समजले त्याचे सगळे संशय नष्ट होतील. त्याला ब्रह्माचे ज्ञान मिळण्याचा मार्ग सुकर होईल. त्याला हे ज्ञान झाले कीं त्याचे जन्म जन्मांचे फेरे बंद होतील. तो अज्ञानातून ज्ञानाच्या अवस्थेत कायम जाईल. अशारितीने जो सात्त्विक झाला तो पुन्हा कधी रजस किंवा तमस होणार नाही.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे छत्तिसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग एकशे सदोतिसावा

भिष्म सांगतात, एकेकाळी जनकाच्या वंशातील एक राजा वनात मृगया करण्यासाठी निघाला होता. तो सांबराची शिकार करणार होता. तेथे तो एका भृगूवंशातील ब्राह्मणाला पहातो. जो त्याच्या आसनावर बसलेला होता. राजा वसुमन त्याला वंदन करतो. त्यानंतर राजा त्या ब्राह्मणाला प्रश्न विचारतो, "जो इसम अपंग असून त्याच्या वासनांच्या आधीन आहे, त्यांने काय करावे म्हणजे त्याचे ह्या आणि नंतरच्या जीवनात भले होईल"?

योग्य प्रकारे सन्मान केलेला तो ब्राह्मण त्याला जवाब देतो. "दोनही जीवनात जर तुला सुखाने रहावयाचे असेल तर चांगुलपणाने कोणत्याही जीवाला त्रास होणार नाही अशाप्रकारे तुझ्या कामना मर्यादा सांभाळून पूर्ण कराव्या लागतील. चांगुलपणा हा पुण्याचा मार्ग आहे ऐहिक जीवनात. अरे दूरदृष्टी हरवलेल्या राजा, तुझ्या सगळ्या इच्छा अजून पूर्ण नाही झाल्या कां"? ज्याला ज्ञान हवे असते त्याला ज्ञानाच्या मागे लागावे लागते. तसेंच ज्याला चांगुलपणाची फळं चाखावयाची असतात त्याला चांगुलपणा आचरावा लागतो. परंतु, जर कोणी वाईट मनुष्य पुण्य कमावण्याचा प्रयत्न करेल तर ते शक्य होत नाही. त्याच प्रमाणे एकादा चांगला मनुष्य पुण्य करण्यासाठी अवघड काम करण्याचा प्रयत्न करतो तेव्हां ते त्याला सोपे जाते. वनात रहाणारा जर मनाने नगरातील सोयींची स्वप्न पहात असेल तर त्याला वनवासी समजणे योग्य होणार नाही त्याला नगरवासी समजावे लागते. कारण मनाने जे केले जाते त्यात असते पुण्य आणि पाप कृत्यांचे परिणाम. त्या उलट नगरात रहाणारा वनाच्या जीवनाची स्वप्न पहात असेल तर तो नगरवासी न ठरता वनवासी समजला पाहिजे. कर्म आणि कर्माचा त्याग ह्या दोनही गोष्टी चांगुलपणाला सहाय्यभूत असल्या पाहिजेत. त्याचे बोल, काम करण्याची रीत, काळ वेळ असे सगळे शुद्धतेच्या परंपरेला धरून असले पाहिजे. ते करण्या मागील उद्देश सात्त्विक असला पाहिजे. दान करतांना सत्पात्र करावे. त्यासाठी सन्मार्गाने ते धन मिळवलेले असले पाहिजे. त्या दाना मागे मनाची शुद्धता असली

पाहिजे. त्यात क्रोध, द्वेष, आसुया असें दोष नसावेत. जो ब्राह्मण स्वतः शुद्ध मनाचा आहे, मन मोकळा आहे, ज्याचा जन्म शुद्ध आहे असा ब्राह्मण दान देण्यासाठी योग्य असतो. तो शुद्ध रक्ताचा समजला जातो ज्याची माता एकाच पतीची पत्नी आहे. तसेंच तिचा वर्ण व तिच्या पतिचा वर्ण एकच असला पाहिजे, तसा ब्राह्मण वेदांचा अभ्यास करणारा असला पाहिजे. तसेंच तो सहा कर्तव्ये (यज्ञ करणारा, पौरोहित्य करणारा, शिकणारा, शिकवणारा, दानं करणारा, दानं स्वीकारणारा) नियमितपणे करणारा असला पाहिजे. अशा सत्पात्र ब्राह्मणांस दान केले पाहिजे. तसे दान कारणी लागले असे समजावे. कर्म करणार्याचे वर्तन, प्रसंग, जागा ह्यावरून चांगुलपणा होता कीं, नाही ते ठरत असते. म्हणजे चांगुलपणा सापेक्ष असतो. केलेल्या पापकर्माचा जो भोग भोगावा लागतो त्यातील पांचवा हिस्सा त्याच्या शरीराला भोगावा लागतो. शौचास केल्यानंतर चमचाभर लोणी खावे त्यामुळे पचनसंस्था चांगली रहाते. शरीर शुद्ध राखण्यासाठी ते आवश्यक समजले आहे. अशाप्रकारे जो त्याचे सगळे व्यवहार शुद्ध ठेवतो त्याला पुण्य मिळत असते. ते पुण्य त्याला त्याच्या पुढच्या जन्मी उपयोगाचे असते. चांगले आणि वाईट विचार सगळ्यांच्या मनात येत असतात. वाईट विचारांचा त्याग करून आपल्या योग्यतेचे वळण राखावयाचे असते. अरे राजा, तू अधीर आहेस स्वभावतः ते योग्य नाही. धैर्याने वागावयाला शिक. तुझ्यात अविचारीपणा मला दिसतो ते राजाला शोभत नाही, बुद्धीमान हो. शांत हो. ज्याला पुण्य करावयाचे आहे तो पुण्यवंतांच्या सहवासात राहिल. खरे सांगतो, निश्चयाचा खंबीर जो असतो तो राजा यशस्वी होतो. ययाति त्याच्या गर्वीष्ठपणामुळें पुण्य घालवून गेला होता, तो खाली फेकला गेला. तरी तो त्याच्या पश्चात्ताप करण्यांने पुनः वर गेला होता. तू चांगल्या लोकांना कामाला लावून पुण्य मिळवू शकतोस.

भिष्म बोलतात, ते ब्राह्मणांचे ऐकल्यावर राजा वसुमन शिकारीचा विचार टाकून देतो.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे सदोतिसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे अडोतिसावा

युधिष्ठीर विचारतो, अहो पितामहा, तुम्ही मला त्या बद्दल माहिती देत अहात जे कोणतेही कर्तव्य करण्यास बांधलेले नाही, ज्याबद्दल कोणतीही शंका नाही, जे जन्ममृत्यूच्या पलिकडे आहे, जे साक्षात पुण्यप्रभाव आहे, जे शुभ आहे, जे निर्भयमय आहे, जे अनादि अनंत आहे, जे अक्षर आहे, ज्यात कोणताही बदल कधीही होत नाही, जे शुद्धतेचा नमुना आहे, जे कांहींही करत नाही. त्या बद्दल आणखीन ऐकण्याची मला इच्छा आहे.

भिष्म सांगतात, "त्यासाठी मी तुला एक जुने संभाषण झाले होते याज्ञवलक्य आणि जनक राजा मध्ये ते सांगतो". फार प्राचीन काळी एक जनकाच्या वंशातील राजा धैरवी ज्याचे नितीशास्त्राचे ज्ञान पूर्ण होते, याज्ञवलक्यांना विचारतो, "अहो ब्राह्मणा, मला सांगा किती प्रकारचे ज्ञानं असतात? प्रकृतीचे किती प्रकार आहेत? अव्यक्त ब्रह्माचे किती प्रकार आहेत? ब्रह्मापेक्षा जास्त श्रेष्ठ काय आहे? जन्म म्हणजे काय आणि मृत्यू म्हणजे काय? वयाच्या मर्यादा असतात कां? मला तुमच्या कडून ते सगळे समजून घ्यावयाचे आहे. कृपया ते सांगा. मी त्याबद्दल अनभिज्ञ आहे, आपण ज्ञानसागर अहात, म्हणून मी तुम्हाला विचारत आहे".

याज्ञवलक्य बोलतात, "ऐक राजा, मी तुझ्या प्रश्नांची उत्तर देत आहे. जे योगींच्या मते सर्वोच्च ज्ञान आहे ते तुला सांगणार आहे. ते सांख्य परंपरेत प्रचलित आहे. मला माहीत आहे कीं, तू सर्वज्ञ आहेस तरी मला असे प्रश्न विचारत आहेस जनहीतार्थ म्हणून, मी तुझ्या सगळ्या प्रश्नांची उत्तर देणार आहे". राजाने जनहितार्थ ऋषींना प्रश्न विचारावेत व ऋषींने त्याची उत्तर द्यावीत ही प्राचीन पद्धत आहे. तरी राजा ऐक मी काय सांगत आहे. प्रकृतीचे प्रमुख आठ प्रकार माहीत आहेत, त्यातील सोळा उपप्रकारांमुळें तिच्यात बदल होत असतात. त्यातील सात अभिव्यक्ती आहेत. असे अध्यात्म शास्त्राचे पंडित सांगतात. अव्यक्त प्रकृती (मूळ प्रकृतीचे स्वरुप), महत, जाणीवा, आणि पंचमहाभूत असें एकंदर आठ प्रकृतीमध्ये येतात. आता त्यात बदल करणारे घटक

कोणते ते संख्येच्या भाषेत सांगतो, ते आहेत, कान, त्वचा, जिभ, नाक, आवाज, स्पर्श, रुची, गंध, वाणी, दोन हात, दोन पाय, दोन आतडी आणि सौख्य देणारे अवयव असें सोळा आहेत. ते सगळे प्रकृतीला असल्याने ती व्यक्त होते. तिची अक्षर अवस्था रहात नाही ती क्षर होते. त्यातील आवाज ज्याचे स्थान पंचमहाभूतात असते, त्यांना विशेष म्हणून सांगितले जातात. इतर पांच ज्ञानेंद्रियांना सविशेष म्हणतात. अहो मिथीलाच्या राजा, अध्यात्म शास्त्र सांगते कीं, मन हे सोळावे आहे. आता सांगतो अव्यक्तातून महत आत्मा उत्पन्न होतो. जाणकार सांगतात कीं, ते पहिले आहे महत मधून निघणारे. जाणीवा दुसर्या आहेत. त्यामध्ये बुद्धी येते. जाणीवांतून मन उत्पन्न होते. त्याशिवाय ते तिसरे आहे. मनातून आणखीन पांच निघतात, ते चौथे समजले जाते, त्याचा संबंध मनाशी असतो. ज्ञानी सांगतात कीं, आवाज, स्पर्श, आकार, रुची, गंध हे पांचवे आहेत निर्मितीच्या मालिकेत. कान, त्वचा, जिभ, नाक सहावे आहे. त्याबरोबर विचार सागरातील विविध विचार त्यात धरलेले असतात. त्या झाल्या ज्ञानेंद्रियाच्या निर्मिती. आता सांगतो कर्मेंद्रियांच्या निर्मिती बाबत, ते सातवे पकडले आहे. त्यांचा संबंध ज्ञानाशी असतो. कर्मंद्रियांत श्वास पहिले सांगितले आहे, त्यात प्राण महत्वाचा असतो, त्यानंतर येतात समान, उदान, व्यान. ती आठवी निर्मिती समजली आहे. त्याला अर्ज्व म्हणतात. शरीराच्या खालच्या भागात वावरणारे समान, उदान आणि व्यान आणि अपान त्यात येतात. ते नववे समजतात. त्यालासुद्धा अर्ज्व समजतात. अहो राजा, ही नऊ निर्मिती व त्यांच्या कार्यकारी तत्त्व असें मिळून एकंदर चौविस होतात. हे मी तुला सांगितले जसे सांख्यांत समजले जातात. ह्यापुढे मी तुला काळाचे कार्य काय ते सांगणार आहे जे प्राचीन ज्ञानी लोकांनी सांगितले आहे.

*ह्या विवेचनात जे अवयव सांगितले आहेत ते माणसाचे नसून प्रकृतीचे आहेत. त्यानुसार सर्व चराचरांना तसे अवयव असतात म्हणजे सांख्यांच्या विचारानुसार चराचर प्रकृतीची एका प्रकारे प्रतिकृती असतात.*

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे अडतिसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे एकोण चाळीसावा

याज्ञवलक्य पुढे बोलतात, "आता सांगतो काळाचे नियम काय आहेत, सांख्यांच्या विचारानुसार. अव्यक्त पुरूषाचा एक दिवस माणसाचे दहा हजार कल्प वर्षे इतका आहे. तितकेच रात्रीचे असते. तो काळ संपला किं, तो जागृत होतो. प्रथम तो वनस्पती उत्पन्न करतो. त्यानंतर तो ब्रह्म उत्पन्न करतो. तो सोनेरी अंड्यातून निघतो. ते ब्रह्म सगळ्या चराचरांचे मूळ असते. ब्रह्मच्या एक वर्षानंतर त्या अंड्यातून प्रजापति जन्मतो. तो पृथ्वी उत्पन्न करतो. त्यानंतर स्वर्ग तयार करतो. त्यानंतर वेद तयार करतो. स्वर्ग आणि पृथ्वी ह्यांच्या मध्ये आकाश ठेवतो. सात हजार पांचशे कल्प ब्रह्माचे वर्ष असते. अध्यात्म विद्या जाणणारे सांगतात कीं, त्याची रात्र तेवढीच असते. त्यानंतर महत जाणीवा निर्माण करतो. त्याना भूत म्हणतात. ब्रह्म मोठी तपस्या करतो. तो चार आणखीन मुलगे तयार करतो. ते ब्रह्माचे अवतार असतात. असें मला सांगितले गेले. त्यानंतर पितर उत्पन्न होतात. त्यानंतर सगळे चराचर सृष्टी कार्यरत होते. ब्रह्माच्या जाणीवांतून पंचमहाभूत तयार होतात. त्यांच्यातून आणखीन प्रजापति तयार होत असतात त्यांचे दिवस पांच हजार कल्पाचे असतात. रात्रसुद्धा तेवढीच असते. त्यांना पुन्हां पंच ज्ञानेंद्रीये असतात. त्यांच्यातून अनेक प्रजाती तयार होतात. तेथे जन्म आणि मरणाची सुरूवात होते. त्यावर ब्रह्माच्या मनाचे नियंत्रण असते. त्या मनाच्या मदतीने सगळे अजमावले जाते. मनाच्या मर्जीनेच ती ज्ञानेंद्रिय काम करू शकतात. ब्रह्माचे मन विचलित झाले तर ती ज्ञानेंद्रियं ज्ञान (जाणीवा) मिळवत नाहीत. मन सगळ्या ज्ञानेंद्रियाचे मुख्य असते. मनात भावनांचे वर्चस्व असते तेथे तर्कशुद्ध विचार नसतात. अशाप्रकारे एकंदर वीस भूत मिळून ही सृष्टी बनलेली आहे.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे एकोणचाळीसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
# भाग एकशे चाळीसावा

याज्ञवलक्य पुढे सांगतात, मी जगाच्या निर्मितीची क्रम सांगितला संख्या पद्धतीने. त्यांची काल मर्यादा सुद्धा सांगितली. आता त्या जगाच्या विनाशाची पद्धत जी सांख्य मानतात ती सांगतो. ब्रह्म जे कधी सुरू झाले नाही व कधी संपणार नाही ते पुनः पुनः जग उत्पन्न करते आणि संपवते. जेव्हां त्याचा दिवस संपतो व त्याची रात्र सुरू होते तो झोपतो. अशावेळी अव्यक्त महारुद्र जो विनाशाच्या कामासाठी युक्त असतो जगाच्या विनाशासाठी हजार सुर्याची शक्ती धारण करतो. त्याच्या भयंकर अग्नीने तो चारही प्रकारचे जीव (अंडज, गर्भज, पंकज, वनस्पति) मारून टाकतो. पृथ्वी जीवहीन होते. त्यानंतर पृथ्वी जी पाण्याने भरलेली आहे तो त्याच्या गरमीने सुकवून टाकतो. तो महाभूत (अग्नी) तळपत असतो. सर्व जड उर्जा त्यातून उत्पन्न होतात त्या सुद्धा त्यात विलीन होतात. त्यानंतर वायू त्याचे काम करू लागतो. तो त्याच्या सगळ्या आठ रुपात अग्नी गिळून टाकतो म्हणजे विझवून टाकतो. त्या नंतर आकाश वायूला गिळून टाकते. त्यानंतर मन आकाशाला गिळून टाकते. त्यानंतर जाणीवा मनाला खाऊन टाकतात, त्या जाणीवांना महत जो सगळे भूत वर्तमान व भविष्य जाणत असतो तो खाऊन टाकतो. तो महत नंतर शंभू खाऊन टाकतो. शंभू सगळ्या सृष्टीचा धनी आहे. शंभू जो विविध सिद्धींसाठी ओळखला जातो जशा अणिमा, लघूमा, प्राप्ती वगैरे. शंभू पूर्ण ज्ञान, पूर्ण तेज, पूर्ण शुद्ध, पवित्र म्हणून ओळखला जातो. त्याचे असंख्य नेत्र, कान, नाक, तोंडं, इतर ज्ञानेंद्रिये सगळे पहात असतात. असा शंभू ते विश्व संपुष्टात आणतो. त्यानंतर जे रहाते ते शुद्ध ज्ञान, तेज असते. अशा रितीने जगाचा विनाश कोणत्या क्रमाने व कसा होतो ते सांगितले. ह्यानंतर मी तुला सांगणार आहे, ते तीन विषय ज्यांना अध्यात्म, आधिभूत, आधीदैवत म्हणतात.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे चाळीसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग एकेचाळीसावा

याज्ञवलक्य पुढे सांगतात, ब्राह्मण जे न्याय शास्त्रात निष्णात आहेत ते सांगतात त्या दोन पायांबद्दल जे अध्यात्म म्हणून ओळखले जातात. त्याचे दोन पाय आहेत एक आदिभूत म्हणून सांगितला जातो व दुसरा विष्णूचा आहे, आदिदैवत. ते सगळ्या जीवपेशींना लागू होतात. जो भाग अशुद्ध द्रव्य बाहेर टाकतात त्या भागाला आदिभूत असें म्हणतात. ज्या भागाने जैविकी कार्य होते त्याला आदिदैवत म्हणतात. हे सगळ्या सजीव पेशीत असतात. प्रजनन करणारा भाग अध्यात्म म्हणून ओळखला जातो. त्याच्या कार्याला आदिभूत आणि प्रजापति त्याचे मुख्य आदिदैवत असते. उदाहरणार्थ, हात अध्यात्म, त्याच्या कामाला आदिभूत समजावे. इंद्राला इंद्रियांचे आदिदैवत समजले जाते. वाणीचे इद्रिय अध्यात्म, त्याची वाणी आदिभूत. जिभ अध्यात्म, रुची आदिभूत. नांक आध्यात्म गंध आदिभूत पृथ्वी त्याचे आदिदैवत. त्वचा अध्यात्म, स्पर्श अदिभूत त्याचे आदिदैवत वारा. मन अध्यात्म, ज्याच्या मदतीने ते काम करते ते आदिभूत, चंद्रमा त्याचे आदिदैवत, जागृती अध्यात्म, प्रकृतीत त्याचे स्थान ते आदिभूत महत अथवा बुद्धी आदिदैवत असे आहे. जे समजून घ्यावयाचे ते आदिभूत त्याचा क्षेत्रज्ञ आदिदैवत असते. मी तुला त्या तीन संज्ञाची माहिती सांगितली आहे. अशारितीने ब्रह्म विविध कामांसाठी (अध्यात्म) विविध परिणाम साध्य करतो (आदिभूत) आणि त्यासाठी तो असतो आदिदैवत. असे ते आहे. प्रकृती तिच्या मायेने विविध कार्यांसाठी विविध रुप घेते व त्यात ती आदिदैवत म्हणून कामं करून घेत असते. त्याकरता ती जी विविध रुप घेते त्यांना गुण म्हणतात. प्रत्येक गुणाची ठरलेली अध्यात्मिक उर्जा आहे. त्याप्रमाणे सत्त्व, रज आणि तम अशा ढोबळ मानाने त्यांची विभागणी होत असते. त्यात सत्त्वाचे गुण असे सांगितले आहेत, धीरोदात्त, आनंद, समृद्धी, समाधान, आशावाद, पावित्र्य, आरोग्य, विश्वास, श्रद्धा, दयाबुद्धी, सत्य, उपकार दायित्व, क्षमाशिलता, नम्रता, धृढता, न्यायीपणा, शांत, सदाचार, माणूसकी, भूतदया, साधेपणा, निर्भय, निर्मोहीपणा, परस्पर सद्भाव.

रजोगुणाचे गुण असे, गर्विष्ठपणा, स्वाभिमानी, मालकीचा आग्रह, युद्ध करण्याची खुमखुमी, कंजुषी, निर्दयीपणा, दुसर्याच्या दुःखात आनंद, उद्धटपणा, वादी, बेपर्वाई, शत्रूत्व, दुसर्याचे हडपण्याची इच्छा, निर्लज्जपणा, पापकृत्याबद्दल आकर्षण, वासनामय, असें गुण असतात.

तमोगुणाचे गुण पाहू, रजसच्या गुणांची तीव्रता वाढली कीं ते तमोगुण होतात. अज्ञान हा तमोगुणाचा प्रमुख गुण सांगितला आहे. अज्ञानामुळें त्यांना निर्णय घेता येत नाहीत म्हणून शुद्रात हा गुण विशेष असतो. क्रोध, मोह हे तमोगुणाचे विशेष दोष आहेत. कर्तव्याबद्दल जागृकता नसणे हा तमोगुणाचा मोठी दोष (गुण) असतो.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे एकेचाळिसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग एकशे बेचाळिसावा

याज्ञवलक्य पुढे सांगतात, प्रकृतीच्या निर्मितीत ते तीन गुण (सत्त्व, रज आणि तम) असावे लागतात कारण जे कांहीं घडते ते अध्यात्मिक उर्जेच्या विविध क्षमतेमुळें होत असते. म्हणून जे कांहीं प्रकृतीत आहे त्या प्रत्येकाची अध्यात्मिक अवस्था त्यांचे गुण ठरवत असते. पुरूष त्या तीन अवस्थांच्या मदतीने असंख्य रुप घेत असतो. सगळ्या चराचरांपासून देवादिकांपर्यंत सगळ्यांना सत्त्व, रज आणि तम ह्याच्या माध्यामातून त्यांचे गुण दाखवावयाचे असतात. पापकृत्यामुळे मनुष्य पुढच्या जन्मा खालच्या योनीत जन्म घेत असतो ज्या योग्येची अध्यात्मिक उर्जा त्याला त्याच्या पापकृत्यामुळे प्राप्त होते. कोणत्याही जीवाची अध्यात्मिक अवस्था सत्त्व, रज आणि तम ह्यात दोलायमान होत असते. विशेषकरून माणसाच्या बाबत ते विशेष जाणवते. कारण त्याचा अध्यात्मिकतेचा पल्ला फार मोठा असतो. एकाच आयुष्यात मनुष्य विविध अध्यात्मिक अवस्थांतून जात असतो. जर केवल सत्त्व गुणाचा प्रभाव असेल तर देवता उत्पन्न होतात. जेव्हां सत्त्व आणि रजस असतात तेव्हा मनुष्य जन्मतो. आणि जेव्हां रजस आणि तमस असते त्यामुळे अनेक प्रकारचे प्राणी (मनुष्य सुद्धा) जन्मतात. जेव्हा तो तिनही गुण दर्शवतो तेव्हां साधा मनुष्य असतो.

तू मला विचारले आहेस कीं, अव्यक्त पुरूषाचा स्वभाव कसा असतो, जरी तो मायेच्या प्रभावात असला तरी त्याच्यावर मायेच्या भ्रमसिद्धीचा परिणाम होत नसतो. माया जड असते ती चैतन्यमय नसते. ती फक्त उत्पत्ती आणि विनाश करू शकते. त्यासाठी लागणारी अध्यात्मिक उर्जा पुरूषाकडून ती घेत असते. ते दिलेल्या क्रमाने होत असते. त्यात कोणताही चैतन्यमय प्रभाव नसतो.

जनक विचारतात, "आपण सांगता, पुरूष आणि प्रकृती दोघेही निरंतन असतात. दोघाना आकार नसतो, दोघेही समजण्यास अवघड असतात. असे असतांना त्यातील एक चैतन्यहीन कसा असू शकतो"? "एकाला क्षेत्र आणि दुसर्याला क्षेत्रज्ञ असे कां सांगितले आहे ते समजत नाही". "आपण मोक्षाचे सगळे जाणता म्हणून मला

तुमच्याकडून ते समजून घ्यावयाचे आहे. मला सांगा, पुरूष आणि प्रकृती कधी एकरुप आणि कधी विभक्त असतात. देवता कधी मरणार्या जीवाला धरतात व कां"? "ह्या बद्दल सांख्य काय सांगतात ते मला सांगा. त्यानंतर योग काय सांगतात ते सांगा. मृत्यूची लक्षणं कोणती ते सांगा. आपण ते सगळे चांगले जाणता म्हणून मी तुम्हाला विचारत आहे".

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे बेचाळीसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे त्रेचाळीसावा

याज्ञवलक्य पुढे सांगतात, "ज्याला गुण नाहीत त्याचे वर्णन करता येत नाही. कोणत्याही गोष्टीचे वर्णन करण्यासाठी तिचे गुण सांगावे लागतात. गुण नसतील तर त्याचे वर्णन करता येत नाही. आता सांगतो गुण असणं म्हणजे काय व नसणे म्हणजे काय"? ते सर्वज्ञ मुनी सांगतात, जेव्हां पुरूष गुण ग्रहण करतो जसे आरशांत बिंब दिसते, तेव्हां त्या बिंबामुळें त्याचे अस्तित्व जाणवू लागते. जसे बिंब तसे त्याचे चित्र तयार होते म्हणजे जर आरशात बिंब नसेल तर त्या आरशाला कोणताही गुण असणार नाही. प्रकृती विविध रुपाचे गुण ब्रह्मात (पुरूषात) दाखवू लागते ते गुण त्याला आहेत असे जाणवू लागते. अव्यक्त प्रकृती तिच्या असंख्य गुणात बद्ध असते. त्याच प्रमाणे प्रकृती पुरूषाच्या सानिध्यामुळे व्यक्त रुप घेऊ लागते. ती पुरूषाच्या सानिध्यामुळे सचेतन झाल्या सारखी होते. पुरूषाचे असंख्य अंश ज्यांना आत्मा म्हणतात ते त्यात अडकलेले असतात. ते अंश पूर्णतया विसरतात कीं, ते पुरूष आहेत, त्या ऐवजी समजत रहातात कीं, ते प्रकृतीचा हिस्सा आहेत. त्याच वेळी पुरूष त्याच्या अध्यात्मिक उर्जेच्या प्रभावामुळें योगीक क्षमता दाखवत असतो. तो प्रकृतीमय सुद्धा होत असतो. प्रकृतीच्या अनेक सोयिस्कर रुपात तो त्याचे चैतन्य सोडतो व जीवसृष्टीचा उगम होतो. त्यासाठी ते अंशात्मक आत्मे त्या बिजात प्रवेश करतात. त्या जीवंत झालेल्या प्रकृतीच्या अंशात तो त्या त्या अनुरुप जाणीवा घालतो. ते त्यांचे गुण ठरतात. त्यातून विविध योनींची निर्मिती होते. त्या प्रत्येक योनीची कमाल व किमान अध्यात्मिक क्षमता सत्त्व रज आणि तम ह्या अवस्थांप्रमाणे ठरलेली असते. उच्च अवस्थेतील आत्मे देवता, यक्ष, अप्सरा अशा अनेक योनीत जन्म घेतात त्या खालच्या अवस्थेतील मनुष्य होतात विविध स्वभावाचे. त्या पेक्षा कमी असल्यास अनेक प्रकारचे पशु, पक्षी, जलचर असें जन्म घेतात. जीव सृष्टी वाढत असते. असे मी ऐकत आहे. त्याशिवाय इतर संकल्पना सांख्यांच्या इतर विचार प्रणालीत आढळून येतात. त्याप्रमाणे प्रकृती एक आहे व पुरूष अनेक आहेत आणि त्यांच्या मिलनाने अनेक योनी चराचरात उत्पन्न झाल्या. नेमकी काय परिस्थिती आहे कोणी निश्चितपणे सांगू शकणार नाही.

पाण्यात रहाणारे मांसे त्या पाण्याचा हिस्सा असूनही नसतात. ते त्या पाण्यापेक्षा भिन्न असतात तसें पुरूष मायेत वावरत असतांना तो मायेचा हिस्सा असूनही नसतो. ते दोन एकत्र असतात ह्याचा अर्थ ते एकच आहेत असा होत नाही. त्यांचे वेगळे अस्तित्व प्रसंगानुरुप दिसत असते. एकत्र असण्याने ते एकच आहेत असे समजणे चुकीचे असते. सांख्यानी त्याना जमेल तितके बिनचूक निदान ह्या सृष्टीच्या कार्यपद्धतीचे केले आहे. ते सगळे यति मान्य करतात. आता मी तुला योगी काय समजतात ह्या सृष्टीच्या कार्यपद्धती विषयी ते विशद करणार आहे.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे त्रेचाळिसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे चव्वेचाळीसावा

याज्ञवलक्य पुढे सांगतात, मी सांख्याचे विचार सांगितले, आता योगशास्त्र काय सांगते ते पाहू. मी जे ऐकले आहे त्याच्याबद्दल ते तुला सांगतो. सांख्यांचे विवरण विलक्षण अप्रतिम आहे. त्याची तुलना होत नाही. वस्तुतः ते एकच सांगतात पण त्याची सांगण्याची पद्धत भिन्न आहे. दोनही मोक्षाचा मार्ग दाखवतात. ज्यांचे ज्ञान कमी आहे ते त्यात फरक करतात. मी मात्र ते एकच आहेत असें समजतो. एकच सत्य ज्ञानी विविध प्रकारे सांगतात तसा हा प्रकार आहे. तरी आता कोणते फरक आहेत ते पाहू, सांख्य साधनेत शरीराला फारसे महत्व देत नाहीत. ते मन आणि बुद्धी ह्यांचे नियंत्रणाला महत्व देतात. योग शरीराला तितकेंच महत्व देतात कारण ते माध्यम असते. साधनेचे माध्यम सुस्थितीत असणे योग्यांच्या दृष्टीने आवश्यक असते. म्हणून प्राणायाम योग्यांसाठी महत्वाचा असतो. श्वासाच्या नियमनाने ते शरीराचे भाग जास्त चांगले कार्यक्षम करतात. कारण, श्वास हे शरीराच्या केंद्रस्थानी असतो. तो ठीक तर सगळे ठीक असें समजले आहे. प्राणायाम आणि विचारांचे नियमन असें दोनही ते साध्य करत असतात. योगी त्याच्या सुक्ष्म शरीराच्या माध्यमाने अणिमा, लघिमा, प्राप्ती अशा सिद्धी प्राप्त करत असतो. ते सांख्याना जमत नाही. कारण सांख्यांना त्यांच्या शरीराचे श्वासातून नियमन करण्याचे माहीत नसते. योग शास्त्र सांगतो कीं, आठ निरनिराळ्या सिद्धी प्राणायामाच्या साधनेने तो साध्य करत असतो. योगशास्त्रात दोन प्रकारचे प्राणायाम सांगितले आहेत. एकामध्ये मनाची एकाग्रता (जपावर) अपेक्षित असते. दुसर्या मध्ये पूर्ण विचारशून्य अवस्था सांगितली आहे त्यात जप सुद्धा नसतो. त्या अवस्थेत मनसुद्धा गुंतलेले नसते. अशा विचारशून्य प्राणायामात योगी ब्रह्माच्या जवळ जात असतो. कारण तो विचारसागराच्या संपर्कात असतो. पहिल्या प्राणायामात गुण विशेष असतात पण दुसरा निर्गुणी असतो. योगी पहिल्या प्रकारचा प्राणायाम जास्त करतात त्यात मंत्रजपाचा समावेश असतो. सांख्य दुसर्या प्रकारचा (निर्गुणी) करतात तो गुणहीन असतो त्यात जप, मंत्र नसतात. योग पद्धतीचा प्राणायाम शिक्षकाच्या

मार्गदर्शनानीच करावा. नाहीतर नुकसान होऊ शकते. निर्गुणी प्राणायामात पंचेंद्रिय आणि विचार (बुद्धि) ह्यांचे पूर्ण नियमन होत असते. तशा प्राणायामामुळें योग्याची अध्यात्मिक उर्जा झपाट्याने वाढत असते. म्हणजे तो योग पुण्यकारक असतो. जास्तीत जास्त काळ तो प्राणायामात राहिला तर त्याला दिव्य दृष्टी प्राप्त होऊ शकते. त्याला कांहीं ध्यान साधना असं समजतात. पुढे त्याचे सुशुप्तीत व नंतर समाधीत रुपांतर होत असते.

*प्राणायाम करण्याची शास्त्रशुद्ध पद्धत अशी आहे कीं, श्वास सावकाशपणे घेतांना आराध्य देवतेचे नामस्मरण (जप) करावयाचे असते. पूर्ण श्वास घेतला कीं तो धरून ठेवावयाचा असतो. त्यावेळी पुन्हा तो जप केला जातो. त्यानंतर तो श्वास सावकाशपणे सोडतो. श्वास पूर्ण सोडल्यानंतर तो पुन्हा थांबतो एक जप करण्यासाठी. त्यानंतर तो पुन्हा श्वास घेतो. पहिल्या श्वास घेण्याच्या क्रियेला पुरक म्हणतात. मध्ये थांबतो त्याला कुंभक म्हणतात. त्यानंतर तो श्वास सोडतो त्या क्रियेला बेचक म्हणतात. श्वास सोडल्यानंतर पुन्हा कुंभक करावयाचा असतो. प्राणायामाचा क्रम असा ठेवावा, पुरक – कुंभक – बेचक – कुंभक – पुरक. प्रत्येक वेळी जप केला जातो. अशारितीने प्राणायाम करतांना कोणताही विचार मनात असणे नुकसान कारक समजले जाते. मन विचारशून्य अवस्थेत असले पाहिजे. जप सांगितला आहे तो असा, ||ॐ नमो शिवायः||*

*रुद्र प्राणायामाचा प्रकार आहे. येथे दिलेल्या पद्धतीने श्वासोंश्वास करण्याला रुद्र प्राणायाम असें समजले जाते. ते करत असतांना त्याला ध्यान लागले तर त्या अवस्थेत तो त्याच्या लिंगदेहाच्या (सुक्ष्म देह) मदतीने इतरत्र संचार करू शकतो. त्यासाठी योगाचे आठ भाग त्याला चांगले समजले पाहिजेत. ते असें, प्राणायाम, प्रत्याहार, ध्यान, धारणा, तर्क, समाधी त्याशिवाय यम आणि नियम. रीतसर जो ते साध्य करतो तो योगी होतो. प्राणायाम ह्या शब्दाचा अर्थ आहे श्वासाचा (प्राण) व्यायाम. त्याचे प्रत्याहार, ध्यान, धारणा, तर्क, समाधी त्याशिवाय यम आणि नियम असें प्रकार आहेत. प्राणायाम योग पद्धतीत मध्यवर्ती समजली जाते.*

समाधीत असलेल्याची सगळी ज्ञानेंद्रिये सुप्तावस्थेत गेलेली असतात. तो मृतवत वाटतो पण त्याचा श्वास चालू असतो म्हणून तो जीवंत असतो. समाधीमध्ये असतांना योग्याचा आत्मा शरीरा बाहेर प्रभावळीत न रहाता इतरत्र फिरत असतो. त्याचे लिंगदेह त्याच्या बरोबर असते असें ज्ञानी सांगतात. तशा अवस्थेत सदैव रहाण्याच्या अनेक वर्षाच्या सवयीने तो मोक्षाकडे जात असतो. श्रृती सांगतात, तो योगेश्वर होतो.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे चव्वेचाळीसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे पंचेचाळीसावा

याज्ञवलक्य पुढे सांगतात, "आता योगी मेल्यानंतर कोणत्या लोकात जातो ते सांगतो, जर पायातून आत्मा बाहेर पडला तर तो आत्मा विष्णू लोकी जातो. पोटर्यातून गेला तर वसूंच्या लोकात जातो, गुडघ्यातून निघाला तर साध्यांच्या लोकी जातो. लहान आतड्यातून गेला तर तो मित्र लोकी जातो, पुढच्या भागातून गेला तर पृथ्वी लोकी परत येतो. मांड्यातून गेला तर प्रजापति लोकी जातो. कुशीतून गेला तर मरुत लोकी जातो. नाकातून गेला तर चंद्र लोकी जात असतो. हातातून गेला तर इंद्रलोकी जातो. छातीतून गेला तर रुद्र लोकी जातो. मानेतून निघाला तर तो आत्मा नारायण लोकी जातो. तोंडातून गेला तर विश्वदेव लोकी जातो. कानातून गेला तर क्षितिजावर पहारा करणार्या देवतांच्या ठिकाणी जातो. डोळ्यातून गेला तर अग्नीलोकी जातो. भुवयांतून गेला तर अश्विनीच्या लोकी जातो. कपाळातून गेला तर पितरांच्या लोकी जातो. माथ्यातून गेला तर ब्रह्माच्या लोकी जातो. अशाप्रकारे योगी विविध लोकी जात असतो त्याच्या मृत्यूनंतर. आता सांगतो ती लक्षणं जर योग्याचा मृत्यू एक वर्षावर येऊन ठेपला असेल. जर तो अरुंधती नक्षत्र आकाशात पाहू शकत नसेल तर समजावे कीं, तो त्या वर्षी मरणार आहे. दुसर्याच्या बुबुळात तुमची छबी दिसत नसेल तर समजावे कीं, तुम्ही एका वर्षात मरणार अहात. ज्याची कांती काळवंडली आहे ज्याची बुद्धी थकला आहे तो सहा महिने रहाणार असें समजावे. ज्याला सुगंधाच्या ऐवजी स्मशानातील दर्प येतो तो फारकाळ रहाणार नाही असे समजावे. अशी लक्षणं दिसू लागली तर तो योगी इतर सगळी कामं बंद करून ध्यान करण्यात त्याचा वेळ खर्ची घालेल. त्याचा मृत्यू येईतोवर तो ध्यानात बसेल खाणे पिणे सगळे त्याग करून तो फक्त ब्रह्माच्या धारणेत त्याचा सगळा समय घालवेल. जो आत्म्याचे समजतो तो सांख्यांच्या शिकवणूकी प्रमाणे ब्रह्मावर ध्यान करत असेल.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे पंचेचाळीसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
# भाग एकशे सेहेचाळीसावा

याज्ञवलक्य पुढे सांगतात, "अरे राजा तू मला विचारत आहेस त्या ब्रह्माबद्दल जे अव्यक्त आहे. तुझ्या प्रश्नाचे उत्तर रहस्यमय आहे. तरी ते मी तुला सांगणार आहे, प्राचीन ऋषींनी दिल्याप्रमाणे मी साधना करून सूर्यदेवाकडून विशेष तपस्या न करता शुल्क यजू मिळवले. मी प्रथम त्या उष्णदेवतेची स्तुती करत असे. त्याने प्रसन्न झालेली ती देवता मला म्हणाली, "अरे पवित्र ब्राह्मणा, तू जे मागत आहेस ते देण्यात मुष्किल आहे. तरी मोठ्या प्रेमाने तो वर मी तुला देत आहे. त्या कृपेने मी कृतज्ञ झालो आणि वाकून नमस्कार केला. व बोललो, "मला त्या यजू समजत नाहीत. ते समजून घेण्याची मात्र मला इच्छा आहे". ते ऐकल्यावर तो तेजस्वी तारा बोलला, "मी तुला ते देत आहे, सरस्वती देवी तुझ्या अंगात शिरून ते शक्य करणार आहे. त्यानंतर सरस्वती देवी मला तोंड उघडण्यास सांगते, ती माझ्या अंगात शिरते. त्याबरोबर माझ्या अंगाची लाही लाही होऊ लागते. ते सहन न झाल्याने मी नदीत उडी मारली. मला समजले नाही कीं, त्या सूर्य देवतेने मला काय केले आहे. मी त्याच्यावर रागावलो. अशारितीने मी जळत असतांना तो सूर्य देव मला बोलतो, अरे याज्ञा, थोडा काळ ते सहन कर. थोड्या वेळांनी मी शांत झालो. मी पूर्ववत झालो ते तो पहातो, सगळे वेद त्याच्या उपनिषदांसह तुला अंतरमनात समजू लागतील. सगळे शतपथ तू समजशील. त्यानंतर तुझे ज्ञान मोक्षाच्या योग्यतेचे होईल. तुला सांख्य आणि योग अशा दोनही शाखा समजू लागतील. असे बोलून तो दिवसाचा तारा अस्ताकडे जातो. ते त्याचे ऐकल्यावर व तो अस्तास गेलेले पाहिल्यावर मी माझ्या घरी गेलो. घरी मी सरस्वतीचे ध्यान करू लागलो. ती शुभदर्शिनी सरस्वती देवी माझ्या पुढे आली. मला दर्शन दिले. मी तिला ॐ बोलून अर्घ्य दिले. त्यानंतर सूर्याला दुसरे अर्घ्य दिले. त्यानंतर मी माझ्या आसनावर बसलो. त्यानंतर सगळे शतपथ ब्राह्मण त्यातील सगळ्या रहस्यांसह आणि त्यांच्याशी संबंधित उपनिषदांसह माझ्या ध्यानात आले. ते मी पाठ केले. त्यावेळी

मला जो आनंद झाला त्याचे वर्णन करता येणार नाही. त्यानंतर ते मी उत्तम शंभर शिष्यांना शिकवले. त्यानंतर मी ते केले जे माझ्या मामाला (वैषंपायन) पसंत नव्हते. मी तो यज्ञ जो तुझा पिता करत होता त्याचे पौरोहित्य मामाच्या हातून काढून घेतले त्याच्या सगळ्या शिष्यांच्या समोर. त्या यज्ञाच्या वेळी माझा मामा आणि माझ्यात वाद झाला होता. त्या यज्ञाची दक्षिणा कोण घेणार असा तो वाद होता. जो यजू बरोबर गाईल त्याला ती मिळणार होती. देवल ऋषींच्या साक्षीने मी अर्धी दक्षिणा घेतली. तुझे पिताश्री, सुमंत, पैल, आणि देवल त्याला साक्षीदार आहेत. अशारितीने मला पांच वेळा सूर्याकडून यजू मिळाले. त्यानंतर मी पुराणांचा अभ्यास केला रोमहर्षना बरोबर. सरस्वती आणि मूळचे मंत्र पुढे ठेवून मी सूर्याच्या कृपेने शतपथ ब्राह्मण लिहून काढले. जे कोणी आधी केले नव्हते. माझी जी इच्छा होती ती मी पूर्ण केली आणि अनेक शिष्य तयार केले. सगळ्या वेदाचा अर्थ त्याच्या उपभागांसह मी माझ्या विद्यार्थ्यांना शिकवला आहे. सूर्याकडून मला ज्या पन्नास शाखा मिळाल्या त्या सगळ्या मी शिकवल्या आहेत. आता मी ब्रह्माची ध्यान साधना करत असतो. एकदा गंधर्व आणि विश्ववसू माझ्याशी वाद करण्यासाठी आले होते सत्य अजमावण्यासाठी. ज्यामुळें ब्राह्मणांचे भले होईल त्यासाठी काय करावयाचे ते त्यांना ठरवावयाचे होते. ते मला एकंदर चोविस प्रश्न वेदा संदर्भात विचारतात, शेवटी एक पंचविसावा प्रश्न विचारतात तो ज्ञानाबद्दलच्या अंदाज करण्याच्या तंत्राबद्दलचा होता. ते सगळे प्रश्न मी तुला सांगतो,

विश्व काय आहे? व काय विश्व नाही? अश्व काय आहे? अश्व कोण? मित्र कोण? वरुण कोण? ज्ञान कशाला म्हणतात? अज्ञान कशाला म्हणतात? बुद्धीहीनता कशाला म्हणतात? बुद्धी कशाला म्हणतात? ज्ञान म्हणजे काय? क कोण? बदलाच्या मागे कोणते कारण असते? कोण स्वताचा धनी नसतो? सूर्याला कोण खातो? तो सूर्य कोण? विद्या काय? अविद्या काय? चर कोण? आणि अचर कोण? चर कां म्हणतात? सुरूवात नाही असें काय आहे? काय अक्षर आहे? काय क्षर आहे? असें ते प्रश्न होते.

गंधर्व राजा विश्ववसू मी दिलेल्या उत्तरने संतुष्ट झाला. त्याला उत्तंर देण्या आधी मी त्याला सांगितले कीं मला थोडा समय विचार करण्यासाठी द्यावा. त्यानंतर मी

सरस्वतीचे स्मरण केले. तिच्या कृपेने मला आपसूक उत्तरं सुचत गेली. पंचविसावा प्रश्न ज्ञानाबद्दलच्या अंदाज करण्याच्या तंत्रा बद्दलचा होता. मला आठवले की, वेदाचा अभ्यास करण्यासाठी उपनिषद आणि इतर शास्त्र पहावी लागतात, त्यानंतर चौथे शास्त्र जे मोक्षाचा अभ्यास करणारे आहे ते सांगितले. त्यात जीवाच्या कार्याचा अभ्यास आहे. जो आत्म्यापेक्षा वेगळा आहे. जीवाचे कार्य (शरीराच्या कार्याचा निमंत्रक) समजण्यासाठी तंत्राचा अंदाज करावा लागतो ते त्याला सांगितले. ते झाल्यावर मी विश्ववसूला बोललो कीं, तू इतके प्रश्न मला विचारले आता मी त्याची उत्तर देणार आहे. विश्व अव्यक्त आहे आणि प्रकृती जन्म मरणाने युक्त आहे जो एक भयंकर अनुभव आहे, ते सगळे मोक्षासाठी योजलेले आहे. त्या प्रकृतीचे कार्य सत्त्व रज आणि तम गुणानी साध्य होत असते. पुरूष विश्व नाही. कारण त्याला गुण नसतात. अश्व आणि अश्व हे नर आणि मादीच्या बाबतीत आहे. पहिली पुरूष आणि दुसरी प्रकृती आहे. तसेंच मित्र पुरूष आहे. वरुण प्रकृती आहे, ज्ञान प्रकृतीशी संबंधित असते. कारण ज्ञान गुणांचे होते व गुण प्रकृतीला असतात. पुरूषाला गुण नसल्याने त्याचे ज्ञान असू शकत नाही. अज्ञान म्हणजे जीव जो (आत्मा) पुरूषाचा अंश असतो. क म्हणजे पुरूष आहे. बदल सुद्धा प्रकृती आहे. ज्यात बदल नाही तो अर्थात् पुरूष आहे. अविद्या सुद्धा प्रकृती आणि विद्या पुरूष आहे. चर आणि अचर ह्यांचे सांगतो, चर प्रकृती आणि अचर पुरूष आहेत. प्रकृती उत्पत्ती आणि विनाशाचे कारण असते. दोनही नित्य आहेत, दोनही अक्षर आहेत परंतु सापेक्षतेने पाहिले तर दोनही क्षर सुद्धा असतात. असे अध्यात्म विद्या सांगते. कांहीं परिस्थितीत प्रकृती अक्षर सुद्धा असते व प्रकृतीच्या प्रभावात आलेला पुरूष क्षर होत असतो (तेवढ्या पुरता). त्यात भ्रमाचा मोठा भाग आहे. ज्ञाना बद्दलच्या अंदाज करण्याच्या तंत्रानुसार ते उत्तर ग्राह्य ठरते सगळ्या ऋग, यजू आणि साम ह्यात येतात. ज्याला ते अंदाज बरोबर करता येत नाहीत त्याने वेद अभ्यासू नयेत असें मी त्या गंधर्वाला सांगितले. मी त्याला सांगितले कीं, ज्याला जन्म मरणाच्या भोवर्यातून निघावयाचे आहे तो योग साधना करून मोक्षाकडे थेट जाईल.

विश्ववसू बोलतो, "अहो ब्राह्मणा तू सांगतोस की, आत्मा आणि ब्रह्म हे तत्त्वतः एकच आहेत हे मला पटत नाही. तू मला पुन्हा ते समजावून सांग". तो पुढे बोलतो, "मी

जैगिश्व्य, ऐस्त्य, देवल, पराशर, वर्शज्ञ, भृगू, पंचशिक्ब्द, कपिल, शुक, गौतम, अर्ष्टसेना, गर्ग, नारद, असुरी, पौलस्त्य, सनतकुमार, शुक्र, काश्यप आणि रुद्र त्याशिवाय विश्वरुपा त्याशिवाय अनेक देवता अशा सगळ्यांशी बोललो आहे. ते कांहीं वेगळेच सांगतात. त्या बद्दल तुमचे काय मत आहे ते सांगा. आपण ह्या विषयाचे तज्ज्ञ अहात म्हणून तुमचे मत समजून घेऊ इच्छितो. आपण सगळे जाणता तरी तुमचे मत विशद करून सांगा. अहो ब्राह्मणा, आपण साक्षात सूर्याचे शिष्य अहात असें कित्येक ऋषी आणि पितर सांगत असतात. कांही सांगतात कीं, आपण सूर्याचा अंशावतार अहात म्हणून तो तुम्हाला विशेष प्रसन्न असतो. अहो याज्ञवलक्य आपण सगळे ते विज्ञान आत्मसात करून राहीला अहात. तुम्ही सांख्याच्या व योगींच्या अशा दोनही दृष्टी समजून श्रृती शिकवता, तसेंच चर आणि अचर सजीवांच्या जीवन कार्याचे चांगले जाणकार अहात. एवढे कौतुक ऐकल्यावर याज्ञवलक्य त्याला बोलतात, "अहो गंधर्व, आपण सगळे समजण्याची क्षमता असलेले अहात. तरी जर आपल्याला माझे विवेचन ऐकावयाचे असेल तर मी करावयाला तयार आहे. जसे मी माझ्या गुरूकडून शिकलो तसेंच सांगणार आहे. सृष्टीचे दोन भाग आहेत त्यातील एक पुरूष म्हणून ओळखला जातो आणि दुसरा प्रकृती म्हणून. तसेंच ह्या सृष्टीचे व्यक्त आणि अव्यक्त अशी दोन रुप असतात. त्याशिवाय ते दोन एकमेकांत गुंतून गेल्यामुळें साप्रतचे विश्व कार्यरत असते. त्यातील प्रकृती अनेक गुणविशेषांनी व्यक्त होत असते परंतु, पुरूष अव्यक्त आणि गुणहीन असतो. प्रकृतीच्या गुणमय स्वभावाचा परिणाम स्वरुप पुरूष त्याचे अंश तिच्यात सोडत असतो त्यांना आत्मा असें म्हणतात. त्या आत्म्याला सांख्य प्रधान असें नाव देतात. योगी आत्मा म्हणूनच त्याला ओळखतात. प्रकृतीचे एकंदर गुण चोविस आहेत असें कपिल मुनी सांगतात व ते सर्वमान्य आहे. पुरूषाला गुण नाहीत परंतु, गुण नसणे हासुद्धा एकप्रकारे गुणच समजला जातो. त्याला पंचविसावा गुण समजून एकंदर पंचवीस गुण सृष्टीचे होतात. ते ज्याच्या प्रेरणेने तयार झाले ते त्या बाहेर आहे जे ह्या सृष्टीचे कारण आहे. त्याला सांख्य सव्विसावा गुण म्हणून ओळखतात. अशी एकंदर रचना आहे ह्या विश्वाची असें श्रृती सांगते. जाणकार असें समजतात कीं, जर सृष्टीचा विचार करावयाचा असेल तर ह्या पंचविस गुणांच्या एकमेकांशी होणार्या

अनेकविध रचनांचा विचार करावा लागतो. सव्विसावे त्या बाहेर आहे जे विश्वाचे मूळ कारण आहे. हे गुण त्यांच्या योग्यतेच्या महत्वानुसार मांडलेले आहेत सांख्यानी. त्यात पुरूष ज्याचा गुण पंचविसावा आहे तो सर्वश्रेष्ठ धरला आहे. हा प्रकृतीपेक्षा वेगळा असतो असें सांख्य मानतात. जसा मांसा पाण्यात वावरतो परंतु, तो पाण्याचा भाग नसतो तसे कांहींसे हे असते. म्हणजे मांसा रुपी पुरूष प्रकृतीच्या पाण्यात वावरत असतो असें समजावे. मांसा पाण्यात असला तरी तो पाण्याचा भाग नसतो. त्याचे स्वतंत्र अस्तित्व असते. तसे कांहींसे पुरूष आणि प्रकृती ह्यांचे संबंध असतात असे जाणकार समजतात. ज्ञानी असेसुद्धा समजतात कीं, खरेतर (सत्यात) पुरूष हा त्या मूळ कारणाचा अंश असतो जो प्रकृतीच्या प्रभावाखाली वावरत असतो. म्हणजे वस्तुतः पुरूष मूळ कारण असते पण त्याचा विसर त्याला पडलेला असतो. पुरूष जितका जास्त गुंततो प्रकृतीच्या भ्रमविश्वात तितका तो जास्त विसरतो कीं, तो मूळ कारण आहे. (कांहीं ज्ञानी त्या मूळ कारणाला स्वयंभू म्हणतात, कोणी विधाता म्हणतात, अशी बरीच नांव आहेत) जितका जास्त गुंततो तितका अधिक विसर त्याला पडतो कीं तो स्वतः विधाता आहे. तो त्या भ्रमावस्थेत स्वताला प्रकृतीचा भाग समजत असतो. ज्यामुळे त्याची अध्यात्मिक अवस्था खालावत जाते आणि जर तो समजू लागला कीं, तो प्रकृतीचा भाग नसून वेगळा आहे व प्रकृतीचे भ्रमातून बाहेर येऊ लागतो त्याची अध्यात्मिक अवस्था उंचावत असते. अध्यात्मिक अवस्थेच्या स्थितीवर पुरूषाची अवस्था (सत्त्व, रज अथवा तम) ठरत असते. प्रकृतीच्या वैविध्यामुळें पुरूष समजत असतो कीं, हे जग अनेकविध (द्वैत) आहे, परंतु वस्तुतः ते एकाच विधात्याची इच्छा म्हणजे अद्वैत आहे. त्याचा अर्थ मांसा व पाणी हे प्रकृतीच्या प्रभावामुळे निरनिराळे असले तरी प्रत्यक्षात (सत्यात) ते एकच असतात कारण, त्यांचे मूळ एकच आहे. सामान्य पातळीवर हे जग द्वैत आहे पण मूळात गेले तर ते अद्वैत आहे. कोठल्या पातळीवर तुम्ही हे जग पहाता त्यावर ते अवलंबून असते. त्यालाच सापेक्षता (सिद्धांत) असें समजले जाते. ह्या सृष्टीचे ज्ञान सामान्य पातळीवर नेहमी सापेक्ष असते. एवढे समजल्यानंतर सांख्यांना आणि योगींना जे दुसरे कोडे पडले होते ते पहावे लागेल. ते होते जन्म मृत्यूचे रहस्य. मनुष्य त्याचे शरीर प्रकृती आहे व आत्मा जो त्या शरीराला अध्यात्मिक उर्जा देतो ज्यामुळें ते शरीर

चैतन्यमय होते, त्यामागील रहस्य त्यांना सोडवावयाचे होते. पुरूष चैतन्यमय असतो व प्रकृती जड (चैतन्यहीन) असते. असें संकेत जाणकार मनाशी धरून विचार करू लागले कीं, मनुष्य त्यातील पुरूषालाच ध्यान करून स्मरू लागला तर कदाचित त्याला त्याच्यातील विधात्याची जाणीव होईल आणि त्या मर्त्य शरीराची गरज उरणार नाही. तसे जर शक्य असेल तर मनुष्य मरणार नाही कारण तो विधात्यात विलीन होईल. जन्म मरणाचे कारण आहे कीं, आपण (प्राणी) विधात्याचे स्मरण करत नाही. ही संकल्पना पटलेले जाणकार ध्यान साधना तपस्या, प्राणायाम असें प्रयोग करू लागले".

विश्ववसू विचारतो, "अहो ज्ञानी, तुम्ही मला चांगल्या प्रकारे सांगितले आहे. माझ्या शुभेच्छा तुमच्या बरोबर नेहमी असतील".

याज्ञवलक्य नंतर जनकाला सांगतात, तो गंधर्व राजा माझ्या भोवती एक प्रदक्षिणा घालून स्वर्गाकडे गेला. त्यानंतर तो गंधर्व ते ज्ञान तेथील देवतांना सांगतो कीं ते देव कां आहेत व पृथ्वीवर माणसे कां आहेत. मोक्ष म्हणजे थोडक्यात असें कीं, पुरूषाने (आत्म्याने) प्रकृतीमुळें जे दोष त्याला चिकटलेले आहेत (त्यातील मुख्य आहे अहंकार) ते काढून टाकावयाचे म्हणजे तो त्यातील विधाता ओळखून त्यात मिळून जाईल. त्यासाठी जे उपक्रम करावयाचे त्याला तपस्या, साधना अशी नांव आहेत. त्यांचे अनेक प्रकार पुढे विकसित झाले. विधात्यात एकरुप होणे म्हणजे मोक्षसिद्धी असें समजले जाऊ लागले. ज्याला मोक्ष मिळाला त्याला जन्म मरणाच्या फेर्या कराव्या लागत नाहीत असा समज सगळीकडे पसरला. कारण जोवर दोष आहेत (अहंकाराचे) तोवर जन्म मरणाच्या फेर्या संपणार नाहीत हे ते समजतात. कांहीं ज्ञानी सांगतात कीं, जन्माचा उद्देश मुळी अहंकार व त्यानुसार जे दोष चिकटलेले आहेत ते काढून टाकण्यासाठी असतो परंतु, प्रकृतीच्या भ्रमात अडकलेला ते न करतांच त्याचे भोगमय (दोषपूर्ण) जीवन जगत असतो. तशात तो मरतो व अजून कार्य उद्देश अपूर्ण असल्याकारणानें तो पुन्हा जन्म घेत असतो. अशाप्रकारे जन्म मरणाची शृंखला चालत असते. ज्याला मुक्त होण्याची इच्छा झाली तो त्यासाठी मार्गदर्शन कोणाकडूनही घेऊन स्वताचे कल्याण करू शकतो मग तो सांगणारा कोण आहे ते महत्वाचे नसते. कारण मुलतः सगळे ब्राह्मणच आहेत. तरीसुद्धा अज्ञान आणि अहंकार ह्यामुळें त्या चार वर्णात

भेद करणारे आढळतात. हे प्रकृती आणि पुरूषांचे शास्त्र सगळ्यांनी शिकले पाहिजे त्यात फरक करणे वर्णाच्या सबबीवर पापकारक आहे. असें भेद करणारे नरकात जातील. अरे राजा जनका, मी तुझ्या प्रश्नांची समर्पक उत्तर दिली आहेत नां"? आता संकोच सोडून दुःखाच्या प्रभावात न रहाता मोक्षाच्या दिशेने तुझा अध्यात्मिक प्रवास प्रारंभ कर. तुला माझे आशिर्वाद नेहमीच असतील".

पुढे भिष्म सांगतात, याज्ञवलक्याचे ते उत्तेजक उद्गार ऐकून मिथीलाचा राजा आनंदी होतो. त्यानंतर राजा दैवरति अनेक गाई गुरं ब्राह्मणांना दान करतो. त्याशिवाय सुवर्ण दान करतो. त्यानंतर दैवरति त्याच्या युवराजाला गादीवर बसवून स्वतः तपस्या करण्यासाठी वनात निघून जातो.

सांख्य आणि योग दोनही सांगतात कीं, अव्यक्त आणि व्यक्त (अदृष्य आणि दृष्य) जगाने विश्व व्यापलेले आहे. चांगले वाईट, ह्याच्यातून जो मुक्त झाला तो खर्या ज्ञानाकडे जातो. ते साध्य करण्यासाठी यज्ञ करणे, तीर्थयात्रा करणे, दानं करणे, वेदाचा अभ्यास करणे, उपवास करणे, अशांने मोक्ष ज्ञान प्राप्त होत नाही. त्यासाठी त्याला अव्यक्त निर्गुण विधात्याची जाणीव हांच एकमेव मार्ग आहे. मला हे समजले जनकाकडून, त्यानंतर याज्ञवलक्यांकडून पुन्हा मिळाले. तपस्या, यज्ञ, व्रत, उपवास अशाने जरी स्वर्ग मिळाला तरी तेथे तो कायम राहू शकत नाही. याज्ञवलक्याने जे सांगितले आहे ते उपनिषदात आहे. विधात्याच्या अक्षर, अनंत, अंतिम स्वरुपाची माहिती ऋषीनी मिथिलाच्या राजाला जी सांगितली ती शुभ, पवित्र सर्वांनी अभ्यासावी म्हणजे तो मोक्षापर्यंत जाईल.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे सेहेचाळीसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
# भाग एकशे सत्तेचाळीसावा

युधिष्ठीर विचारतात, "अफाट संपत्ती आणि सामर्थ्य संपादन केलेला, दीर्घायुष्य लाभलेल्याने नंतर मृत्यू कसा टाळावा त्याबद्दल आपले काय मत आहे ते सांगा अहो पितामहा. म्हणजे मला विचारावयाचे आहे कीं, तपस्या, वेदाचरण (श्रृतीचा अभ्यास), औषधी प्रयोग, असे कांहीं करून मृत्यू आणि वृद्धत्वाचे अपंगत्व टाळता येते कां"?

भिष्म सांगतात, त्या बाबत मी महान भिक्षू पंचशिखाचे विचार काय आहेत ते सांगतो. तो विदेहच्या राजाच्या दरबारात एकदा जनकाचे कर्तव्या बद्दलच्या शंकांचे समाधान करण्यासाठी गेला होता. जनक त्याला विचारतात, "अपंगत्व आणि मृत्यू कसे टाळता येतात. तपस्या त्याकरता कांहीं कामाची आहे कां"? वेदाच्या अभ्यासाने, व्रतवैकल्ये करून, यज्ञ करून असे काय करून ते शक्य होईल ते सांगा. पंचशिख सांगतो मृत्यू कशानेही टाळता येत नाही. त्याचप्रमाणे वृद्धत्वाचे परिणामसुद्धा टाळता येत नाहीत. परंतु, जो पूर्ण निरपेक्ष वृत्तीने निवृत्त होतो त्याला जन्म आणि त्या नंतर मृत्यू टाळता येतात. विनाश अनिवार्य आहे. कारण तो ह्या सृष्टीच्या कामाचा एक भाग आहे. त्याच्याशिवाय सृष्टी चालणार नाही. अपंगत्व हे मृत्यूचे साधन असते त्यामुळें ते सुद्धा अनिवार्य असते मृत्यूसाठी. जेव्हां मरण येते ते एकटेच येते त्यात कोणी साथीदार नसतो. जीव एकटा येतो व एकटा जातो. मरण आणि जन्म शरीराचे असतात, ते आत्म्याचे नसतात जरी आत्मा त्यासाठी कारणमात्र असतो. आत्म्याला कांहीं फरक पडत नाही मृत्यू आल्याने. केव्हां जन्मणार केव्हां मरणार कोठे हे होणार ह्याचा आत्म्याचा संबंध नसतो. त्याचे दुःख कोणाला"?

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे सत्तेचाळीसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
# भाग एकशे अठ्ठेचाळीसावा

युधिष्ठीर विचारतात, "गृहस्थाश्रमात राहून जो कोणी मोक्ष साध्य करू शकतो, जे सर्व दोषांच्या नाशानेच शक्य असते. मला सांगा, तो त्याचे स्थुल आणि सुक्ष्म शरीर कसे सोडू शकतो"?

भिष्म सांगतात, "ह्यासाठी मी एक जुना संवाद जनक आणि सुलभ ह्यांच्यात झाला होता तो तुला ऐकवतो. "प्राचीन काळी मिथिला नगर होते. त्याचा राजा होता धर्मध्यज नांवाचा. तो जनकाच्या वंशाचा होता. तो त्याच्याच्या जीवन पद्धतीचा पुरस्कर्ता होता. तो वेद जाणत होता. मोक्षाबद्दलचे सगळे शास्त्र तो समजत होता. त्या शास्त्राच्या तत्त्वांचे तो स्वतः पालन करत असें. इंद्रियसंयमन, ब्रह्मचर्य, मर्यादा अशा सगळ्या नियमांचे तो स्वताच्या जीवनात पालन करत असें. तो नितीशास्त्राचा चांगला जाणकार सुद्धा होता. त्याच्या राज्यातील शहाणे लोक त्याचे अनुकरण करत असतं. त्या सत्ययुगात त्याच्या राज्यात एक महिला सुलभा नांवाची संन्याशिणी रहात होती. ती सगळ्या देशांत फिरगस्ती करत असे. ती योगांचे नियमांचे पालन करत असें. ती असेंच फिरत असतांना तिला समजते कीं, मिथिलाचा राजा मोक्ष साधना चांगली जाणतो. ते समजल्यावर, त्या बातमीत किती तथ्य आहे ते तपासण्यासाठी ती मिथिलाकडे रवाना होते. ती राजाची स्वतः भेट घेण्याचे ठरवते. ते ठरवल्यावर ती तिच्या योगसिद्धीच्या मदतीने तिचे ते योगीनाचे रुप सोडून एका सुस्वरुप बाईचे रुप धारण करते. त्यानंतर वेगांने ती विदेहच्या राजाच्या भेटीस निघते. तेथे गेल्यावर ती एका देखण्या संन्यासिणीचे रुप धारण करते. तिला पाहिल्यानंतर राजा तिचे रुप पाहून नवल करतो. तो तिचे स्वागत करतो. तो तिला बसण्यासाठी आसन देतो. तिला रिवाजाप्रमाणे पाय हात धुण्यासाठी पाणी दिले जाते. तिला उत्तम न्याहारी दिली जाते. अशारितीने ताजीतवानी झालेली सुलभा राजाच्या आदरतिथ्याने खूष होते. ती संन्याशिणी राजाला विनंति करते, त्याच्या सगळ्या मंत्र्यांच्या समक्ष की, तो त्याचे मोक्षाबद्दलचे विचार तिला ऐकवेल. ती तिची शंका बोलून दाखवते कीं, राजाने मोक्ष

साध्य केलेला नाही. ती निवृत्ती धर्माप्रमाणे ते समजत असते. राजाच्या भोवती जी प्रभावळ ती पहाते त्या प्रमाणे ती असा कयास करते कीं, राजाचे मोक्षाचे ज्ञान अजून पूर्ण झालेले नाही. ती तिच्या योगीक शक्तिने राजाला बांधून टाकते. तरी राजा कांहीं कमी नव्हता. तो त्याच्या अध्यात्मिक बळानें तिला अडकवून ठेवतो. राजा त्याच्या त्या सुक्ष्म देहात त्याचे राजदंड आणि छत्री शिवाय असतो. सुलभा सुद्धा तिची संन्याशाची काठी घालवून बसते. अशा प्रकारे ते त्यांच्या असुरक्षित अवस्थेत होते. त्या परिस्थितीत ते एकमेकांशी संवाद करू लागतात. तो काय संवाद झाला ते सांगतो, जनक बोलतो, "अहो पुज्य स्त्री, तुमच्या तपस्येची पद्धत सांगा. आपण कोणाची अहात? कधी आलात येथे? येथील काम झाल्यावर आपण कोठे जाणार"? कोणीही एकमेकांची पुरेशी माहिती घेतल्या शिवाय संवाद करू शकत नाही म्हणून मी हे प्रश्न तुला विचारत आहे. म्हणून मला तुझ्या विषयी ही माहिती सांग. मला सगळे समजले पाहिजे. त्यानंतर राजा तिला त्याच्याबद्दल सांगू लागतो, तो सांगतो कीं, त्याला मोक्षाची माहिती त्याचे गुरू पंचशिखाने शिकवली आहे. मी त्यांचा परमशिष्य आहे. माझे गुरू पराशराच्या परंपरेतील आहेत. त्यांनी माझ्या सगळ्या शंकांचे निरसन केले आहे. त्याची तत्त्वज्ञानाची शाखा आहे सांख्य. ते योगसुद्धा जाणतात. त्यांचे यज्ञाबद्दलचे ज्ञानसुद्धा पूर्ण आहे. जे मोक्ष साधनेसाठी जरूरीचे असते. पंचशिख फिरगस्ती करत माझ्याकडे आले माझा पाहूणचार घेतला आणि मला सूज्ञ केले. पावसाळ्याचे चार महिने ते माझ्या घरात रहात होते. त्यांनी मला मोक्षाच्या मार्गाबद्दल अवगत केले त्या सुमारास. मात्र त्यानी मला माझे राजा म्हणून जे काम आहे ते तसेंच करण्याची आज्ञा केली आहे. मी त्याप्रमाणे सर्व बंधनातूनन मुक्त असा मोक्षाची साधना करत असतो. वैराग्य वृत्ती पूर्ण झाल्यानंतर योग साधना स्वाभाविकपणे सुरू होते. त्यानंतर स्वताच्या अध्यात्मिक अवस्थेचे मला दर्शन झाले. ते झाल्यामुळे मी मृत्यू आणि दुःख ह्यांपासून अभय प्राप्त केले आहे. त्यामुळें माझा पुढचा प्रवास योग्य रितीने होत आहे. मला माझे ज्ञान झाले आहे. मी त्या सगळ्या जोडगोळ्यांपासून (सुख-दुःख इत्यादि) मुक्त झालो आहे. मी सगळ्या ऐहिक बंधनांपासून मुक्त झालो आहे. प्रजनन करण्याची मला इच्छा राहिलेली नाही माझ्या गुरूच्या संस्कारामुळे ते शक्य झाले आहे.

अशा सगळ्या वासनांबद्दल मी पूर्ण उदास झालो आहे. मला प्रेम, द्वेष, आकर्षण, तिरस्कार, क्रोध, दया, लोभ, मोह उरलेले नाहीत. मला कशाचाच मोह उरलेला नाही. सोनं आणि माती मला सारखेच वाटतात. अशा निस्पृह अवस्थेत मी राज्य करत आहे एक जबाबदारी म्हणून. मोक्ष साधनेचे जाणकार सांगतात कीं, मोक्षाचे तीन मार्ग आहेत, ज्ञान, योग आणि यज्ञ. कांहीं सांगतात कीं, ज्ञानात सगळे कांहीं असते. कांहीं सांगतात कीं, योगात सगळे कांहीं असते. माझे गुरू पंचशिख सांगतात कीं, जर गृहस्थी यम आणि नियम ह्यांचे पालन करत त्याचा आश्रम चालवत असेल तर तो योगी आणि ज्ञानींपेक्षा जास्त चांगली प्रगति करत असतो. तो संन्याशापेक्षा श्रेष्ठ असतो. ते पुढे सांगतात कीं, जर संन्याशाला गृहस्थी जीवनाचे आकर्षण वाटत असेल तर तो संन्याशी रहात नाही. मी राजा आहे म्हणजे गृहस्थ आहे तेव्हां मला राजदंड आणि छत्री ठेवण्याने कांहीं बिघडत नाही. जीवनाच्या सगळ्या गरजांनुसार माणसाला गोष्टींचे आकर्षण असते. त्यात न गुंतता त्या करण्याने मोक्षाचा मार्ग सुकर होतो. एका प्रकारचे जीवन जगणारा त्यासाठीच्या गोष्टी करत असतो म्हणजे त्यात तो गुंतला असें समजणे रास्त नसते. संसारात बर्याच गोष्टी मनुष्य नाईलाजाने करत असतो म्हणून तो त्यात गुंतला असे समजणे योग्य नसते. एक कर्तव्य म्हणून तो ते करत असतो त्याप्रमाणे मी माझा राज्य कारभार अलिप्त बुद्धिने करत असतो. कोणत्याही आश्रमात जा, त्या आश्रमाच्या गरजा त्याला पूर्ण कराव्या लागतात म्हणून तो त्यांत अडकला असें समजणे चुकीचे आहे. म्हणून गृहस्थाश्रम आणि संन्यासाश्रम मोक्षाच्या दृष्टीने एकसारखेच असतात असें माझे गुरू पंचशिख सांगतात. तसे असल्याने मोक्ष त्या पैकी कोणालाही प्राप्त होऊ शकतो जर त्याचे जीवन वासाना शून्य झाले असेल. भगवा वस्त्र, आणि हाती काठी व दुसर्या हातात कमंडलू घेतल्याने कोणी अंतर्यामी संन्याशी झाला असे समजले जात नाही. खरे रुप ते जे अंतर्यामी असते. जे कोणाला दिसत नसते. अशी बाह्य रुप फसवणारी असतात. खरे जाणकार ती मानत नाहीत. मोक्ष फक्त बैराग्यालाच मिळतो असा गैरसमज कोणी केला असेल तर तो त्यापुढे जाणार नाही. मी स्वतः सगळ्या बंधनातून मुक्त झालो आहे. अहो संन्याशिणी मी तुमचे कौतुक करतो. तरी मला एक सांगावेसे वाटते कीं तुझे वागणे संन्याशाच्या पंथाला न शोभणारे आहे. तुम्ही

खूप सुंदर अहात, आपण तरुण अहात, आपले नियमन (भोगेंद्रियांचे संयमन) उत्तम आहे. मला तुझ्याबद्दल कांहीं शंका आहेत. माझ्यामध्ये प्रवेश करून मला तू अडकवले आहेस. ते योग्य नाही. मी खरोखरच मोक्षापर्यंत गेलो आहे की नाही ते पहाण्यासाठी तू ते करत आहेस. तुझ्या संन्यास वृत्तीत ते बसत नाही. ज्या योग्याला मोह झाला जसा तुला झाला आहे माझ्याबद्दल, तो योगी रहात नाही. असें तू करत राहिलीस तर तू बरबाद होशिल. स्वताला सांभाळ. आता सांगतो तुझा अधःपात कसा होत आहे माझ्यामध्ये गुंतण्यामुळे. ते करण्या मागे तुझा उद्देश काय आहे? कोणाच्या सांगण्याने तू हे करत आहेस? तू ब्राह्मण स्त्री अहात, मी क्षत्रिय आहे. त्यामुळें जे तू अपेक्षित आहेस ते शक्य नाही. तू वर्णसंकराला मदत करू नकोस. एका ब्राह्मणाला शोभेल असें तुझे वागणे नाही. मी गृहस्थाश्रमी आहे व तू संन्यासाश्रमी आहेस म्हणून ती आणखीन एक मोठी चूक तू करत आहेस. तुझे गोत्र काय ते मला माहीत नाही जर ती जुळत नसतील तर ती आणखीन एक चूक होईल. जर तुझा पति कोठे असेल व तू माझ्यात मिसळत आहेस हे आणखीन एक गैर कृत्य तुझ्याकडून झाले आहे. कारण आपण एक होऊ शकत नाही. तसे करणे पापकारक आहे. काय मिळवण्यासाठी तू हे करत आहेस? ते अज्ञानातून तू करत आहेस कां जाणूनबुजून करत आहेस? जर तुझा अध्यात्म शास्त्राचा अभ्यास असेल तर तुझ्या लक्षात येईल कीं हे सगळे वाईट आहे. तुझ्या सिद्धीचे प्रदर्शन करून तू तुझा घात करत आहेस कारण सिद्धी अशासाठी वापरावयाची नसते. तू एक खलस्त्री शाबीत होशील. ते तुझ्यासाठी चांगले नाही. तू माझ्याबरोबर माझ्या सगळ्या मंत्र्यांना प्रभावित करण्याचा प्रयत्न करत आहेस. ते सगळे ब्राह्मण आहेत. त्या ब्राह्मणांचा तू अशाप्रकारे अपमान करत आहेस. त्यातून तू तुझे श्रेष्ठत्व दाखवत आहेस. माझ्या अध्यात्मिक प्रगतीचा तुला हेवा वाटत आहे असें मला वाटते. तू आणि मी एकत्र येणे म्हणजे वीष आणि अमृत एकत्र येण्यासारखे आहे. जेव्हां स्त्री आणि पुरूष मर्जीने एकत्र येतात ते चांगले असते परंतु, असे बळजबरीने एकत्र येणे कोणाच्याही हिताचे नाही. मला स्पर्श करू नकोस. मी सदाचारी आहे. तू तुझ्या वैराग्य कर्तव्यात रहा. जे तुला विचारावयाचे आहे ते वेगळे होऊन विचार. तुला समजले आहे मी मोक्षप्रद आहे कीं नाही तेव्हा तो विषय संपला आहे. तुझे उद्देश माझ्यापासून लपवण्यात कांहीं अर्थ

नाही. कोणा राजासाठी तू हे करत आहेस तर त्यात तुला यश योणार नाही. राजापुढे सोंग घेणे गुन्हा आहे. विवाहीत पुरूषाच्या कडे असें जाणे पापकारक असते. आणि त्यात तू एक सिद्धहस्त योगीनी आहेस. राजाची शक्ती त्याच्या सत्तेत असते, ब्राह्मणाची त्याच्या तपस्येत आणि स्त्रीची तिच्या यौवनयुक्त सौंदर्यात असते. ज्या कोणाला ह्या तिघांच्या कडून कांहीं हवे असेल तर तो प्रामाणिकपणे भेटतो, असें छुपे नाही. खोट्या मार्गाने गेले तर नुकसान होते हे तुला समजत नाही कां? मला तू रितसर भेट व काय पाहिजे ते सांग, अशारितीने नाही".

भिष्म पुढे सांगतात, राजाने आशाप्रकारे तिला दटावल्यानंतर सुद्धा सुलभावर त्याचा कांहींच परिणाम दिसत नव्हता. ती देखणी राजाला अतिशय सुंदर शब्दात उत्तर देते.

सुलभा बोलते, "अहो राजा, बोलताना ज्या नऊ चुका करावयाच्या नसतात त्या तू केल्या आहेस. त्याशिवाय अंदाजाच्या सुद्धा नऊ चुका तू केल्या आहेस. त्यामध्ये असंदिग्ध आरोप, माझ्या उद्देशाबद्दलच्या तुझ्या चुकीच्या कल्पना, चुकीचे निर्णय घेणे, असे जे तू मोठ्या दिमाखाने केले आहेस ते तुला शोभत नाही. आता मी तुला सांगते त्यात प्रथम असंदिग्धते बद्दलचे ऐक, ते मी तुला सांगणार आहे. जेव्हां समज कल्पनेवर आधारीत असतात, तेव्हां जे दोष उत्पन्न होतात ते तुझ्या बोलण्यात मला दिसत आहेत. त्यात त्यामुळे असंदिग्दता असते ती तुझ्या बोलण्यात आहे. कल्पनेने मनाला येतील ते आरोप लावणे हे कोणत्या न्यायशास्त्रात दिले आहे ते सांग. सांख्यांच्या पद्धतीत ते बसत नाही. तर्क आणि त्यावर आधारीत निष्कर्ष दोनही आव्हानात्मक आहेत. तुझी भाषा अतिथीच्या शिष्टाचारात न बसणारी आहे. कर्तव्य, सुख आणि हित ह्या तिनही बाबतीत तुझे वक्तव्य आक्षेपार्ह आहे. अपेक्षाभंगातून येणारे दुःख आणि औदासिन्य अशा परिस्थितीत जास्त तीव्र होते. अशावेळी जे केले जाते त्याला प्रयोजन म्हणतात. मी जे बोलत आहे त्यात तथ्य आहे. त्यात असंदिग्धता नसेल. ते तर्कशुद्ध असेल, त्यात शब्दबंबाल नसेल. ते समजावणीचे असेल. त्यात चांगुलपणा, आनंददाईकता, हीत असे सगळे असेल. समजण्यास साधे असेल. त्यात कटूता नसेल. समजण्याससुद्धा सोपे असेल. माझे उद्देश सुद्धा शुद्ध आहेत. त्यात न समजण्यासारखे कांहीं नसेल कीं कोणी खोटे अंदाज करत रहावे. मी असे कांहीं

बोलायला आले नाही कीं, तू नसते अंदाज करत रहावे. शांतपणे माझे ऐक. मी बोलते कारण मला बोललेच पाहिजे जेव्हां तू असे बिनबुडाचे आरोप करत आहेस. बोलणारा, ऐकणारा व बोललेले ह्यांचा सुसंवाद होणे संभाषणासाठी अगत्याचे असते. बोलणारा जर ऐकणार्याबद्दल तुच्छता दाखवत असेल तर ते शब्द कितीही चांगले असले तरी ते विषासारखेच असतात. ते ऐकणार्यास त्रास देणारे असतात. बोलणारा त्याचे शब्द बेतालपणे वापरत असेल तर ते कितीही चांगले असले तरी ते निरर्थक ठरतात. ज्याचे बोलणे ऐकणार्याला समजण्यासारखे असेल तर ते योग्य असते. तो चांगला बोलणारा असतो. मी अरे राजा हे तुला ऐकवत आहे तरी ते नीटपणे ऐक. तू मला विचारले आहेस, मी कोण आहे, ते सांगते, समाजात माणसे एकत्र रहातात जसे राज्यात माणसे असतात ते कोणी कोणाला विचारत नाहीत तू कोण म्हणून. तसे विचारण्याचे कारण नसते. निसर्गात अनेक गोष्टी एकत्र असतात व त्यांचे कार्य करत असतात पण कोणी कोणाला विचारत नाही तू कोण"? शरीराचे भाग कान, डोळे, नाक, तोंड एकत्र असतात पण ते एकमेकाना ना मदत करत ना विरोध करत किंवा ते एकमेकांना जाणतसुद्धा नसतात. त्यांच्या कामाला समजण्याचे काम मन करते जे त्याहून वेगळे आहे. ज्याचा वस्तुतः त्यांच्याशी कांहीं संबंध नसतो. मनाच्या जाणीवांमुळे असणे अथवा नसणे शक्य होते. जेव्हां त्या जाणीवांबद्दल शंका येते बुद्धी त्याबाबत निर्णय घेते जी आणखीन एक वेगळी गोष्ट आहे. सृष्टीच्या गोष्टीत त्यांना क्रमवार नोंदलेले आहे सांख्याच्या तर्कशास्त्रात. त्यानंतर येते सत्त्व. ते तेरावे आहे. त्यानंतर जाणीवा व त्यांचे प्रकार असे आणखीन आहेत. इच्छा पंधरावी आहे. त्यात सगळ्या विश्वाचे अस्तित्व सामावलेले आहे. त्यानंतर येते अविद्या. त्यानंतर येतात प्रकृती आणि व्यक्ती. आनंद आणि दुःख, अपंगत्व, मृत्यू, कमाई, नुकसान, चांगले वाईट असें परस्पर विरुद्ध अशा कांहीं जोड्या आहे त्या येतात. अशा एकंदर तीस गोष्टींची नोंद सांख्य करतात. त्यामुळे आपले शरीर बनते. कांहीं समजतात कीं, प्रकृतीच्या सगळ्या व्यवहारांना हे कारण असतात. कणादाचे वेगळे मत आहे. ते सांगतात कीं, अव्यक्त आणि व्यक्त हे सृष्टीचे कारण आहेत. त्यात विधाता व पुरूष सृष्टीचे कारण आहेत. कांहीं समजतात ते चारही (विधाता, पुरूष, माया (प्रकृती), आत्मा,

अविद्या अथवा अज्ञान) सृष्टीचे कारण आहेत एकत्रितपणे. जे अध्यात्म विद्या जाणतात ते समजतात प्रकृती सगळ्यांचे एकमेव करण आहे. मी, तू असे सगळे त्यात येतो. सुश्रुत सांगतात, प्रथम कलल तयार होते गर्भात, त्यात बुडबुडे तयार होतात. त्यातून पस तयार होते. त्या पशीतून शरीराचे विविध अंग तयार होतात. आणि शरीर संपन्न होते. त्यात अस्थी, चरबी, मेद, रक्त, केस, नखं असें एक एक करू बनत असतात. सगळे तांब्यासारखे लाल असते. त्यानंतर अर्भक तयार होते. ते सगळे बनत असतांना कितीतरी बदल होत असतात. अशारितीने प्रत्येक प्रकारचा प्राणी तयार होत असतो. ते होण्यासाठी जे बदल होतात ते सुक्ष्म असतात. सहजपणे लक्षात येत नाहीत. असे असल्याने आपले आपल्या शरीराचे काय संबंध आहेत ते समजत नाही. परंतु, ते आहेत असे गृहीत धरून आपण जगत असतो हे सत्य आहे. दोन सुक्या काठ्या एकमेकांवर घासण्याने अग्नी तयार होतो. त्याप्रमाणे प्राणी जन्म घेतात असे समजावयाला कोणाची हरकत नसावी. तू तुझा आत्मा तुझ्यात पहातोस तसे तो तू इतरांच्या शरीरात कां पहात नाहीस? जर हे खरे असेल कीं, तू दुसर्यात तुला पाहू शकत नाहीस तर तू मला कसे विचारतोस मी कोण आणि कोणाची? अशा प्रश्नास मी कसे उत्तर देऊ? तू अद्वैत शिकला नसशिल कदाचित. तू द्वैतात अडकला आहेस म्हणून असे प्रश्न तू मला विचारलेस असे मी समजते. जो राजा मित्र, शत्रू, तटस्थ, लढाई, तह अशा गोष्टी करतो तो मोक्षाच्या सुद्धा गोष्टी करत आहे हे मला विलक्षण वाटते. तू मोक्षाच्या गोष्टी करण्यास योग्य नाहीस तरी तू त्यावर गप्पा मारत असतोस म्हणून मी तुला पहावयाला आले आहे. त्या भेटण्यात माझा कोणताही इतर उद्देश नव्हता. राजाच्या कारभार्यानी हे लक्षात घ्यावे कीं, तुमचा राजा दरबारात बसून मोक्षाच्या गोष्टी करत असतो हे निंदनीय आहे. त्याला तो अधिकार नाही. त्यांने त्याची मर्यादा ओलांडलेली आहे. आता सांगते त्या चार मोहाच्या गोष्टी ज्या झोपतांना, मजा करतांना, खातांना आणि कपडे घालतांना आपण करत असतो. मोक्षाच्या गोष्टी करणारे त्यात अडकलेले असतात म्हणून ते कधीच मोक्ष प्राप्त करू शकत नाहीत. सगळ्या जगावर राज्य करणारा असा एकच राजा असला पाहिजे, त्याचा एकच वाडा असला पाहिजे, त्याचे एकच निजण्याचे कक्ष असले पाहिजे. त्या बिछान्यात अर्धा भाग

त्याच्या बायकोचा असणार ह्यावरून समजते राजाचा खरा हिस्सा किती असतो. तरी तो स्वताला राजा समजत असतो. असे सगळ्या त्या चार गोष्टींबाबत असते हे सहसा लक्षात येत नाही पण मोक्षाच्या गप्पा मारणार्याला ते लक्षात आले पाहिजे. राजाला त्याच्या सल्लागारांचे ऐकावे लागते, तो स्वतंत्र कधीच नसतो तरी तो स्वताला राजा समजत असतो. त्याला त्याचे असे जीवन कोठे असते? त्याच्या कामाच्या गोष्टी त्याचे कारभारी ठरवत असतात, त्याप्रमाणे तो जगत असतो. तो त्याच्या आयुष्याचे निर्णय सुद्धा घेत नसतो. तरी तो स्वताला राजा समजत असतो. त्याचे कारभारी त्याचे मालक असतात असें मी म्हंटले तर ते चुकीचे समजू नये. राजाला त्याच्या छुप्या शत्रूं पासून सतत धोका असतो त्याच्या काळजीत तो जगत असतो. सगळे गृहस्थ त्यांच्या घराचे राजेच असतात. गृह हे एक छोटेखानी राज्यच असते. म्हणून राजा आणि गृहस्थ एका समान असतात. त्यांची सुख आणि दुःख प्रकाराने एक सारखाच असतात फक्त त्यांचे प्रमाणं कमी जास्त असतात. राजा त्याच्या कारभाराच्या विवंचनेत अडकलेला असतो असा राजा मोक्षाच्या गोष्टी कशा करू शकतो ते मला सांगा अहो जनकाच्या कारभार्यानो. मजा आणि सजा दोनही गोष्टी राजाला सतावत असतात. त्याला सुख-दुःख, प्रेम-द्वेष, क्रोध-निराशा, गरीबी-श्रीमती, भिती-निर्भयता, गर्व-विनम्रता असे सगळे त्याला आलटून पालटून सतावत असतात ते कोणाही ऐहिक जीवनात असणार्याना सतावत असतात. त्याचे अधिकार त्याला सुखाने जगू देत नाहीत. त्याला मनाची शांतता लाभत नाही. सगळे वैभव असून तो भिकारीच असतो. राजकारणातील मुत्सद्देगिरी त्याला शांत बसू देत नाही. राजाला इतके करून राज्याच्या कमाईचा फक्त दहावा भाग मिळत असतो. राजाचे काम असते समाजात चांगुलपणा नांदावा. त्यासाठी ब्राह्मणांनी क्षत्रियाची राजा म्हणून नेमणूक केली आहे. त्याने ते काम इमानदारीने कसेशीने केले तर त्याच्या राज्यात पुण्याई वाढत जाईल. ते जरी राजा प्रामाणिकपणे करतो तर तो मोक्षास जाऊ शकतो असे मोठे ऋषी सांगतात. राजाला इतर कोणतीही तपस्या, साधना, यम, नियम करावयाचे नसतात शिवाय चांगुलपणा राज्यात आणणे. अरे राजा, मला सांग तू तुझ्या मिथिलामध्ये चांगुलपणा किती रुजवला आहेत ते विचारण्यासाठी मी आले होते. तुझ्या गुरूने तुला ते सांगितले आहे

कां? तुझ्या दुसर्या प्रश्नाला मी उत्तर देते, मी माझ्या देहाची दुसर्या देहाची कां स्पर्श करवू, त्याचा उपयोग काय? मी तुला विचारते अरे राजा, तू शास्त्रविधी अभ्यासलेल्या नाहीस असे वाटते. तुला तुझ्या राजदंडाची आणि छत्रीची पडली आहे. मला समजले येथे आल्यावर कीं तू अजून ऐहिक गोष्टीत रमणारा राजा आहेस. तू मोक्षाच्या साठी योग्य नाहीस परंतु तुझ्या प्रजेत चांगुलपणाची शिकवणूक जर तू रुजवलीस तर तू कदाचित इंद्राच्या कृपेने मोक्ष नाही तरी निवृत्ती पर्यंत जाऊ शकशिल. मी माझ्या योगसिद्धीने तुझ्या बुद्धीला आव्हान दिले त्यात काय बिघडले. ते माझे काम होते तुला शुद्धीवर आणण्यासाठी. यती निवात जागी रहातात. मी तुला खरे ज्ञान काय ते सांगितले जे तुझ्या पंचशिखाने करावयाला पाहिजे होते. मी तुला स्पर्श केला नाही फक्त तुझ्या बुद्धीला आव्हान दिले त्यात माझा उद्देश तुला सावध करण्याचा होता. मी तुझ्या बुद्धीत शिरले त्याची जाहिरात सगळ्या दरबारात करण्याची गरज नव्हती. पंचशिखाच्या सहवासाने तुझा असा गैरसमज झाला आहे कीं, तू मोक्षाजवळ गेला आहेस. त्यात दोष तुझ्या गुरूचा आहे. त्यांने तुला योग्य शिकवणून दिलेली नाही. नुसत्या प्रकृती, पुरुष, माया, आत्मा, ब्रह्म अशा गप्पा मारून कोणी मोक्षाला जात नाही. अद्वैता प्रमाणे मी व तू एकच आहोत हे तुला तुझ्या पंचशिखाने नाही शिलवले कां?

मी ब्राह्मण नाही. मी तुझ्याच वर्णाची आहे. माझे पिता प्रधान नावांचे राजर्षी आहेत. माझे नांव सुलभा आहे. एकदा माझ्या पित्याने माझ्यासाठी नवरा मिळावा म्हणून यज्ञ केला त्यात इंद्रा पासून अनेक ऋषी बोलावले होते. त्यात शतश्रृंग, काक्रद्वर, असे अनेक होते. माझ्या योग्यतेचा नवरा मिळला नाही. मग मी मोक्षाच्या दिशेने साधना सुरू केली. संन्यास घेतला. सगळे जग भटकत असते. मी माझ्या क्षत्रिय वर्णाप्रमाणे जगत असते. मला समजले कीं, तुझा मोक्ष साधनेचा अभ्यास चांगला झाला आहे. माझ्या येण्यात एक मतलब आहे. मी तत्वज्ञानाच्या व्यर्थ वादात भाग घेत नाही. जो ब्रह्माच्या तपस्येत असतो तो मोक्षाकडे जातो. सन्यासी एक रात्र एका ठिकाणी रहातात. त्याप्रमाणे मी एक रात्र तुझ्या शरीरात रहाणार आहे. त्यानंतर मी जाणार आहे. आम्ही रिकाम्या घरात रहातो त्याप्रमाणे तुझ्या रिकाम्या मनात रहाणार आहे, रिकामे म्हणण्याचे

कारण त्यात ज्ञान नाही. तू अज्ञानी आहेस. तुझ्या गुरूने तुला खरी शिकणूक दिलेली नाही. उद्या मी जाणार आहे.

भिष्म पुढे बोलतात, ते ऐकून राजा धर्मध्यज जनक गप्प झाला होता.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे अठ्ठेचाळिसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे एकोणपन्नासावा

युधिष्ठीर बोलतो, "व्यासांचा मुलगा शुक कसा संन्यासाश्रमाकडे वळला ते मला ऐकावयाचे आहे. त्याशिवाय अव्यक्त कारण आणि व्यक्त परिणाम ह्यांचे ब्रह्माशी कसे संबंध असतात ते सांगा. कारण ब्रह्म तेथे असूनही त्यांच्यात नसतो. त्याशिवाय नारायण ऋषीची माहिती जी आपल्याला आहे ती मला समजून घ्यावयाची आहे".
भिष्म सांगतात, "व्यास पहातात कीं, त्यांचा मुलगा सामान्य माणसांसारखा जगत होता ते ठरवतात कीं, त्याला वेद शिकले पाहिजेत. ते शुकाला बोलतात, "अरे माझ्या मुला, तू इंद्रियांचे संयमन करत आहेस परंतु, अतिशीत आणि अति उष्ण, भूक आणि तहान, वारा आणि पाणी ह्यांचे नियमन करण्यासाठी जी योगसिद्धी तू शिकली पाहिजेस ती केव्हां शिकण्याला सुरूवात करणार? तुला पुण्यदाई, चांगुलपणा, प्रामाणिकपणा ह्यांचे शिक्षण कधी घेणार? क्रोध आणि मोह हे कधी आवरण्याचे शिक्षण घेणार? तसेंच दयाळूपणा, क्षमाशिलता असें गुण जे तुला ब्रह्माकडे नेण्यास उपयोगाचे आहेत त्यांची माहिती कधी करून घेणार? तपस्या करून मनाचे निग्रह कसे नियंत्रित करणार? समाजाचे शिष्टाचार ज्यात अतिथींची सेवा करण्याचे कधी शिकणार? योग शास्त्राप्रमाणे तू आत्मा आहेस व हे शरीर केवळ माध्याम आहे मोक्षाकडे जाण्यासाठी त्याची प्रचिती घेण्यासाठी योग साधना तू कधी सुरु करणार? तुझा आत्मा त्या शरीरात असूनही त्यात नाही ह्या विलक्षण परिस्थितीचा अनुभव तू कधी घेण्यासाठी योगसाधना करण्यास सुरूवात करणार? सगळी सुख क्षणभंगूर आहेत ह्याची माहिती तुला आहे पण त्याचे ज्ञान तुला होण्यासाठी जी साधना करावयाला पाहिजेस ती कधी करणार? ते तुझे षड्रिपू (काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर) तुला खाण्यासाठी त्यांचे फांसे टाकत आहेत, त्यांपासून तू तुझे संरक्षण करण्याचे कधी प्रारंभ करणार? मूर्खासारखा तुझा अमुल्य समय व्यर्थ घालवू नकोस. जसे तुझे वय वाढत आहे व मृत्यू जवळ येत आहे, तुझी ह्या आयुष्याची मोक्षाची संधी कमी होत असते त्याचे तुला भान आहे कां? तू गुरूगृही जाऊन त्या सगळ्या विषयाचे अध्ययन सुरू केले पाहिजेस जसे ब्राह्मणाच्या

मुलाने करावयाचे असते. ते शिक्षण झाल्यानंतर तू इतरांना मार्गदर्शन करणार आहेस? अरे शुका, जे त्यांच्या अध्यात्मिक जबाबदार्या विसरले आहेत, ज्यांना त्यांच्या नंतरच्या जन्माची फिकीर नाही त्यांच्या अज्ञानीपणामुळें ते असे स्वच्छंदपणे उंडारण्यात त्यांचा समय घालवत असतात तसे वागणे तुला शोभत नाही. तू तुझ्या ब्राह्मणत्वाच्या कर्तव्याचे पालन करण्यास सुरूवात करावी. त्या गुरूंकडे जाऊन तू चांगुलपणाचे नितीशास्त्र शिकून घे. त्यानंतर अध्यात्म विद्या शिकून घे. तू त्या तुझ्या दोस्तांच्या चुकीच्या वागण्याचे अनुकरण करणार नाहीस. सामान्य माणसें मोहाच्या आहारी जाऊन त्यांच्या भोवती भोगांचे जाळे विणत असतात जसे रेशमाचा किडा त्याच्या भोवती कोश बनवून त्यात स्वताला अडकवत असतो. ऐहीक भोगात रमणारे त्यांच्या मोक्षप्रदच्या कर्तव्यास पार विसरतात तसे तुझे होऊ देऊ नकोस. असेंच जर तू तुझे लाखमोलाचे आयुष्य जे मोक्षसिद्धीसाठी तुला ब्रह्माने दिले आहे ते व्यर्थ घालवत असशिल तर एक दिवस मृत्यू तुला अचानकपणे खेचून घेऊन जाईल. तेव्हां तुला समजेल तू कोणती मोठी चूक केली आहेस. अनेक जन्माच्या कष्टाने तुला ब्राह्मण जन्म लाभला आहे त्याचे सार्थक कर. ब्राह्मणांचा जन्म भोग घेण्यासाठी नसतो. तो ब्रह्माच्या ज्ञानासाठी असतो. ते ज्ञान मिळवणे हे त्याचे कर्तव्य असते. तपस्या करणे, इंद्रिय संयमन, ब्रह्मचर्य, वेदांचा अभ्यास करणे, शिकणे व शिकवणे, ह्यातच ब्राह्मणांचे खरे सौख्य सामावलेले असते हे तू लक्षात घे. अरे शुका, आयुष्य झपाट्याने सरकत असते ते कोणासाठी थांबत नाही. काळाला कोणाची पर्वा नसते, आपल्याला त्याची पर्वा करावयाची असते. भोगांच्या आहारी गेलेले जे त्यांचे मोक्षाबद्दलचे कर्तव्य विसरले आहेत त्यांना नरकात खितपत पडावे लागते. तेथून सुटका होणे मुष्किल असते. जर तू निष्काळजी असशिल तर यमाच्या पुढे तुला उभे रहाण्याची पाळी येईल. तेथे तुला ही तुझी उंडारकी उपयोगाची नाही. म्हणून सावध हो. ती वेळ येऊ देऊ नकोस. तेथे तू माझा मुलगा आहेस ह्याचा कांहीं परिणाम यमावर होणार नाही. तो तुझा हिशेब पाहून तुझा निर्णय करणार त्यात तू अडकू नकोस. लवकरात लवकर तू योग साधना आत्मसात करण्याचे प्रारंभ कर. त्यामुळें जी संपत्ती तू मिळवशील त्याला कोणी चोरू शकत नाही. त्यावर कोणी राजा कर लादू शकत नाही. ती अध्यात्मिक संपत्ती केवळ तुझी असेल आणि ती

तुझ्या बरोबरच राहील. त्या अध्यात्मिक धनामुळे सुखाचे अनुभव तुला वेळोवेळी येत रहातील. त्याशिवाय तू मोक्षाकडे झेपावत असशिल. हे सगळे समजून तू त्वरित तपस्या करण्याचे ठरव. जेव्हां यमाकडे तू जाशिल तुझ्या बरोबर फक्त तुझे चांगले आणि वाईट कर्म आणि त्याचे विचार असतील. त्याप्रमाणे तुझा निर्णय तेथे होईल. तेथे तुझे मित्र, आप्त तुझ्या कामाचे नसतात. तू आणि तुझे कर्तव्य जे तू करत होतास त्या आयुष्यात ते एकतर तुला वाचवतील अथवा नष्ट करतील. यमाच्या पुढे लोकपाल देवता (इंद्र, वायू, जल, अग्नी, कुबेर आणि यम) तुझ्या कर्माचे सांक्षीदार असतात ते तुझ्या वतीने अथवा विरुद्ध त्यांचा साक्ष देतात आणि त्यातून तुझ्या पुढच्या जीवनाचा आराखडा तयार होत असतो. तेथे तुझी तपस्या, जपजाप, ब्रह्मचर्य, चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदया, प्रामाणिकपणा, भोगांबद्दलची तुझी उदासिनता असें तुझे कर्तव्य विचारात घेतले जाते. जर योग साधना केली असेल तर ती तुला मोठी मदतगार सिद्ध होईल. तुझी सगळी पापकृत्ये जी तू तुझ्या ऐहिक सुखासाठी करत होतास ती तुझ्या विरुद्ध साक्ष देण्यास तेथे असतात. जे सगळे तुझ्या सुक्ष्मदेहात (लिंगदेहात) हजर असतात. जसे तुझे पुण्यकृत्य तुला मदत करत असते तसेंच तुझे पापकृत्य तुला खाली खेचत असते. पुण्यकर्माची शुभ फळ त्याला मिळतात आणि पापकर्माची कटू अशुभ फळं त्याला मिळतात. पुण्य केले म्हणून त्याचे पाप नाहीसे होत नाही ते सुद्धा त्याला भोगावे लागते हा न्याय आहे यमाच्या राज्याचा. म्हणून पापकर्म न करण्याचा तू निर्धार कर. तू जर माझ्या सांगण्याप्रमाणे करणार असशिल तर मी तुला योग्य मार्गदर्शन करणार आहे. सांख्यांच्या समजाप्रमाणे चांगुलपणा हांच पुण्याचा मार्ग आहे त्याशिवाय योगी सांगतात कीं, समाधी, ध्यानसाधना, जपयज्ञ, विपाशना असें कितीतरी इतर पर्याय आहेत पुण्य जमवण्याचे. ते मी तुला शिकवणार आहे. त्यासाठी तू तुझ्या मनाचा निर्धार कर आणि शिकण्यास प्रारंभ कर. अज्ञानाने ज्या पापकृत्यांचे कर्म होते त्यासाठी दान, यज्ञ असें योगी सांगतात पण सांख्य ते मानत नाहीत. अज्ञानाने झालेले पापकृत्य सुद्धा तुला भोगावे लागते म्हणून अज्ञानी राहू नकोस. वेदाच्या अभ्यासाने तुझे अज्ञान दूर होईल. तुला वाटत असेल कीं, तू एकटा आहेस तर ती तुझी मोठी भूल ठरेल कारण तुला लोकपाल देवता व त्यांचे गण पहात आहेत. इंद्र, कुबेर आणि यम

शरीराच्या बाहेरून व वायू, जल आणि अग्नी शरीराच्या आतून पहात असतात. (जसे सीसीटिव्ही कॅमेरा असतात). त्यांच्या निरीक्षणाची नोंद तुझ्या लिंगदेहात बिनचूक होत असते (डीएने मध्ये). तो लेखाजोखा यमाच्या दरबारात वाचला जातो व त्याप्रमाणे तुझा फैसला होतो. ज्याने त्याच्या आयुष्यात भोग घेतांना त्यांचा क्षणभंगूरपणा, त्याची मर्यादा निरीक्षिली आहे तो त्या भोगांपासून विरक्त होतो त्यामुळे त्याला ते भोग त्याच्या मृत्यूनंतर बाधत नाहीत. अहंकार तुला जास्त त्रासदायक होईल जर त्याचे नियंत्रण तू केले नाहीस. अरे मुला, आपले सगळे भोग ह्या अहंकाराच्या कारणाने उत्पन्न होत असतात. तू निरहंकारी हो. ते जमले तर तुझे पुष्कळसे पापभोग कमी होतील. अहंकार माणसाला माझे, तुझे, मी, ती, माझी, तू, अशा विचारात गुंतून टाकत असतात. त्यातून सगळी पापांची मालिका सुरू होत असते. अहंकार तुझा मोठा शत्रू आहे, त्याच्यापासून सावध रहा. अहंकारातून स्वार्थ उत्पन्न होतो. त्यातून इच्छा होतात अशारितीने सृष्टीत गुंतण्याची प्रक्रीया चालू होते. एकदा त्यात गुंतलास की त्यातून बाहेर येणे अशक्य असते. त्यातून पापांची मालिका लागते, त्यातून सुटका होत नाही. हे सगळे लक्षात ठेवून तू तुझे पुढचे जीवन जगण्याची तयारी कर. चांगले कृत्य जे सदाचारींच्या भल्याचे आहे ते करत रहा. त्यासाठी काळाचे भान ठेव. काळ सगळ्या गोष्टींचे नियंत्रण करत असतो म्हणून तो महत्वाचा असतो. तो कोणासाठी थांबत नाही. आपल्याला त्याच्याप्रमाणे आपली कामं करावयाची असतात. चांगुलपणाचा गैरफायदा घेणार्यांपासून सावध रहा. तो सत्पात्र असला पाहिजे. अपात्र झाला तर तो वाईटपणा होतो व त्यामुळें पाप होते. म्हणून कोणाशी चांगुलपणा आपण करत आहोत हे महत्वाचे असते. वाईटांशी वाईटपणा हा चांगुलपणा असतो. ह्यातील गुंतागुत जो समजतो तो पुण्य कमावत असतो. अरें शुका, हे जग मोठे फसवे आहे. त्यातील माया सगळ्यांना फसवण्याचे काम करत असते. म्हणून सावध हो.

भिष्म पुढे सांगतात, व्यासांचे ते सुचक बोलणे ऐकल्यावर त्यांचा मुलगा शुक, गुरूच्या घरी जातो. ज्याच्याकडून तो मोक्षसाधना शिकणार असतो.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे एकोणपन्नासावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग एकशे पन्नासावा

युधिष्ठीर बोलतात, मला सांगा अहो पितामहा, योग्य दान, योग्य यज्ञ, योग्य तपस्या आणि गुरूची व इतर श्रेष्ठांची प्रामाणिक सेवा ह्याच्या फळांबद्दल मला ऐकावयाचे आहे.

भिष्म सांगतात, वाईट विचारांबरोबर पाप असते. अशा विचारांमुळें तो चुकीच्या कृत्यात अडकत असतो. अशा विचाराचे लोक गरीब कुळात जन्म घेतात. ते त्यांच्या चुकीच्या विचारसरणीमुळें आणखीन आणखीन दुःखी समाजात जन्म घेत असतात. त्यांच्या जीवनात दुःख, वेदना, काळजी अशा त्रासदायक गोष्टी आढळतात. ते जीवंत असून मेल्यासारखे असतात. त्या उलट ज्यांच्यात पुण्यप्रभाव असतो, जे श्रद्धावान असतात, त्यांच्या जीवनात सुख, आनंद, प्रगति, उत्कर्ष असें अनुभव असतात. त्याचे कार्य चांगुलपणाने भरलेले असते. श्रद्धाहीन लोक सतत अनिश्चिततेच्या परिस्थितीत जगत असतात. त्यांच्या जीवनात असुरक्षितता, भय, अपमान, चोरी असे अनुभव येतात. त्याउलट जे देवावर श्रद्धा राखून जगतात ते सुरक्षित, निर्भय, सन्मान, फायदा असे अनुभव घेतात. ते दानं करतात. ते इतरांना सुरक्षितता देतात. ज्यांच्यामध्ये चांगुलपणा नाही अशांचा उल्लेखसुद्धा त्यात करावयाचा नाही. जे कृत्य केले तसेंच करण्याचे नुसते योजले त्या कृत्याच्या प्रवृत्तीचे परिणाम त्याच्या मागे लागतात. चांगले विचार व कृत्य असेल तर चांगले परिणाम त्याला यथावकाश अनुभवास येतात. पाप आणि पुण्य नुसते त्याप्रकारचे विचार केले तरी माणसाला लागू होत असते. हा सगळा अध्यात्मिक उर्जेच्या हिशोबाचा भाग असतो. जितकी जास्त अध्यात्मिक उर्जा तितके जास्त सुख येत असते. ते आरशातील प्रतीमे सारखे असते. तुम्ही हललात ती हलते. ते परिणाम ह्या जन्मात कमी अनुभवास येतात पण पुढच्या जन्मा विशेष प्रकर्षाने आढळतात. असे काळाच्या प्रभावामुळे होत असते. काळाच्या अधिकारात ते असते. चांगल्या व वाईट कामाचे परिणाम यथावकाश आपल्याला भोगावयाचे असतात. काळाच्या अधिकारात असलेल्या लोकपाल देवता ते घडवत असतात. मान सन्मान, फायदा तोटा, वाढ र्हास, आरोग्य आजार असे त्या त्या वेळेस जीवनात उपस्थित होत

असतात. त्याच्यावर लोकपाल देवता व त्यांचे गण अंमलबजावणी करण्याचे काम करत असतात. त्यात बदल करण्याचे अधिकार त्या शक्तींना देवतांना असतात. आगम शास्त्रात त्या देवतांना प्रसन्न करून त्यांचे अनुभव पुढे ढकलता येतात असें सांगतात. त्यातून यज्ञ, कर्मकांड अशा विधी अगदी प्राचीन काळांपासून प्रचारात आहेत. ते भोग टाळता येत नाहीत फक्त पुढे (पुढच्या जन्मी) ढकलता येतात त्या देवतांच्या कृपेने. पापभोग अशारितीने पुढे ढकलण्याचे काम त्या देवतांना प्रसन्न करून साध्य होते. त्याची किंमत मात्र त्या पाप्याला द्यावी लागते. ते सगळे भोग आपल्या लिंगदेहात नोंदवलेले असतात. त्याप्रमाणे योग्य समयी ते त्या माणसाला भोगावे लागतात. त्यापासून सुटका नसते. आपली सगळी कृत्ये आपल्या लिंगदेहात साठवून ठेवलेली असतात. जसें मळलेले कपडे पाण्यात धुवून स्वच्छ करता येतात तसे जपयज्ञ (सतत जप करणे), चांगली वर्तणूक ठेवून, सत्पात्र दानं करून, प्रामाणिकपणा, दुसर्यांना (अपंग, वृद्ध, आजारी, असहाय, लहान मुलं, बायका, सदाचारी) अशांना मदत करून, जे पुण्य जमा होते ते कांहीं प्रमाणात पाप भोगांची तीव्रता कमी करता येते. घोर तपस्या, ब्रह्मचर्य, ध्यान साधना, अनशन, अशा प्रायश्चित्त करणार्या उपक्रमाने पापभोगांपासून मुक्ती मिळते असें आगम शास्त्रात दिले आहे. सगळ्यांना आनंद देणारे त्यांचे पाप जास्त सहजपणे संपवत असतात. परंतु, पाप भोग संपवण्यासाठी जर ते केले तर तो धंदा ठरतो व त्यामुळें अशा चांगल्या कामानेसुद्धा पाप भोग धुतले जात नाहीत. ते उपक्रम स्वाभाविकपणे झाले पाहिजेत. अंतस्थ उद्देशाने केल्यास कांहीं उपयोग होत नाही. सर्वात उत्तम म्हणजे पाप करणेच टाळावे. म्हणजे नंतर ते निस्तरण्याचे उपद्व्याप करण्याची आवश्यकता रहाणार नाही.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे पन्नासावा संपला.

## - शांती पर्व भाग आठवा संपला -

## भाषांतरकाराचा परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७७ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे ४० पेक्षा जास्त खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळ्या नितीशास्त्र शिकवणार्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कांही कंसात दिल्या आहेत, कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल लिहीत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत

आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी तयार होत नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षे मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबर्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकर्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चांने शेतकर्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा

प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे, माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे. मला सांगण्यास आनंद होतो कीं, माझी कृषी विषयावरील सगळी पुस्तकं आता ई-साहित्य वर उपलब्ध झाली आहेत.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा

जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळीराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विवेचनामुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बर्याच गटांना आवडत नाही. बर्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव

लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा ठरवता आलेला नाही. जाता जाता, जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकार्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ -२०१८

ashokkothare@gmail.com ,

## ई साहित्य प्रतिष्ठान -

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणार्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यंत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ऍप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून देऊ.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मांगवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून ठेवा, या नंबरला तुमचे नांवाने Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. लिंक ई साहित्यचे app.https://play.google.com/store/apps/details?id=com.
esahity.www.esahitybooks ह्या लिंकवर उपलब्ध आहेत. ते download करा. हे सर्व मोफत आहेत.

धन्यवाद,